
# श्रीसाईलीला



एप्रिल १९६४ | श्रीरामनवमी विशेषांक | किंमत ७५ न. पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर**

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

"रोग काय किंवा आरोग्य काय; ज्याच्या त्याच्या पुण्याचरणानुसार किंवा पापाचरणानुसार जे भोग वाट्याला येतील ते भोगल्याशिवाय सुटका नाहीं. भोग भोगूनच त्यांतून सुटका व्हायची ते भोग एकाच जन्मांत भोगून संपत नाहींत. ते जन्मोजन्मीं मानवाच्या मागें लागलेलेच असतात; परंतु एखाद्याच्या भाग्यानें त्याला जर कां संत दर्शन घडलें तर मात्र मागें लागलेल्या भोगांतून त्या भाग्यवंताची सुटका होऊं शकते. बाबांच्या दर्शनानें व त्यांच्या कृपाप्रसादानें असें कित्येकांचें भोक्तृत्व संपलें आहे. संतकृपेची त्यासाठींच जरूरी. ती प्राप्त करून घेण्यासाठीं झटावयाचें असतें."

— श्रीसाईसच्चरित्

---


## श्रीसाईलीला : रामनवमी विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] एप्रिल १९६४ [ अंक १ ला

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्पे

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६२२६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

**जेथें रामनामाचें गर्जन । फिरे तेथें विष्णूचें सुदर्शन**
**कोटी विघ्नांचें निर्दाळण । दीन संरक्षण नाम हें ॥**

दर वर्षाप्रमाणें श्रीरामनवमी महोत्सवानित्त हा 'रामनवमी विशेषांक' आमच्या प्रिय वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला सहाजिकच आनंद होत आहे. वाल्मीकी रामायण हा महान् ग्रंथ हिंदवासीयानांच नव्हे तर जगांतील यच्चयावत् लोकांना सर्वकाळीं आदर्शवत् होऊन रहाणारा ग्रंथ आहे. ती आदरणीय व अनुकरणीय अशी जीवन गाथा आहे. या ग्रंथाचा रचना काळ हजारों वर्षांपूर्वीचा आहे. परंतु त्यांतील जीवनमूल्यें सर्व काळांतील स्त्रीपुरुषांना अनुकरणीय होऊन रहाणारी आहेत. पितापुत्र, पतिपत्नी, बहीणभाऊ, भाऊभाऊ, मातापुत्र, सेव्यसेवक, गुरू-शिष्य, राजा आणि प्रजा यानीं एकमेकांशीं कशा रीतीनें वागावें याचा उच्चतम आदर्श या ग्रंथांतील विविध पात्रांच्या रूपानें जगापुढें ठेवण्यांत आलेला आहे. प्रत्येकानें आपलें जीवन सर्वोत्कृष्ट रीतीनें कसें घालवावें व जगांत सर्वांकडून भले-पणाचा बहुमान कसा मिळवावा हें रामायण काव्याच्या रूपानें वाल्मीकी महर्षींनीं आपणास सांगितलें आहे. त्यांत प्रत्येकासाठीं बहुमोल जीवनमंत्र सांगण्यांत आलेला आहे. जगांतील कोणत्याही वाङ्मयांत अशा प्रकारची श्रेष्ठ कलाकृति निर्माण झालेली नाहीं. यांत बिलकूल अतिशयोक्ति नाही.

## रामराज्याचें उद्दिष्ट

'रामराज्य' म्हणजे सर्व परीनें आदर्श व चिरवांछनीय राज्य. महात्मागांधी यांची तशा प्रकारचें राज्य आपल्या देशांत असावें हींच आकांक्षा होती. त्यासाठीं तर त्यानीं जीवनभर धडपड केली. राज्यराज्य कितीही वांछनीय असलें तरी आमच्या दृष्टीनें तें किती दूर आहे, तें वास्तवांत येणें किती कठीण आहे. याचा अनुभव आपण आज काल घेत आहोत. तें फार मोठें ध्येय आहे, ध्येय नेहमीं उदात्त व मोठ्यांत मोठें असावें. तें साध्य करण्यासाठीं आपली धडपड अहर्निश चालू असावी. निदान तें सर्वस्वी पदरांत नाहीं पडूं शकलें तरी त्याच्या आसपास तरी आपण जाऊन पोहोंचावें हाच त्याचा इत्यर्थ.

रामकथा अत्यंत रसाळ आहे. तिची गोडी अवीट आहे. ती कथा कितीही वेळां व कितीही जणांच्या तोंडून ऐकिली तरी ती परत परत ऐकावी असें कोणाला वाटत नाहीं ? आणि म्हणूनच रामकथेचा निरनिराळ्या दृष्टिकोनांतून विचार केला जातो. ती कथा अमृतानें ओथंबलेली आहे. तिचा एखादा बिंदू जरी प्राशन करतां आला तरी तो आपल्या कल्याणास कारणीभूत होणारा आहे.

## रामजन्मोत्सव कशासाठीं ?

रामराज्य किंवा रामराज्याचा प्रणेता व त्या राज्यांतील अधिष्ठात्री देवता या भरतखंडांत हजारों वर्षांपूर्वी होऊन गेली. तरीहि प्रतिवर्षी आपण त्या देवतेचा जन्मोत्सव वाढत्या उत्साहानें साजरा करतों. रामजन्म प्रतिवर्षी मोठ्या समारोहानें व भक्तिभावानें सर्वत्र केला जातो तो कशासाठीं ? त्या पुण्यपुरुषाचें गुणगान आपल्या-कडून व्हावें, आपल्या मनावर सुसंस्कार घडावे, ज्या श्रेष्ठ गुणांच्या बळावर श्रीराम अजरामर झाले त्या सद्गुणांचा सुगंध आम्हीं लुटावा व आपलें जींवन सुंदर बनावावें यासाठींच—

रामनाम व रामकीर्तन आपल्याकडून अहर्निश घडतच असतें. कारण तो मंत्र म्हणजे आपलें जीवनच आहे. आपण वर्षातून एकदां रामजयंतिनिमित्त त्या महा-भागाचें पुण्यस्मरण करतों किंवा करावें असें नाहीं. तर रामनामाची आठवण आप-णांस हरघडी होत असते. रामनाम तारक; जीवनपोषक व जीवन मरणाच्या फेऱ्यांतून आपला बचाव करणारें आहे. प्रत्येक हिंदु भारतवासीयांची त्यावर असीम श्रद्धा आहे. त्या श्रद्धेवर आपण गेल्या हजारों वर्षांपासून जगत आलों आहोंत व पुढेंही त्याच श्रद्धेवर आपण जगणार आहोंत.

## बाबांना पूर्ण जाणीव

श्रीरामप्रभूंचें महात्म्य श्रीसाईबाबांनीं बरोबर ओळखलें असलें तर त्यांत नवल कसलें ? जनता सुखी व्हावी, भारतांत व जगांत सर्वत्र आबादीआबाद, सुखसमाधान व प्रेमभाव वाढत रहावा हीच तर बाबांची मनीषा. त्यासाठींच तर त्यांचा अवतार. रामनामाचें तारक व पोषक महत्त्व बाबांनीं ओळखलें होतें. जनमनावरील राम-नामाची पकड बाबा बरोबर ओळखून होते आणि म्हणूनच तर त्यांच्या हयातींत शिरडी क्षेत्रांत रामनामाचा सुखद सोहळा सुरू झाला. आपल्या हयातींत ७/८ वर्षें त्यांनीं तो पाहिला व हा सर्वांच्या कल्याणास कारणीभूत होणारा सोहळा आपल्या मागेंही अविछिन्नपणें चालू रहावा अशी त्यांनीं व्यवस्था लावून दिली. लोककल्याणा-संबंधींची बाबांची ही भावना आपण समजून घेतली पाहिजे. रामनामाचें त्यांना एवढें महत्त्व कां वाटलें व त्या उत्सवाला त्यांनीं अग्रपूजेचा मान कां दिला याचा आपण विचार केला पाहिजे.

## शिरडी येथील या महोत्सवाचा इतिहास

आमच्या माहितीप्रमाणें शिरडीच्या पुण्यधामांत श्रीरामजन्मोत्सव सुरू झाल्यास अर्ध शतकापेक्षां अधिक काळ लोटला आहे. शके १८३३ मध्यें हा महो-त्सव सुरूं झाला. त्याला आतां त्रेपन्न वर्षें होत आलीं आहेत. बाबांच्या हयातींत

वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्या प्रेरणेनें सुरू झालेल्या या उत्सवास वर्षानुवर्षं वाढत्या उत्साहाचें व व्यापक स्वरूप प्राप्त होऊं लागलें आहे ही त्यांचीच कृपा होय.

शिरडींत गोपाळराव गुंड या नांवाचे बाबांचे एक परम भक्त त्यांच्या दर्शनार्थ वारंवार येत असत. बाबांवर त्यांची आत्यंतिक निष्ठा होती. निष्ठेचें फळ हें केव्हांना केव्हां मिळावयाचेंच. गोपाळरावास पुत्र संतती नव्हती. बाबांच्या कृपेनें त्यांना तो लाभ झाला. आनंद झाला. मनुष्य उत्सवप्रिय असतो नाहीं का ? उत्सव म्हणजेच चार लोकांचा एकत्र मेळावा. सर्वांनीं मिळून भक्तिभावाचा आनंद लूटावयाचा. गोपाळरावांस शिरडींत कोणत्या तरी निमित्तानें यात्रा जमावी असें वाटून त्यानीं उरूस सुरू केला. त्यानिमित्त गांवोगांवचे लोक व फकीर वगैरे शिरडींत जमा होऊं लागले. त्यांच्या भोजनाची नीट व्यवस्था ठेवावयाची व त्यांची शक्य त्या परीनें सेवा करावयाची. यात्रा भरवायची तर जिल्हाधिकाऱ्याची परवानगी पाहिजे. आरंभ काळीं एका दुष्ट प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यामुळें प्रथम परवानगी मिळवायला अडचण उपन्न झाली ; बाबांच्या कानापर्यंत ही गोष्ट गेली. चार लोक प्रेमभावानें एकत्र जमले व त्यानीं आनंदानें १।२ दिवस घालविले तर त्यांत काय बिघडलें ? बाबांची इच्छा तिच्यापुढें कोणाचे काय चालणार? शेवटीं अधिकाऱ्यानीं परवानगी दिली.

## भीष्म व काका महाजनी

शके १८३३ मध्यें तो वार्षिक उरूस व रामनवमी एकदम आलीं. त्याच सुमारास उरूसानिमित्त भीष्म या नावाचे बाबांचे एक भक्त शिरडींत हजर होते. उरूसाबरोबर पुण्यपावन असा श्रीराम जन्मोत्सवही आपण कां साजरा करू नये ? असें त्यांना वाटू लागलें. ती अर्थातच बाबांची प्रेरणा होती. कोणाला तरी निमित्तमात्र करून जें जें कल्याणप्रद असेल तें तें करावयाचें हीं बाबांची सदाची प्रवृत्ति. त्या काळांत काका महाजनी हे बाबांच्या पूजाअर्चादि नित्यक्रमाची व्यवस्था पहावयाचे व बाबांच्या सन्निद्ध असावयाचे. भीष्म याच्या मनांत रामजन्म साजरा करण्याची कल्पना उद्भवली त्याबरोबर त्यांना फार आनंद झाला. तेथें भीष्म प्रतिज्ञेची जरूरी नसली तरी बाबांच्या कानापर्यंत ती वार्ता जाणें व त्यांचा कल लक्षांत घेणें जरूर होतें. त्यांनीं काका महाजनी यांस आपला मनोदय कथन केला. त्यांनाही तो फार आवडला. रामजन्म साजरा करावयाचा तर रामकथेचें निरूपण करणारा कीर्तनकार पाहिजे. त्याची तर अगोदर व्यवस्था लावणें जरूर होतें. त्याकाळीं त्या खेड्यांत कीर्तनकार मिळणें कठीण होतें. आज ह. भ. प. विठ्ठलराव मराठे हे संस्थानच्या पदरी हुकमी व आपल्या कलेंत पारंगत असें पटाईत कीर्तनकार आहेत. इतर ठिकाणाहूनही शिरडींत बाबांच्या सेवेसाठीं कीर्तनकारांची ये जा सतत चालू असते. त्याकाळीं म्हणजे ५०।५५ वर्षांपूर्वींच्या काळांत ती सोय नव्हती.

## योजना बाबांपुढें कशी आली ?

काका म्हणाले, “ तुमची कल्पना नामी आहे, परंतु कीर्तनकाराचें काय ? ”

“ एवढेंच ना ? मी होतों कीर्तनकार ! तुम्हीं तेवढा पेटीचा सूर धरा म्हणजे झालें ! भीष्म म्हणाले.

सुंठवडा कोणी करावा व इतर कामें कोणी करावी त्याचीही योजना या दोघांनीं मिळून केली व ती पास करून घेण्यासाठीं ही मंडळी बाबापाशीं गेली.

काका पूजासाहित्य घेऊन भीष्म महाशयासह मशिदींत बाबापाशीं गेले. पूजा अर्चा चालू असतां बाबानींच प्रश्न केला. “ काय हो ! काय बेत चालला होता आपला सांगा ना आम्हांला ! ”

तो प्रश्न ऐकून केवढा अचंबा वाटला आहे त्या दोघांनाही. त्याबरोबर धीरही आला. बाबाच बुद्धी देणारे व जरूर तें कार्य करवून घेणारे ! मग तेथें अडचण कसली येणार ? काकांचें बोलणें ऐकून घेऊन बाबानीं रामजन्मोत्सव साजरा करण्यास आपली तात्काळ संमत्ति दिली ! एवढेंच नव्हे तर तो शिर्डींतील पहिला वहिला श्रीरामजन्मोत्सव बाबानीं यथासांग करवून घेतला.

ती जी प्रथा सुरु झाली ती बाबांच्या कृपेनें आजतगायत प्रतिवर्षी नेमानें वाढत्या उत्साहानें सुरू आहे. दुसऱ्या वर्षी बाळाबुवा सातारकर यांचें शिरडींत बाबांच्या भेटीनिमित्त आगमन झालें असतां त्यांच्या कीर्तनाचा सुयोग केवळ यदृच्छेनेंच घडून आला.

## श्री दासगणू महाराज

त्यानंतर बाबांचे परमभक्त ह. भ. प. दासगणू महाराज यांचें शिरडींत आगमन झालें असतां बाबानीं श्रीरामजन्मोत्सवाची जबाबदारी विनंतीपूर्वक त्यांच्यावर सोपविली व तो बाबांचा कृपाप्रसाद मानून त्यानीं आनंदानें स्वीकारली. जोपर्यंत शिरडीत रामजन्मोत्सवानिमित्त येणें शक्य होतें तोंपर्यंत स्वतः येऊन ती जबाबदारी त्यांनीं यथायोग्यपणें व अत्यंत सुंदर रीतीनें पार पाडली. त्यांच्या मागून ती जबाबदारी मोठ्या भक्तिभावानें व आनंदानें श्री दासगणू महाराज यांचे पट्टशिष्य व ऋणानुबंधी ह. भ. प. अनंतराव आठवले हे आजवर उत्तम प्रकारें संभाळीत आहेत. एवढचें नव्हे तर त्यांची या उत्सवांतील रसाळ व परिणामकारक कीर्तनें हें एक महत्वाचें व प्रमुख आकर्षण होऊन राहिले आहे.

असा आहे शिरडींतील श्रीरामजन्मोत्सवाचा संस्मरणीय सोहळा.

तो सुखद व रामनामानें गजबजलेला व ज्याच्याकडे सर्व साईभक्ताचें लक्ष लागून राहिलेलें असते असा श्रीरामजन्माचा महोत्सव या महिन्याच्या वीस तारखेस

येत आहे. त्यानिमित्त सतत तीन दिवस शिरडींत असंख्य भक्त जमा होतील आणि रामनामाचा आनंद लुटतील. दरवर्षीप्रमाणें बाबांच्या कृपेनें व सर्वांच्या सस्नेह सहकारानें हा उत्सव पार पडेलच.

**एक विनंती**

प्रिय वाचक ! अशा त्या पुण्यकारक रामजन्मानिमित्त साईलीला रामनामाचा संदेश घेऊन आपल्या भेटीस येत आहे. या अंकांत दरवर्षीप्रमाणें रामकथेस विशेष प्राधान्य देण्यांत आलें आहे. आपणास ही आमची अल्प सेवा आवडेल अशी अपेक्षा आहे.

या रामनवमी अंकाबरोबर 'साईलीला' बाबांच्या कृपेनें नववर्षांत पदार्पण करीत आहे. बाबांच्या शिकवणीचा कल्याणदायक संदेश घरोघर पोंहोचावा हीच आमची एकमेव आकांक्षा आहे. त्यांत आपल्या सहकाराची आम्हांला नेहमीप्रमाणें फार जरूरी आहे. प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास साईलीलेला निदान दोन तरी वर्गणीदार मिळवून देणें फारसें कठीण नाहीं. साईलीलेची सर्व बाजूंनीं वाढ झाली पाहिजे असें आम्हांला फार फार वाटतें. परंतु ही विनंती कोणी लक्षांत घ्यावी ? ही बाबांची एक प्रकारें सेवा आहे. या भावनेनें आमचे वाचक व वर्गणीदार साईलीलेसाठीं जरूर तें अर्थात प्रत्येकीं दोन वर्गणीदार मिळवून देण्याचें आपापलें कर्तव्य पार पाडतील अशी आम्हाला आशा आहे. श्री साईबाबांच्या कृपेनें ती पूर्ण होवो व बाबा आमच्या सर्व वाचक बंधु भगिनीना चिरकाल सुखानदांत ठेवोत हीच शेवटी त्यांच्या चरणीं आमची प्रार्थना आहे.

—संपादक

---

## श्रीराजन्मोत्सवाचा सोहळा

शिरडी येथें श्री रामजन्मोत्सवाचा प्रतिवार्षिक सोहळा एप्रिल ता. १९, २० व २१ या तीन दिवशीं होणार आहे. सर्व भक्तांनीं या उत्सवास हजर राहून शक्य तें सहकार्य द्यावें व उत्सवांतील आनंद लुटावा अशी विनंती आहे.

# सीता-हनुमान भेटीचा तो सुखद सोहळा

*****************************************

**सीतामाई अशोक वनांत दुःखांत काळ कंठीत होती. सभोंवार बसलेल्या राक्षसिणी तिला क्षणोक्षणीं नको नको तें ऐकवीत होत्या. तिचा प्रत्येक क्षण चिंतेत व दुःखांत जात होता.**

परंतु नंतर एकाएकीं तिच्या सभोंवारच्या व मनाच्या वातावरणांत थरेपालट घडून आला. रामभक्त हनुमान उड्डाण करीत करीत अशोक वनांत रामाज्ञेप्रमाणें सीतेच्या भेटीस्तव येऊन दाखल झाले होते.

सीतेचा डावा डोळा लवूं लागला. डावे हातपाय थरथरूं लागले. पुन्हां तिला थोडा धीर आला. आत्मघाताचा विचार तिच्या मनांतून पार निघून गेला.

अशोकवनाच्या भिंतीवर बसून हनुमान हें सारें पाहात होता. पण पुढें काय करावें हेंच त्याला कळत नव्हतें. स्वतःच्या आनंदांत तो मग्न होता.

दुसऱ्या कुणाच्याहि हातून झालं नसतं असं काम मीं केलं आहे. एवढा विशाल समुद्र पार करून मीं इथवर आलों नि अखेर सीतेला शोधून काढली. राक्षसनगराची सर्व तटबंदी मी नीट न्याहाळून घेतली आहे. शत्रूला थांगपत्ताहि लागूं न देतां एखादा हेर जेवढी माहिती काढूं शकेल तेवढी मीं मिळविली आहे. पण आतां हें सारं रामाच्या कानीं घालायला मी इथून गेलों तर तेवढ्या वेळांत इथें काय होईल नि काय नाहीं, हें कुणी सांगावं? राम वानरसेना घेऊन इथें पोंहोंचेपर्यंत सीतेनें आत्मघातहि करुन घेतलेला असेल आणि मग इतकं करून शेवटीं सगळंच मुसळ केरांत गेल्यासारखं होईल, मी सीतेला पाहिली एवढंच पुरेसं नाहीं. आपण तिच्याशीं बोलायला हवं. रामाची वार्ता तिच्या कानीं घालायला हवी. त्यामुळें तिला धीर येईल. तिचं मन आशेनें फुलून निघेल नि आत्मघाताचा विचारहि तिच्या मनांत येणार नाहीं.

'सीतेशी एक शब्दहि न बोलतां मी परत गेलों तर रामाला काय वाटेल! कांहीं तरी करून सीतामाईशीं आपण बोललंच पाहिजे.

## बुद्धिवान् हनुमंत

"बुद्धिमतां वरिष्ठः" असें हनुमानाचें वर्णन करतात यापेक्षां अधिक योग्य असें त्याचें वर्णन करणें कोणाला शक्य आहे?

'सीतेसमोर आपण कोणत्या स्वरूपांत प्रगट व्हायचं? कोणत्या भाषेंत तिच्याशीं बोलायचं? या अशोक वनांत ध्यानींमनीं नसतां एक वानर कुठून तरी आला नि तिच्याशी बोलूं लागला तर त्याच्यावर तिचा विश्वास कसा काय बसणार? साहजिकपणेंच तिला वाटेल, कीं ही रावणाची कांहींतरी लबाडी दिसते आहे. बरं

एकदम तिच्यासमोर जाऊन उभा राहिलों तर ती दचकायची. प्राप्त स्थितींत तर ही शक्यता अधिकच. तिच्या ओरडण्यामुळें झोंपी गेलेल्या राक्षसिणी उठून बसतील नि मग त्यांना मी दिसेन. मी शत्रुपक्षाचा आहे हें ताबडतोब त्यांच्या ध्यानांत येईल नि त्या आपलं सैन्य माझ्यावर सोडतील तुंबळ युद्ध माजेल. मी त्या सर्व राक्षसांना पुरून उरेन हें खरं असलं, तरी त्यामुळें सीतामाईला धीर देण्याच्या आपल्या कार्यांत विनाकारण विघ्न उपन्न होईल आणि यदाकदाचित् मी त्यांच्या हातीं सांपडलोंच तर रामाला सीतेची वार्ता कोण कळवील ? छे, छे, असं अधरिपणें वागून चालणार नाहीं. मी राक्षसांच्या तावडींतून निसटून बाहेर पडलों तरी तोंपर्यंत मी जखमी झालेला असेन आणि माझ्यांत हा समुद्र पार करून जाण्याची शक्तिहि उरणार नाहीं. असं अविवेकानें वागून भागावयाचं नाहीं. जरा धीरानें घ्यायला हवं. सुग्रीव आणि राम माझी आतुरतेनें मार्गप्रतिक्षा करीत आहेत. अशा स्थितींत एखादी लहानशी जरी चूक आपल्या हातून घडली तरी अनर्थ ओढवल्याशिवाय राहणार नाहीं.

'माझ्याबद्दल जरासुद्धां संशय सीतेच्या मनांत येणार नाहीं याची काळजी घेऊनच आपण तिच्या समोर जायला हवं.

'इथें बसल्याबसल्याच, केवळ तिलाच ऐकूं जाईल अशा बेतानें, आपण रामकथा गावी. ती कथा ऐकून तिच्या मनांतील संशयपटल पार वितळून जाईल व तिला धीर येईल.'

असा विचार करून तो एका वृक्षाच्या फांदीआड दडून राहिला आणि अगदीं मंद आवाजांत म्हणाला, "राम, राम."

वृक्षाच्या फांदीआड दडून, केवळ सीतेलाच ऐकूं जाईल अशा बेतानें हनुमान रामकथेचें गायन करीत होता.

गातां गातां थोडा वेळ मुद्दामच थांबला.

त्या गाण्याच्या मधुर शद्बांनीं सीतेचें हृदय आश्चर्यानें व आनंदानें उचंबळून आलें. 'कुठून उमटताहेत हे सूर ? कुठून येताहेत हे शद्ब '? तिनें भोंवतालीं दृष्टिक्षेप करून चाहूल घेण्याचा प्रयत्न केला.

पण त्या वाणीला शोभून दिसेल अशी कोठलीच मनुष्याकृति तिला कोठें दिसली नाहीं. ती ज्या वृक्षाखाली बसली होती त्या वृक्षाच्या एका फांदीवर एक लहानसें माकड तेवढें बसलेलें तिनें पाहिलें.

पण तें एक लहानसें माकड नसून प्रत्यक्ष वायुपुत्र हनुमान, वानरांचा सुज्ञ सचिव आहे, हें तिला कसें उमगणार ? उगवत्या सूर्यबिंबासारखा तो तेथें तळपत होता.

सीतामाईची दृष्टि आपल्याकडे वळली आहे हें पाहातांच त्या रामदूताच्या मनांत आनंद कसा उचंबळून आला असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. ज्या वाचकांना या आनंदाचा प्रत्यय येईल त्यांना आपल्या हृदयांत परमेश्वराचें दर्शन

झाल्याशिवाय राहणार नाहीं. भगवान् नारायण आपल्या हृदयांत प्रवेश मिळविण्यास सदैव आतुर असतो. ज्या हृदयांत पापी भावनांचा मागमूसहि नाहीं अशा हृदयांत स्थानापन्न होण्यासाठीं तो क्षीरसागर सोडावयास मागेंपुढें पाहात नाहीं.

## मनीं वसे तें स्वप्नीं दिसे

हनुमानाला पाहून सीता स्वतःशींच उद्गारली, "मीं ऐकलेले ते शब्द... नि मला दिसत असलेला हा वानर... कशी काय सांगड घालायची या दोघांची? मी स्वप्नांत तर नाहीं? 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' असं म्हणतात ना? रामाशिवाय माझ्या मनांत दुसरा विचार तरी कुठें आहे. कुणीतरी रामकथा सांगत आहे असा मला भासच होत असला पाहिजे. भासच... नुसता भास... नुसतं स्वप्न...

"पण स्वप्नांत माकड दिसणं जवळच्या माणसाच्या दृष्टीनें अशुभ मानलं जातं. तो सर्वसाक्षी परमेश्वर राम—लक्ष्मणाचं रक्षण करो! माझ्या माहेरची माणसें सुखरूप असोत!

"अं हं... पण हें स्वप्न नाहीं कांहीं. माझे डोळे चांगले उघडे आहेत. तो फांदीवर बसलेला वानर मला इथनं चांगला दिसतो आहे. नाहीं, मी स्वप्नांत कशी असेन? नाहीं... हें स्वप्न नाहीं. हें सगळं खरंखुरं आहे. हा वानर म्हणजे रामानें पाठवलेला दूत तर नसेल? देव करो नि तसंच असो. दूत... रामाचा दूत... हे वाचस्पति, मी तुला नमस्कार करतें. हे अग्निदेवा, माझा तुला प्रणाम. हे स्वयंभु, माझा तुला प्रणाम. हे देवतांनो, तुम्हीच माझ्या रक्षणकर्त्या आहांत. देव करो नि हा वानर रामाचा दूत असो!"

सीता आपल्या दृष्टीस पडली या आनंदांत हनुमान होता. तो झाडावरून खालीं उतरला आणि तिच्यापुढें हात जोडून उभा राहिला.

अत्यंत मधुर आवाजांत तो तिला म्हणाला, 'माते, कमलपुष्पाच्या पाकळ्यांवरून जलबिंदु ओघळावेत तसे तुझ्या गालांवरून अश्रु ओघळताहेत. वृक्षाच्या शाखेला रेलून उभी असलेली तूं म्लानवदना कोण आहेस हें मला कळेल काय? तुझे डोळे असे पाण्यानें कशासाठीं भरले आहेत? तूं एखादी देवकन्या किंवा नागकन्या तर नाहींस? तुझ्या तेजःपुंज देहकांतीवरून तरी तूं या मर्त्यलोकीची दिसत नाहींस. तूं चंद्रविरही रोहिणी तर नाहींस? कीं वसिष्ठांपासून वियोग झालेली अरुन्धती आहेस?

"पण नाहीं... अधिक सूक्ष्म नजरेनें पाहिल्यावर तूं एखादी मानवी स्त्रीच असावीस असं वाटतं, दुःखमग्न असूनसुद्धां तूं इतकी सुंदर दिसत आहेस, कीं तूं एखादी राजकन्या असावीस असा विचार मनांत येतो. तूं खरोखर आहेस तरी कोण? ईश्वर तुझं कल्याण करो! जनस्थानाहून जिचं अपहरण रावणानें केलं ती देवी सीता तर तूं नाहींस? रामाची प्रिय पत्नी सीताच का माझ्या डोळ्यांना दिसत आहे?"

हे शब्द ऐकतांच सीतेला मनस्वी आनंद झाला.

## वाल्मीकींचें कौशल्य

" माझ्या राजसा, " ती म्हणाली, " होय, मीच सीता. वैदेही सीता. रामपत्नी सीता. बारा वर्षें मी रामाच्या सहवासांत मूर्तिमंत सुख उपभोगीत होतें. त्यानंतर दशरथ राजानें प्रभु रामचंद्राला राज्याभिषेक करायचं ठरवलं. त्या वेळीं कैकयीनें तिला पूर्वी दिलेल्या दोन वरांची त्याला आठवण करून दिली नि आपल्या भरताला राज्यावर बसवून रामचंद्राला वनवासास पाठविण्याची मागणी तिनें केली. हे वर मिळाले नाहींत तर आपण जीव दिल्याशिवाय राहणार नाहीं, अशी भीतिहि तिनें त्याला दाखविली. दशरथ राजा दिलेल्या शद्वानें बांधलेला होता. त्याला तिच्यापुढें शरणांगति पत्करण्यावांचून गत्यंतरच राहिलं नव्हतं. रामानें पित्याच्या शद्वांसाठीं आपणहून राज्यावर उदक सोडलं. मीहि रामाबरोबर वनवासी झालें. तत्पूर्वीच लक्ष्मणानेंहि रामाबरोबर जाण्याचा निर्धार करून वल्कलं परिधान केली होतीं. आम्हीं तिघांनींहि अयोध्येचा निरोप घेतला नि दंडकारण्यांत प्रवेश केला. तिथेंच आमची वस्ती असतांना एक दिवस रावणानं माझं अपहरण केले नि त्यानेंच मला इथें आणून बंदिवासांत ठेवलं आहे. काय तो निर्णय करण्यास त्यानें मला बारा मासांचा अवधि दिला आहे. त्यांतले दोन मासच केवळ उरले आहेत. ते संपतांक्षणींच मला आत्मघात करून घ्यावा लागेल. "

सीता–हनुमानांचा हा संवाद वाल्मीकींनीं दोन छोट्या सर्गांत वर्णिला आहे. वामनानें दोन पावलांत उभी स्वर्ग–पृथ्वी व्यापली तशी या दोन सर्गांत त्यांनीं संपूर्ण रामकथा सीता–हनुमानांच्या मुखांतून वर्णिली आहे. वामनानें बलीचा अहंकार नाहींसा करून टाकला–तशी सीता–हनुमानांनीं गाइलेली रामकथा तुम्हांलाहि ' मी ' आणि ' माझें ' यांपासून वांचवो !

सीतेला धीर देण्याच्या उद्देशानें हनुमान म्हणाला, "हे वैदेही ! राम-लक्ष्मणांचाच संदेश घेऊन तुझ्या भेटीसाठीं मी इथें आलों आहे."

सीतेचा यावर विश्वासच बसेना. ती उद्गारली, " खरंच ! जिवांत जीव आहे. तोंवर आशेलाहि जागा असते असं म्हणतात तें खोटं नाहीं तर ! "

इंद्राच्या उपवनांतील पारिजातकाला अकस्मात बहर यावा तसें या दोन अनोळखी व्यक्तिंत आत्मविश्वास नि प्रेम बहरायला लागलें होतें. पण तिला अभय देण्यासाठीं म्हणून हनुमानानें एक पाऊल पुढें टाकलें नाहीं तोंच सीतेच्या मनांत संशय निर्माण झाला. तिनें भीतीनें आपले डोळे घट्ट मिटून घेतले आणि त्या वृक्षापासून ती दोन पावलें दूर झाली. हें लक्षांत येतांच हनुमान जागच्या जागीं खिळून उभा राहिला आणि त्यानें विनम्रभावें तिला हात जोडले.

सीता म्हणत होती, " माझी कांहींतरी फसवणूक होते आहे. तूं दुसरा तिसरा कुणी नसून रावणच असला पाहिजेस. मागें संन्याश्याच्या वेशानें येऊन तूं मला इथें

बळजबरीनें पळवून आणलंस. अशा वागण्यानें तुझं कधीं भलं होणार नाहीं. कशासाठीं तूं हा त्रास मला देत आहेस ? जें घडतें आहे तें पाहून माझ्या मनाला किती वेदना होताहेत याची तुला कल्पना यायची नाहीं. तूं स्वतःला क्षत्रिय म्हणवितोस. एका असहाय अबलेचा असा पिच्छा पुरवणं तुझ्या क्षात्रधर्माला शोभतं कां ? ”

तिनें डोळे उघडून पाहिलें नि पुन्हा तिच्या मनांत विचार आला. ‘ छे, छे, हा रावण असणं शक्य नाहीं. याच्या नुसत्या दर्शनानेंच माझ्या मनाला केवढा धीर आला आहे ! नक्कीच हा कुणी शत्रुपक्षांतील नव्हे. याच्याबद्दल असा भलताच संशय घेऊन कसं चालेल ? ’

मग ती हनुमानाला उद्देशून म्हणाली, “ हे वानरा, खरोखरच कां तूं रामाचा निरोप घेऊन आला आहेस ? रामाचं सर्व कुशल तरी मला सांग. माझे कान तें ऐकायला कसे आतुर झाले आहेत ! ”

### हें मायाजाळ तर नाहीं ना ?

पुन्हां तिच्या मनांत संशय आला, मी पाहातें आहे तें मायाजाल तर नाहीं ? रामाची कांहीं चांगली वार्ता कानीं पडेल ही माझी आशा फसवी तर नाहीं ! मी शुद्धीवर आल्यावर माझ्या दुःखांची आंच मला अधिकच जाणवावी यासाठीं तर हें स्वप्न माझा पाठपुरावा करीत नसेल ? पण मी शुद्धीवर तरी आहे कां ? पण हा संशय तरी माझ्या मनांत कां यावा ? मी विचार करूं शकतें आहे, चांगली शुद्धीवर आल्यासारखी बोलूं शकत्यें आहे. पण शंभर योजनांचें अंतर पार करून आपण समुद्रावरून उड्डाण करीत इथें आलों, असं कां म्हणतो यावर एकाद्यानें सहजासहजीं विश्वास तरी कसा ठेवायचा ? नाहीं, नाहीं, हा सारा भास आहे. हा रामाचा दूत नसून प्रत्यक्ष रावणच वेषांतर करून आला असला पाहिजे.

हनुमानाकडे न पहातांच ती कितीतरी वेळ तेथें एकाकी उभी होती.

तिच्या मनांत काय चाललें आहे याचा कयास बांधायला हनुमानाला फारसा वेळ लागला नाहीं. राक्षसांकडून ज्याची एकदां फसवणूक झाली आहे त्याच्या मनांत असेंच संशयाचें आणि भीतीचें वातावरण निर्माण होत असतें, हें त्याला माहीत होतें. या क्षणीं आपण तिला धीर द्यायला हवा, असा विचार करून तो म्हणाला,

“ सूर्यासारखा तळपणारा, चंद्रासारखा शीतल, विष्णूसारखा महापराक्रमी, बृहस्पतीसारखा बुद्धिमान्, मन्मथासारखा सुंदर, अशा रामाचा निरोप घेऊन मी आलों आहे. न्यायनिष्ठ नि विचारवंत प्रभु रामाचा मी दूत आहे.

मी आहे सुग्रिवाचा सचिव. माझं नांव हनुमान. महासागर पार करून मी इथें आलों आहे. त्या दुष्ट रावणाच्या शिरावर मी लत्ताप्रहार केल्याशिवाय राहाणार नाहीं, याची खात्री

असूं दे. माझ्या सामर्थ्यापेक्षां रामाची कृपा माझ्या पाठीशीं होती, म्हणूनच मी एवढा प्रचंड महासागर ओलांडून इथवर येऊं शकलों. माझ्याविषयीं कोणताहि संशय देवीनें मनांत घेऊं नये. माते, मीं सांगितलेल्या प्रत्येक शब्दावर तुझी मनोमन श्रद्धा असूं दे."

हनुमान हें बोलत होता पण त्याचे डोळे अश्रूंनीं डबडबलेले होते.

ती मधुर वाणी ऐकून सीतेच्या मनांत घर करून राहिलेलें दुःख क्षणार्धांत निघून गेलें आणि तिच्या चित्तवृत्ति प्रसन्न झाल्या. ती म्हणाली,

"तुझ्याविषयीं माझ्या मनांत संशय निर्माण झाला याबद्दल मला क्षमा कर. रावणानें एकदां मला फसवल्यामुळें आणि या इथल्या षड्यंत्रांत सांपडल्यामुळें माझ्या मनाची ही अशी स्थिति झाली. हे रामदूता, तुझी नि रामाची प्रथम भेट कशी झाली ! रामाचा वानरांशीं स्नेह जमून यावा हें कसं काय घडलं ? मला सर्व कांहीं सविस्तरपणें सांग."

तिचें मन उल्हसित करण्यासाठीं हनुमानानें पुन्हा एकदा रामगायन केलें आणि तो म्हणाला,

"रामाचा वानरांशीं स्नेह जमला यांत आश्चर्य करण्यासारखं असं काय आहे ! रामाची कृपादृष्टि सर्व प्राणिमात्रांना लाभत असतांना ती वानरांनाच तेवढी लाभूं नये असं थोडंच आहे !"

## राममुद्रिका समर्पण

नंतर त्यानें आपल्याबरोबर आणलेली राममुद्रा तिच्या चरणांवर ठेवली.

सीतेनें ती अधीरतेनें उचलून घेतली नि डोळे भरभरून ती तिच्याकडे पाहात राहिली. आतां रावणाची भीति तिला राहिली नव्हती. हनुमानाविषयीं आतां तिच्या मनांत मुळींसुद्धां संशय राहिला नव्हता. उलट, त्याची जागा आतां उत्कट प्रेमानें घेतली होती. ती म्हणाली,

"कसा रे तुझ्याविषयीं माझ्या मनांत संशय आला !"

मग हनुमानानें आपला सारा कुलवृत्तान्त तिला सांगितला. "खरं म्हणजे मीच माझी स्तुति करूं नये, पण आतां ती करायला कांहीं प्रत्यवाय नाहीं. लवकरच वानरसेना लंकेवर चालून येईल. इथला सारा वृत्तान्त आधीं मीं त्यांच्या कानीं घालायला हवा."

सीतेच्या विरहामुळें राम किती व्याकुळ झाला आहे आणि ती गेल्यापासून तो कसा विरक्त वृत्तीनें राहात आहे, हें हनुमानाकडून ऐकल्यावर सीतेच्या हृदयाचें पाणी पाणी झालें.

आपलें सारें दुःख विसरून ती आतां रामाचाच विचार करूं लागली.

## आपण कळसूत्री बाहुली

सीता म्हणाली, " मित्रा, तूं घेऊन आलेली वार्ता ऐकून मी अगदीं भांबावून गेल्यें आहे. ही वार्ता ऐकून आनंदित व्हावं कीं शोकाकुल व्हावं हेंच मला कळेनासं झालं आहे. विषमिश्रित अमृतासारखी ही वार्ता आहे. माझ्या प्राणप्रिय नाथांचं मजवरील प्रेम हें अमृतासारखं आहे आणि माझ्यावर आलेल्या संकटामुळें तें शोकार्त झालं हें ऐकून कटु विषप्राशन केल्यासारख्या वेदना माझ्या मनाला होत आहेत."

आपलें प्रेम आणि आपलें दुःख शब्दांकित करून ती आपलें मन मोकळें करून घेत होती.

सुखदुःख, आनंद-शोक यांचा छायाप्रकाश मानवी जीवनक्षेत्रांत अव्याहतपणें चालू असतो. हनुमानानें आणलेली वार्ता ऐकून सीतेचें सांत्वन झालें असलें, तरी रामाला अद्याप आपलें विस्मरण झालेलें नसून तो शोकविव्हल होऊन आपल्या शोधार्थ वणवण भटकतो आहे, हें कळल्यावर तिला मनस्वी दुःखहि झालें होतें.

ती म्हणाली, " सुखदुःखाच्या धाग्यानें खेळविलीं जाणारीं आपण सारीं माणसं केवळ कळसूत्री बाहुल्यांसारखीं आहोंत. या धाग्यांच्या पाशांपासून कुणाचीहि सुटका होण्यासारखी नाहीं. माझे नाथ काय, लक्ष्मणभावोजी काय किंवा, मी काय,याला अपवाद कसे असणार ? अफाट महासागरावर वादळाच्या तडाख्यांत सांपडलेल्या नौकेसारखी त्यांची स्थिति झाली आहे, असं तूंच ना मला सांगितलंस ? केव्हां रे ते इकडे येऊन पोंचतील ? प्रिय वानरमित्रा, केव्हां रे त्यांच्या हातून रावणाचा, लंकेचा आणि उभ्या राक्षसकुळाचा समूळ संहार होईल ? अद्याप दोन महिन्यांचा अवधि शिल्लक आहे. तो संपायच्या आंत स्वारी इथें आली तर ठीकच आहे. दुधांत साखर पडेल. हा एवढा निरोप त्यांना सांगावयास विसरूं नकोस. रावणाचा धाकटा भाऊ बिभीषण यानें त्याचं मन वळविण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला. मला रामाकडे परत पाठवून, राक्षसकुळाचा आणि लंकेचा सर्वनाश टाळावा, असा उपदेश त्यानें रावणाला केला. पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. माझ्या परीनें मी माझं धैर्य खचूं दिलेलं नाहीं. रावणाची घटका आतां भरत आली आहे याबद्दल मी निःसंदेह आहे. लवकरच राम इथें येईल आणि माझी मुक्तता करील. माझ्या निर्व्याज मनाला असं राहून राहून वाटत आहे. तें खरं झाल्याशिवाय कसं राहील ? "

## हनुमंताचें अचाट सामर्थ्य

सीतेचे डोळे अश्रूंनीं डबडबून गेले होते. हनुमानाला तिच्या मनाची ही तडफड पाहावत नव्हती.

तो उद्गारला, " माते ! आतांच्या आतां जाऊन मी रामाला इथें घेऊन येतो.

आपल्या प्रचंड सेनेनिशी तो लंकेवर धडक मारील. पण तूं तरी या वेदना आणखी किती दिवस सहन करीत राहाणार आहेस ? तुझी इच्छा असेल तर हो आरूढ माझ्या पाठीवर. क्षणार्धांत महासागर पार करून मी तुला रामाकडे घेऊन जातो. मी हें अगदीं सहजगत्या करूं शकेन. त्याविषयीं तुला कांहींहि शंका असण्याचं कारण नाहीं. अग्नि इंद्रापत हवि घेऊन जातो तसा मी तुला रामाकडे नेईन, हे साध्वी एवढी तरी तुझी सेवा मजकडून घडूं दे. एवढं काम करण्यापुरतंच सामर्थ्य माझ्यापाशीं आहे, असं समजूं नकोस. उभी लंकानगरी मुळापासून उखडून काढून ती तिच्या सम्राटासह रामाच्या चरणावर ठेवण्याची शक्तिहि माझ्या या बाहूंत आहे. बस माझ्या पाठीवर नि पाहा, निमिषार्धांत चंद्र रोहिणीचं मीलन व्हावं तसं तुम्हां उभयतांचंहि होतें कीं नाहीं तें ! ”

हनुमान एकीकडे मोठ्या प्रेमानें व उत्साहानें बोलत असतांनाच दुसरीकडे सीतेला राहून राहून एका गोष्टीचें आश्चर्य वाटत होतें. हा एवढासा वानर आपल्याला समुद्रपार कसा काय घेऊन जाणार ?

सीतेला आपल्या सामर्थ्याविषयीं शंका उत्पन्न झाली आहे, ही गोष्ट हनुमानानें ताडली आणि तत्क्षणींच, तिच्या मनाची खात्री पटवून देण्यासाठीं तो आकाशाच्या दिशेनें वाढूं लागला. त्याचें तें विराट स्वरूप पाहातांच सीतेच्या मनांतील साऱ्या शंका-कुशंका कोठल्या कोठें निघून गेल्या.

हनुमान म्हणाला, “ तूं म्हणतेस त्याप्रमाणें मी एकटाच परत जाईन. पण परत गेल्यावर रामाला काय सांगूं ? मी तुझी भेट घेऊनच परतलों आहे याची कोणती खूण मी त्याला दाखवूं ? ”

हे शब्द कानावर पडतांच आपल्या गत सुखी जीवनाचा चित्रपट सीतेच्या अंतश्चक्षूपुढें उभा राहिला आणि तिचे डोळे पाण्यानें डबडबून निघाले. ‘ खरंच, काय खूण सांगावी याला ? केवळ रामाला नि मला माहीत असलेला एखादा अगदीं निकटचा प्रसंग आपण हनुमानाला सांगितला तर कसं होईल ? हा प्रसंग त्यानें रामाला सांगितला, कीं तत्क्षणींच त्याची व माझी भेट झाली आहे, याबद्दल त्याची खात्री पटेल. माझ्या सांप्रतच्या दुःस्थितीचीहि त्याला त्यावरून चांगली कल्पना येऊं शकेल.’ डोळ्यांत आंसवें आणून, ती आपल्या वनवासाचा वृत्तान्त हनुमानाला कथन करूं लागली.

### एक सुरम्य आठवण

“ चित्रकूटावर आम्ही एकदां विहार करायला गेलों असतांना दमून भागून नदीच्या कांठीं विश्रांतासाठीं बसलों होतों. राम माझ्या मांडीवर डोकं ठेवून झोंपीं गेला होता. तेवढ्यांत एक कावळा तिथें आला नि माझ्या अंगावर चोंच मारून मला त्रास देऊं लागला. एकदां हांकलला तरी पुन्हा तो आला. मग मीं एक जवळचाच

दमड घेऊन त्याच्या दिशेनें भिरकावला. पण तो कांहीं केल्या तिथून जाईना. तेवढ्यांत रामाला जाग आली. डोळे उघडून पाहातो तों हा प्रकार. एक कावळा मला त्रास देत आहे नि मी असहाय होऊन रडत आहें. एक क्षुद्र कावळा मला त्रास देत आहे या कल्पनेनेंच खरं म्हणजे त्याला हसूं येत होतं पण चोंच मारून त्यानें माझ्या अंगावरचें व्रण केल्याचं रामाच्या नजरेस आलं, तेव्हां मात्र तो संतापला. तो कावळा नसून, कावळ्याचं रूप घेऊन आलेला एक असूर आहे ही गोष्ट त्याच्या तत्क्षणींच लक्षांत आली. तें पाहातांच तो कावळा जीव घेऊन पळूं लागला; पण रामानें त्याच्यावर सोडलेलं अस्त्र तो जिथें जाईल तिथें त्याच्या पाठीमागून जातच होतं. शेवटीं दुसरं गत्यंतरच उरलं नाहीं असं पाहून तो मुकाट्यानें रामाला शरण आला आणि त्यानें त्याचे पाय धरले.

"या प्रसगांची नुसती आठवण जरी तूं रामाला करून दिलीस तरी पुरे आहे. आतां फार दिवस मी वाट पाहूं शकत नाहीं. जेवढ्या लवकर इथें येऊन माझी मुक्तता करतां येईल तेवढ्या लवकर ती करावयास त्याला सांग."

बोलतां बोलतां तिचा गळा भरून आला.

थोड्या वेळानें ती म्हणाली, "असाच आणखी एक प्रसंग. आम्ही उभयतां एका अरण्यांतून पायपीट करीत चाललों होतों. मी तर इतकी दमून गल्यें होत्यें, कीं माझ्या कपाळावरून ओघळणाऱ्या घर्मबिंदूंनीं माझा सौभाग्यतिल्कहि पुसून गेला होता. तें पाहातांच रामानें स्वतः एका खडकांतून चिमूटभर तांबडं चूर्ण काढलं नि स्वतःच्या हातानें त्यानें माझ्या भाळावर कुंकुमतिलक लावला. हा प्रसंग तो अजूनहि विसरला नसेल."

जसजशा जुन्या सुखद स्मृति तिच्या डोळ्यासमोरून सरकत होत्या तसतसें तिला अधिकच मडभडून येत होतें. सांप्रतच्या दुःखाची जाणीव तिचें मन सोलून काढीत होती.

ती म्हणाली, "हें रत्न घेऊन जा नि खुणेदाखल रामाला दे. माझ्या लग्नाच्या वेळीं माझ्या आईनें तें मला दिलं आहे नि पित्यानें याचा कुंकुमतिलक मला लावला आहे."

असें म्हणत, पदराच्या टोंकाला बांधून ठेवलेलें एक रत्न तिनें काढलें नि तें हनुमानाच्या स्वाधीन केलें. हनुमानानें अत्यंत आदरपूर्वक त्याचा स्वीकार केला.

त्या रत्नाचा स्पर्श हनुमानाच्या हातांना होतांच, आनंद व अभिमान यांनीं त्याचें मन शिगोशिग भरून गेलें.

त्याचें मन रामाकडे लागलें होतें. मनोमनीं तो रामाकडे केव्हांच जाऊन पोंचला होता आणि सीतेचें कुशल त्यानें त्याच्या कानांवर घातलेंहि होतें. तो अद्यापि लंकेंत होता तो केवळ देहानें!

"मित्रा," सीता त्याला उद्देशून म्हणाली, "इथला सारा वृत्तान्त रामाच्या कानीं यथासांगपणें घाल. त्याला विजयश्री प्राप्त करून देण्याच्या कामीं हातभार लावण्याचं सद्भाग्य तुला लाभणार आहे, हे लक्षांत ठेव."

**निघण्यापूर्वी**

हनुमान तिला धीर देत म्हणाला, "राज्ञी, आतां कसल्याहि शंकेला तूं मनांत थारा देऊं नकोस. महासागरावरून उड्डाण करूं शकणारा मी काय एकटाच वानर आहे ? माझ्यासारखें अनेक वानर तिथें आहेत. सुग्रीवाला काय किंवा त्याच्या सेनापतींना काय, हा महासागर ओलांडणं म्हणजे हातचा मळ आहे. सहस्त्रावधि वानर आमच्यात आहेत जे नभोमंडळ भेदूं शकतात. आपल्यांतील सर्वोत्कृष्ट सैनिकांना क्षुद्र दूतांची कामगिरी देऊन त्यांनी थोडच पाठवलं असतं ? आधि तुझ्या मनांतील दुःख काढून टाक. राम-लक्ष्मणांना पाठीवर घेऊन मी किती सत्वर येथें परत येतों तें पाहा. अखेर राम-लक्ष्मणाच्याच बाणांना या लंकेचा, या रावणाचा आणि उभ्या राक्षसकुळाचा बळी पडायचा आहे, ही गोष्ट विसरूं नकोस. हा दुःखार्णव पार करून तूं पलीकडच्या किनाऱ्यावर गेल्यासारखीच आहेस.

"देव तुझं कल्याण करोत. कांहीं दिवसांच्या अवधींतच हातीं धनुष्यबाण घेऊन राम-लक्ष्मण लंकाद्वारीं येऊन ठेपतील. राक्षसकुळाचा विनाश आतां अटळ आहे. विध्वंस झालेल्या लंकानगरींत आनंदानें उड्या मारणारे वानर तुला लवकरच दिसतील.


"आतां अधिक विलंब या कामी लागणार नाहीं. मी परत जाऊन येथील वृत्तान्त त्यांच्या कानीं घालायचाच काय तो अवकाश आहे. तोंवर आपला धीर खचूं देऊं नकोस."

हनुमानानें तिला सादर वंदन केलें आणि तो जावयास निघाला.

"राम-लक्ष्मणांना माझं कुशल सांग," सीता म्हणाली, "म्हणावं, आतां वेळ लावूं नका. माझे आशीर्वाद तुझ्यामागें सदैव असतीलच."

आणि त्यानंतर हनुमानानें तिचा निरोप घेतला.

अंजनीसुताच्या अतुल धैर्याचें, महापराक्रमाचें या क्षणीं आपण ध्यान करूं या. सीतेला धीर देणारा, तिचें सांत्वन करणारा तो बुद्धिमान् रामदूत होता, ही गोष्ट आपणांस विसरून चालावयाचें नाहीं.



# भोगणें पडे। तुमचें साकडे

## ( सद्‌गुरु व चमत्कार )

लेखक :—द. शं. टिपणीस

**संत तिथें चमत्कार. किंबहुना चमत्कार नाहींत तर संत नाहींत. हें अधिक खरें. सर्व साधारण लोकांचा असा दृष्टीकोन आहे. संत व चमत्कार ही अविभाज्य झाली आहेत. यामुळें संत चमत्कार कां करतात अगर संत असतात तेथें चमत्कार कां घडतात हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे.**

जग खूप सुधारलें असले तरीं सद्‌गुरुची अनादी संस्था आहे तशी चालूच आहे. त्यांत बदल नाहीं. वेळोवेळीं ठिकठिकाणीं सद्‌गुरु अवतरत असतात. अधुनिक शास्त्रामुळें बुद्धीला तर्कांची भलतीच धार चढल्यानें चिकित्सक व वादी बनलेला सुशिक्षित वर्गही सद्‌गुरु भोंवतीं भोळ्या भावड्या जनतेप्रमाणें जमत असतोच. असें कां होतें ? सद्‌गुरुची जरूरी आहे काय ? त्यापासून लाभ कोणता ? ते लोकांना हवेसे कां वाटतात ? अशा प्रकारचे कुट प्रश्न अध्यात्माचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीस केव्हां ना केव्हां तरी सोडविण्याची जरूरी भासते. यास्तव त्यासंबंधी विचार होणें जरूर आहे.

### चमत्काराचा प्रश्न

प्रथम चमत्कारांचा प्रश्न घेऊं. चमत्कार कां होतात ? साधुसंत ते का करतात ? वास्तविक ते सर्व शक्तिमान असतांना त्यांना चमत्काराची जरूरी कां भासावी ? खरें पाहिलें तर साधुसंताना जरूरी नसते, लोकांना जरूरी असते. आई दुधभात करते ती तिला जरूरी असते म्हणून नव्हे तर आपल्या वत्साची गरज पाहून ती तो करीत असते. यामुळें लोकांच्यासाठीं साधुसंत चमत्कार कां करतात असा सरळ प्रश्न असावयास पाहिजे. तसा तो असला तर उत्तरही सरळ आहे. थोड्या विचारानीं ते ध्यानीं येईलही. कोणीही तें सहज सांगू शकेल. त्यासाठीं दुसरा एक प्रश्न विचारांत घेऊं. आपल्या नित्याच्या व्यवहारांतील आहे तो व त्याचे उत्तर आपणा सर्वांस माहीत आहे. व्यापारांत जाहिरातीची जरूरी कां आहे हा तो प्रश्न. हजारों रूपये खर्च करून व्यापारी, कंपन्या, कारखाने वगैरे जाहिराती देत असतात तें कां ? उत्तर सर्वजण जाणतातच. जाहिराती देणारा काय त्या स्वतःसाठीं देत असतो ? लोकांसाठीं तो हा खटाटोप करतो, आणि तो कां तर लोकांचें लक्ष आपल्या मालाकडे खेचून घेऊन गिऱ्हाईक मिळविण्यासाठीं. हेंच उत्तर साधुसंत चमत्कार कां करतात याचे आहे. लोकांना आपल्याकडे खेचून घेण्यासाठीं साधुसंतांकडून चमत्कार केले जातात. परंतु हें पूर्ण उत्तरें नव्हें ! या उत्तरांतून एक

अतिमहत्वाचा प्रश्न निर्माण होतो कीं ज्याच्या उत्तरामध्यें मानवी मनाच्या व्यापाराचें एक सूक्ष्म बीज दृष्टोपत्तीस येतें. यास्तव या प्रश्नाचें उत्तर दिल्याखेरीज मूळ प्रश्नाचें उत्तर पूर्ण होणार नाहीं. चमत्कार म्हणजे साधुसंतांच्या जाहिरातबाजीचा एक प्रकार असें मानल्यास तो एक साधुसंतांचा कमीपणा नाहीं कां होणार ? व्यवहारांतील या साधनाचा उपयोग अध्यात्मासारख्या श्रेष्ठ व्यवसायांतही केला जावा हें काय योग्य आहे ? यांत संतांना कमीपणा नाहीं कां ? सूर्याला आपल्या आगमनाची दवंडी पिटवावी लागली तर मग सूर्याचा सूर्यपणा, सामर्थ्य, तेज तें काय राहिलें ? असा प्रश्न मनांत येणें साहजिक आहे.

**चंद्राप्रमाणें शीतल चंद्र**

समजा सूर्याला उद्यां आपल्या आगमनाची जाहिरात करावी लागली तर तो सूर्याचा कमीपणा होईल कीं ज्याना जागे करावें लागलें त्यांच्या अज्ञानाचे तें द्योतक होईल ? सूर्य उगवलेला एखाद्याला कळलाच नाहीं तर मग त्याला हलवून नको कां जागे करावयला ? मानवी मनाची यंत्रणा इतकी विलक्षण आहे की त्याच्या सर्व सूक्ष्म व्यापाराच्या कार्य कारणभावाचा पूर्ण थांग पत्ता ; साधुसंतांखेरीज अद्याप इतर कोणां शास्त्रज्ञास लागलेला नाहीं आपण स्वताला खूप समजत असलों तरी अंतीं अनेक गोष्टीबद्दल अज्ञानीच आहोत. यामुळें माणसांच्या अज्ञानाला हलवून त्याला जागे करणें संतांना भाग पडतें. सूर्याचें आगमन लोकांना कळेनासे होईल तेव्हां सूर्यालाही आपल्या आगमनाची जाहिरात देण्याचा प्रसंग येईल. कांहीं वेळां असें होतें म्हणून तर सूर्यवंशांतील लोकांसाठीं घड्याळांत गजराची व्यवस्था केलेली आहे. उष्णतेमुळें व रखरखीत-पणामुळें सूर्याचें आगमन चटकन लक्षांत येतें. पण तेंच चंद्राचें पहा. बिचारा थंड, मुद्दाम पाहिल्याखेरीज चटकन नजरेंत भरत नाहीं. बहुरुपी तो त्यामुळें चटकन दिसणें कठीण. संत हे चंद्राप्रमाणें शीतल व बहुरूपी असल्यामुळें कित्येक वेळां ते ओळखलें जात नाहींत. त्यामुळें आपल्या आगमनाची वार्ता देण्यास, लोकांचे आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यास संतांना चमत्काराचें साधन वापरावें लागतें. दुसरें असें कीं चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं ही मानवी प्रवृत्ति आहे. असतील शीते तर मिळतील भूते अशा विचित्र स्वभावाचा मानव आहे. या गोष्टींचा उपयोग शहाणेसुर्ते आपल्या कार्यात करून घेतात. माणसें गोळा करावयाची असतील तर नुसते बोलावून कोणी येणार नाहीं. आईस्क्रीम, खाना, भोजन ठेवा कीं पायलीची पन्नास माणसे मिळतील. अनाहूतही मोठ्या प्रेमानें येणारे पुष्कळ. या मानवी स्वभावाचा उपयोग राजकारणी आपल्या कार्यात भरपूर करून घेतात हें कोणत्याही सरकारच्या अंदाजपत्रकांतील खात्याचे आंकडे पाहिल्यास सहज समजून येईल. त्याच प्रमाणें चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं.

या मानवी स्वभावाचा उपयोग संत करून घेतात. संत झाले तरी त्याना कार्य हें करावयाचेच असते. त्याचसाठीं ते अवतरतात.

## चमत्काराचा उपयोग

चांदोरकरांच्या हातून कांहीं कार्य घडवून आणण्यासाठीं बाबाना त्यांची जरूरी होती म्हणून बाबानीं त्यांना दहावेळां बोलावणें पाठविलें. शिवाजीनें हिरे व हिरकण्या गोळा केल्या. कां ! तर स्वराज्यासाठी त्यांची जरूरी होती. तसेच आपल्या ध्येयपूर्तीसाठीं संतानाही चार माणसाची जरूरी लागते. तेव्हां आपल्याकडे माणसें खेचून घेण्यासाठीं संत चमत्काराचा उपयोग करतात. चमत्कार करणारा मानसिक व शारिरीकदृष्ट्या बलवान असला तर लोक नत होतात. त्यांची बुद्धि चालेनाशीं होऊन ते अशा माणसाच्या मागे लागतात. झाडावर ऐटींत डोलणारे आंबे वाऱ्याच्या एका सोसाट्यानें टपकन गळून पडावें तसें लोक चमत्कार करणाऱ्याच्या पायीं पडतात, हा चमत्कार बाबांच्या जीवनांत भरपूर पहावयास मिळतो. एरव्ही ताठर असणारी माणसें शिर्डीस आल्यावर बाबाचा वारा लागल्यामुळें गोगल गायीसारखी नम्र होऊन त्यांच्या चरणीं लीन झालेल्यांची अनेक उदाहरणें आहेत. सुरवातीला लोक बाबांना वेडा पीर वेडा फकीर समजत. जगकल्याण करणारी ही एक महाविभूति आहे असें बाबासंबंधीं गंगागिरादी मंडळीनीं सांगूनही कोणास खरें वाटेना. तात्या कोते, भगत आदि हाताच्या बोटांवर मोजतां येणाऱ्या मंडळीखेरीज इतरांना बाबा म्हणजे एक वेडा असेच वाटत असे. तेव्हां आपल्याविषयींचें आपल्या लोकांचें अज्ञान घालवून त्यांना जागे करण्यासाठीं बाबांनीं पणत्या पेटवून चमत्कार केला आणि चमत्कार असा झाला कीं, सेनापतीनें उजवी पलट म्हटल्याबरोबर सर्व सैन्यानें एकदम एक साथ उजवी पलट घ्यावी तशी शिर्डीची जनता निमिषमात्रांत बाबाच्या पायाशी नत झाली. व तेव्हांपासून बाबांच्या कार्याला सुरवात झाली.

अशा प्रकारे चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं या प्रमेयाचा उपयोग आपल्या कार्यासाठी संत करीत असतात. परंतु कार्य सुरुं झाल्यावर मात्र या प्रमेयाचा व्यत्यास नमस्काराशिवाय चमत्कार नाहीं याचा ते उपयोग करतात. भक्ताकडून मनःपूर्वक नमस्कार आल्याखेरीज त्याची निष्ठा पारखल्या खेरीज, त्याचें पूर्व पुण्य प्रबळ असल्याखेरीज संत त्याच्या कल्याणाच्या बाबतींत चमत्कार करीत नाहीत. 'पण त्यांचा चमत्कार हा सार्वजनिक स्वरूपाचा होता तर चांदोरकरांच्या मुलीच्या प्रसूती वेळचा चमत्कार वैयक्तीक स्वरूपाचा होता संत चमत्कार करतात याचे एक कारण प्रमेय स्वरूपांत माहित झाले परंतु दुसरें कारण म्हणजे प्रमेयाचा व्यत्यास हे अधिक सबळ व महत्वाचे आहे. त्यांत सद्गुरू कशाला पाहिजे याचेही एक उत्तर समावलें आहे.

### अंतर्ज्ञानाचा चमत्कार

श्री साई सत्चरित्रकार व बाबांचे एक श्रेष्ठ भक्त श्री दाभोळकर पूर्वी सद्‌गुरु-संबंधीं साशंक होते. लोणावळ्यास जो प्रसंग घडला त्यामुळें सद्‌गुरुचा अंतीं उपयोग नाहीं, त्याला शेवटीं आपलें कर्म भोगावें लागते अशी त्यांच्या मनाची खात्री होऊन त्यांनीं शिर्डीस जाणेही रद्द केलें परंतु पुढें श्री चांदोरकरांच्या आग्रहामुळें ते शिर्डीस गेले. बाबांच्या प्रथम दर्शनानेंच पाण्यांत मीठ विरघळावें तशी त्यांची स्थिति झाली व त्यांनीं बाबांना लोटांगण घातलें. संशयाची अभ्रें उडवून लावणारे असले वादळी चमत्कार तर शिर्डीला नेहमींच घडत असत. कारण सूर्याला पाहून तूप हे विरघळावयाचेंच व काजवे पळायचेच. त्यांत बाबांना कांहीं विशेष श्रम नव्हते. आपला मुख्य मुद्दा पुढेंच आहे. पोथी लिहिण्याचा आशिर्वाद दाभोळकरांना देऊन त्यांना हेमाडपंत हे नामाभिधान दिलें व त्यावेळीं रात्रीं वाड्यांत सद्‌गुरुसंबंधीं झालेल्या गप्पांची दाभोळकरादि मंडळींना आठवण करून दिली. हा जो अंत-र्ज्ञानाचा चमत्कार बाबांनीं केला व आपल्या सामर्थ्याची चुणूक दाभोळकरांना दाखविली त्यामुळें सद्‌गुरुचें सामर्थ्य काय असतें याची थोडी फार कल्पना दाभोळकरांना आली. पुढें एका बैठकींत गप्पा मारतां मारतां ‘जंगलांतून जातांना वाटाड्या पाहिजे’ अशा गूढ शद्बांत सद्‌गुरुचें मोल दाभोळकराच्या ध्यानांत आणून दिले.

परंतु सद्‌गुरुच्या सामर्थ्याची, त्यांच्या उपयोगाची व खरेखुरे साधुसंत चम-त्कार करतात त्यामागें त्यांचा कोणता उद्देश असतो याची जाणीव भक्तांना देण्या-साठीं बाबांनीं जो चमत्कार करून दाखविला त्याचा मुख्यतः विचार करावयाचा आहे. या घटनेमुळें सद्‌गुरुच्या उपयुक्ततेचें आणखी एक कारण, चमत्कार करण्या-मागील आणखी एक उद्देश विशद होणार आहे. म्हणून त्या घटनेचा, बाबांनी केलेल्या चमत्काराचा विचार करूं परंतु त्यांतील इंगित पूर्णपणें कळण्यासाठीं कर्म-भोग म्हणजे काय व तो प्रत्येकास कसा चिकटलेला आहे याचा त्रोटक कां होईना पण विचार होणें जरूर आहे.

### कर्म आणि त्याचें फळ

आपण सर्व संसारी आहोंत. रहाटगाडग्याप्रमाणें अखंड चालणारी जन्म-मरणाची परंपरा म्हणजे संसार होय. हा संसार आपण करीत आहोंत. रहाटगाडगें हें वर्तुळाकार असते. वर्तुळाला आदी अंत नाहीं. यामुळें हा संसार अनादि व अनंत आहे. कर्मनिवृत्तीमुळें हें रहाटगाडगें सतत फिरतें राहिलें आहे. या रहाटगाडग्यांत अडकलेलें आपलें हातपाय सोडवून मोकळे होणें म्हणजे मुक्ति. पण हें व्हावें कसें ? कर्मफलाच्या साखळीवर हें रहाटगाडगें फिरत आहे. कर्मामुळें फल व फलामुळें कर्म पुनः फल पुनः कर्म याप्रमाणें ही साखळी चालूच आहे तिला अंत नाहीं.

शेवट नाहीं जोपर्यंत कर्म आहे तोंपर्यंत फल आहे व जोपर्यंत फल आहे तोंपर्यंत कर्म आहे. कर्मामुळें भोक्तृत्व आले व भोक्तृत्यांतून कर्म उद्भवलेंच कीं पुन्हां भोक्तृत्व कीं गाडी आपली चालूच. वृक्षापासून बीज व बीजापासून वृक्ष असें हें आहे. सुरवात कोठून व शेवट कोठें ? कोण सांगणार कोंबडी आधीं कीं अंडें आधी ? या चक्रातून दिसायचें कसें ? मूळ वृक्षच तोडून जाळून टाकला कीं वृक्षबीजाची परंपरा आपोआपच खलास झाली. कोंबडीच कापून टाकली कीं कोंबडी अंड्याची परंपरा बंद पडलीच. शिवण्याचें यंत्र चालविणारें पायच नाहींसें केलें की भोक्तृत्वाची वादी निःप्रभ होऊन पुढील सर्व व्यापार बंद पडलेच. तद्वत् मूळ कर्मच नाहींसें केलें, कर्म करण्याचें सोडून दिले कीं सगळा कारभार आटोपलाच. रहाटगाडगे साफ बंद. खरें आहे. प्रत्यक्षांत असें होणें शक्य नाहीं. कर्म संपूर्णपणें टाकतां येत नाहीं. सोडतां येत नाहीं कीं बंद करतां येत नाहीं असें असेल तर पुन्हां पंचाईत आली म्हणायची. पण निराश कां व्हावयाचें ? भोक्तृत्वाची वादीच तोडून टाकली कीं मग पाय जरी कार्य करीत राहिले तरी पुढील सर्व चक्रें बंद पडून शिवण्याच्या यंत्राचा सर्व व्याप बंद पडेलच पेडल.

## सद्गुरूचें जीवनांत महत्व

यासाठींच अनासक्ती योगाचे आचरण करावें असें भगवद्गीता सांगते. कर्म सोडता येत नाहीं पण फल सोडता येते. आपला हक्क आपण सोडूं शकतो. कर्मण्येवाधिकारस्ते, मा फलेषुकदाचन' ही रहाटगाडग्यांतून सुटका करून घेण्याची गुरुकिल्ली आहे. या साठींच भक्ति, नामस्मरणादि अनेकविध उपाय शास्त्रानें सुचविलें आहेत. अर्थांत हें काम सोपे नाहीं. हें सर्व घडून येण्यास जन्मोजन्मींच्या प्रयत्नांची व कष्टांची जरुरी आहे. परंतु यासाठीं लागणारा धीर व तितिक्षा सर्व साधारण मानवांत असणें शक्य नाहीं. अशा वेळीं कोणीही मानव झाला तरी दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करीलच. ही अपेक्षा सद्गुरु पूर्ण करूं शकतात. इतरांस प्रत्यक्ष देवासही त सामर्थ्य नाही. तापलेल्या वाळूचे चटके पायाला बसत आहेत, जलाभावी घशाला कोरड पडलेली आहे अशा वाटसरूला वाळवंटांतून प्रवास करतांना एकादी हिरवळ दिसल्यास केवढा धीर व दिलासा वाटेल । हिरवळीनें दिलेल्या जीवनामुळें पुढील सर्व प्रवास करण्यास त्यास किती हुरूप येईल ! सद्गुरू हे रखरखीत वाळवंटांतील हिरवळ आहेत. केलेल्या कर्मांचा भोग भक्ताला भोगला पाहिजे. त्याचे त्याला चटके बसत असतात. त्यांतून सुटका नाहीं. पण सद्गुरु भक्ताचा भोग स्वतां भोगून आपल्याला भक्ताचे कष्ठ हलके करूं शकतात. यामुळें भक्ताला हुरूप वाढून तो आपला पुढील प्रवास उल्हासानें पार पाडूं शकतो. आई पाठिशी असल्यामुळें कुठेही निर्धास्तपणें दुडदुड धावत खेळणाऱ्या मुलींची जी मानसिक ठेवण तीच या वेळीही भक्ताच्या मनाची असते. वेळ

पडल्यास भक्ताचा भोग स्वतां भोगून भक्ताचे श्रम हलके करून त्याला जीवंत दिलासा उल्हास देण्याचे सामर्थ्य सद्गुरूच्या ठिकाणी असते. ही गोष्ट बाबानी अनेक वेळा उघड करून दाखविली आहे. नारूच्या वेदनेमुळें मरणाची इच्छा करणाऱ्या डॉ. पिल्लेंना बाबा स्वच्छ म्हणाले आणि तयास पाठविती सांगू। "किमर्थ दहा जन्माचा पांगू अवघ्या दहा दिवस भोगू। **भोगूं विभागून परस्पर**" ॥ ३४–६३॥ यासाठीं सद्गुरूची अत्यंत जरूर आहे व खरखुरे संत याच कारणासाठीं आपल्या सामर्थ्याचा म्हणजे जनतेच्या दृष्टीनें चमत्काराचा उपयोग करतात. ज्या घटनेंत या गोष्टी बाबानीं अगदीं स्पष्टपणें उघड करून दाखविल्या आहेत ती घटना पुढील-प्रमाणें पोथींत नमूद केली आहे.

### भक्त दादासाहेब खापर्डे

गोष्ट लहानच आहे. पण त्यांतील तत्त्व गहन आहे. खापर्डे हे एक बाबांचें श्रेष्ठ भक्त होते ते सहकुटुंब बाबांच्या दर्शनास वेळोवेळीं शिर्डीस जात. एकदां खापर्डे पत्नी मुलाला घेऊन शिर्डीस आल्या. खापर्डे बरोबर नव्हते. बाई कांहीं दिवस शिर्डीस राहिल्या. एक दिवस मुलाला ताप भरला. ताप प्लेगचा होता. मुलाच्या अंगावर प्लेगच्या गांठी उठल्या. एकटी बाईमाणूस घाबरून गेली. बाबांचा आधार होता. त्या धीरावर दोन दिवस काढले. अशा स्थितींत मुलाला घेऊन येथें राहणें बरें नव्हें असा विचार तिनें केला. बाबांच्याकडे गेली व सर्व सांगून घरीं जाण्याची परवानगी मागूं लागली. थोडेसें विषयांतर करतो, क्षमस्व. त्यावेळीं शिर्डीत अशी प्रथा होती कीं शिर्डीत आल्यावर बाबांचें दर्शन घ्यायचे व सांगितलें तर व सांगतील तितके दिवस शिर्डीस राहायचे. जातांना आज्ञा मागावयाची व ती मिळाली कीं मग वंदन करून व उदी घेऊन निघायचें. यांत चूक झाली तर भक्ताला कुठें ना कुठें तरी प्रायश्चित मिळावयाचें. असा अनुभव त्यावेळीं वारंवार असल्यामुळें कोणीहि या गोष्टी डावलत नसत. आजहि बाबांचे एकनिष्ठ भक्त ही प्रथा पाळतात. विनंति ही कीं एवढीच नव्हे तर इतरहि ज्या कांहीं गोष्टी जीवनाला वळण लावण्यासाठीं बाबांनीं सांगितल्या असतील त्याही सर्व भक्तिपूर्वक व बाबावर निष्ठा ठेवून कसोशीनें पाळण्याचा मनःपूर्वक प्रयत्न व्हावा. असो. बाबांच्या पाया पडून ती आज्ञेची वाट पाहूं लागली. बाबा म्हणाले 'बाई कशाला. जाण्याची काय जरूरी. हा बघ तुझा मुलगा बरा झाला, बाबांनीं आपली कफनी कंबरेपर्यंत वर केली. तों काय आश्चर्य प्लेगची चार टळटळीत अंड्या-एवढ्या मोठ्या गाठी उठलेल्या! सर्व थक्क होऊन पहातच राहिले. तों बाबांची वाणी ऐकूं आली—

पहा हें भोगणें पडे। तुमचें साकडे मजलागी ॥

---

# रामभक्त शबरी

************************

लेखक :—श्री. आप्पाराव

**शबरी ही दंडकारण्यांत राहणारी एक साधीसुधी भिल्लीण; परंतु रामचरित्रांत तिचें महात्म्य फार मोठें आहे. ती रामभक्तीकडे कशी वळली व तिच्या जन्माचें सार्थक कसें झालें हा कथाभाग फार बोधप्रद आहे.**

शबरीचें कोणी नव्हतें. तिचा नवरा मरण पावल्यानंतर ती एकाकी जीवन कंठीत असे. अरण्यांत रहायचें. व आसपासच्या भागांत मिळणाऱ्या फळांवर जीवन कंठायचें. नाहीं म्हणायला तिला एक मोठा आधार वाटत असे. तो कोणाचा ? मातंग नामक ऋषीच्या आश्रमाच्या जवळपास ती रहात असे; परंतु ती त्यांच्या दृष्टीस कधींही पडत नसे. आपण अस्पृश्य. आपली सावली पडली तर त्या महात्म्याला विटाळ व्हायचा म्हणून ती नेहमी दूरदूर रहात असे.

## मातंग ऋषीचें दर्शन

एके दिवशीं मातंग ऋषी स्नान संध्या आटोपून आश्रमाबाहेर ध्यानस्थ बसले होते. दूर अंतरावरुन तें शांत, गंभीर ध्यान तिनें पाहिलें. तिच्या मनांत त्याचक्षणीं आदराची भावना उत्पन्न झाली. या महात्म्याची कांहीं ना कांहीं सेवा आपल्याकडून घडावी अशी फार इच्छा; परंतु सावली पडता कामा नये मग सेवा घडावी कशी !

मग ती विचार करूं लागली. ऋषीमहाराजांच्या नजरेस न पडतां त्यांची सेवा कशी करायची ? तिला मार्ग सांपडला. भल्या पहाटे उठून महर्षींसाठीं होमहवनाला लागणाऱ्या काटक्या जमा करुन आणावयाच्या व त्यांची मोळी बांधून ती हळूच आश्रमाच्या दरवाजा जवळ आणून ठेवावयाची. तसेंच महर्षी नदीवर स्नानासाठीं जात असत ती पायवाट झाडून सवरून निष्कंटक करून ठेवायची. मार्गांतील पानें झाडून मार्ग स्वच्छ ठेवावयाचा.

फार चांगली युक्ति सुचली शबरीला. दुसऱ्या दिवसापासून तो उपक्रम तिनें सुरू केला. दिवसभर जंगलांत फिरून फळें जमा करीत असतां होम-हवानासाठीं काटक्या जमा करावयाच्या व पहाटेच्या प्रहरी रस्ता साफसूफ करायचा.

## ही कोण करतें ?

हा तिचा नित्यक्रम महर्षींच्या लक्षांत आल्याशिवाय कसा राहील ? ते

विचारांत पडले. आपल्या नकळत आपली सेवा करणारी व आपल्या इवनासाठीं रोजच्या रोज मोळी कोण आणून ठेवतें हें कोडें त्यांना कांहीं केल्या उकलेना.

एके दिवशीं आपल्या एका शिष्याला हांक मारून मातंग ऋषी म्हणाले, वत्सा रोजच्या रोज आश्रमाच्या दाराजवळ लाकडाची मोळी कोण आणून ठेवते व रस्ता साफसूफ कोण करते, माहित आहे का तुला. ?"

त्यालाही तें कोडें उलगडतां येईना. तेव्हां महर्षि म्हणाले, "मग एक दिवस मुद्दाम पाळत ठेऊन याचा शोध लाव ना !"

"आज्ञा महाराज !" जरूर तपास करतों असें तो शिष्य म्हणाला.

## शेवटीं शोध लागला !

त्या दिवशीं रात्रींच्या प्रहरीं तो शिष्यवर एका झुडपाआड लपून राहिला आणि चौकस दृष्टीनें चौफेर पाहूं लागला.

नेहमींप्रमाणें त्या भिल्लीणीनें मध्यरात्रींच्या सुमारास एक लाकडाची मोळी आश्रमाच्या दरवाजाजवळ आणून ठेविली व ती रस्ता साफसूफ करण्याच्या कामास लागली.

शिष्याला कोडें उलगडलें ! तो झुडपाबाहेर आला व भिल्लीणीला उद्देशून म्हणाला, " बाई ! तूं आहेस तरी कोण ? आणि हें सेवाकार्य न बोलतां व कोणाच्याहि नजरेंत येऊं न देतां तूं कोणत्या उद्देशानें करीत आहेस ? माझ्या गुरुजीनें या गोष्टींचा तपास करण्याची कामगिरी माझ्यावर सोंपविली आहे. तुझी भेट व्हावी अशी त्यांची फार इच्छा आहे. येतेस का माझ्याबरोबर ? "

" येईन, पण ते रागावतील ना माझ्यावर ! मी भिल्लीण ! अस्पृश्य ! त्यांचा कोप होईल ना माझ्यावर ! "

आपल्याकडून कांहीं तरी अपराध घडला आहे. त्याबद्दल आपणांस बोलून घ्यावें लागणार ! अशी भीति वाटूं लागली होती तिला !

तिला भयभीत स्थितींत पाहून तो शिष्यवर म्हणाला, " घाबरण्याचें कांहींच कारण नाहीं ! आमचे गुरुजी फार दयाळू आहेत. ते बोलणार नाहींत तुला. चल, ये माझ्याबरोबर ! "

## क्षमेची याचना

शबरी त्यांच्यामागून जाऊं लागली. इतक्यांत मातंगऋषी आश्रमाबाहेर आले व म्हणाले, " बाई ! तूं किती चांगली आहेस ? रोजच्या रोज माझ्या आश्रमाजवळपासची जागा साफसूफ ठेवणारी व माझ्या यज्ञाला लागणारी लाकडें रोजच्या रोज नेमाने पुरविणारी तूं आहेस तरी कोण ? ही सेवा करण्यांत तुझा काय बरें उद्देश ! सांग ना ! "

शबरीनें दूर अंतरावरून त्या महर्षींला लोटांगण घातले. हात जोडून नम्रतेनें म्हणाली, "क्षमा करा महाराज ! मी याच अरण्यांत सदासर्व काळ रहाणारी. मी कोणाच्याही दृष्टीस पडत नाहीं. मी अस्पृश्य या जगात माझें म्हणायला कोणींही नाहीं. आपली तरी सेवा हातून घडावी असें वाटून मी रात्रीं अपरात्री उठून हातून होईल तें करतें आणखी काय करणार मी!"

मातंग महर्षींला दया आली तिची व कौतुकही वाटलें. आपल्या शिष्यांना उद्देशून ते म्हणाले, "अरे ! हिची काळजी घ्या. आपल्या आश्रमाजवळपास तिला राहूं द्या. तिला रोज अन्नपाणी पुरवीत जा. तिची सेवा मोफत घेऊं नका."

## शबरीची विचार संपदा

शबरी हात जोडून म्हणाली, "महाराज क्षमा करा मला. आपल्याकडून मला कशाचीही अपेक्षा नाहीं. रानावनांतील फळें, मुळें हाच माझा नित्याचा आहार. मला दुसरे कांहीं लागत नाहीं. माझ्यावर आपल्या कृपेचें छत्र असावें एवढीच माझी इच्छा-मला आणखी कांहीं नको. मी एकटीच आहे. या जगांत कोणी नाहीं माझें ! मी एकच मागणें मागते. मी कधीं तरी मरेनच. मला चांगली गती मिळेल. देवाचे चरण मला कधीं तरी दिसतील एवढी माझ्यावर कृपा करा म्हणजे झालें !"

मातंग ऋषींना मोठें नवल वाटलें त्या भिल्लीणीच्या बोलण्याचें ! तिला ना कोणाचा सहवास, ना कसलेंही शिक्षण; पण विचार संपदा किती मोलाची ! क्षणभर त्यांची समाधी लागली. समाधींतून जागे होतांच कृपाळू नजरेनें त्या भिल्लीणीकडे पहात ते म्हणाले, "किती सद्गुणी आहेस तूं ! धन्य आहे तुझी ! तूं पुण्यवान आहेस. तूं कशाचीही भीती बाळगूं नकोस. आमच्या आश्रमाजवळ निश्चिंतपणें रहा. तुझें कल्याण होईल."

त्यानंतर एक आश्रमवासीणी या नात्यानें सारे शिष्य तिच्याकडे पाहू लागले. परकेपणाचा पडदा फाटून त्याचे तुकडे तुकडे झाले. दिवसें दिवस शबरीची भक्ति वाढत चालली. सेवेंत तिला आनंद वाटूं लागला.

## इतरेजनांचा राग

वर्षांमागून वर्षें लोटली. शबरीच्या सेवेंत कधींहि अंतर पडलें नाहीं. त्यांत उत्तरोत्तर वाढ होत गेली, परंतु आश्रमाबाहेरचे लोक तिची सावली घ्यायला तयार नव्हते. एक भिल्लीण, एक अस्पृश्य बाई या नात्यानें पहाणारे लोकही त्या भागांत होते. ती कोणाला कोणत्याही प्रकारें त्रास देत नसे; परंतु तिला त्रास देणारें लोक होतेच. इतर आश्रमवासी तिला शक्य तों टाळण्याचा प्रयत्न करीत. कांहीं जणतर मातंग ऋषीपर्यंत पोहोंचले आणि सांगूं लागलें कीं "कशाला त्या भिल्लीणीला जवळ करतां ? उगाच भ्रष्टाकार कशाला माजावितां?"

मातंग ऋषींनीं कोणाचेंही बोलणें मानलें नाहीं. उलट त्यानाच दोष देऊन त्याची कान उघाडणी केली. त्यांना त्यांचा तो प्रपंच बिलकूल मान्य नव्हता.

अशा स्थितींत वर्षामागून वर्षे गेली. मातंग ऋषी वयोवृद्ध झाले. आपला अंतकाळ अगदी जवळ आला असल्याची चाहूल त्यांना लागली.

**महर्षींचा अंतकाळ**

त्यांना आश्रमवासीयांची सारवासारव करायची होतीं, निर्लोभवृत्तीचें ते महर्षि आपल्यामागें सर्वांचें कल्याण व्हावें एवढीच त्यांची इच्छा. आपला अंतकाळ समीप आल्याचें त्यांनीं सर्वांना सांगितलें. शबरीच्या भाग्याचा क्षण आतां जवळ येऊं लागला. शबरीनें मातंग महर्षींची निर्लोभ वृत्तीनें व एकनिष्ठपणें सेवा केली होतीं. त्या सेवेचें फळ तिला मिळाल्याशिवाय कसें राहील.

सारे आश्रमवासी शिष्य महर्षींसभोवार गोळा झाले. त्यांना त्यांचा आशीर्वाद हवा होता. सर्वांच्या नेत्रांतून अश्रुप्रवाह घळघळत होता; कारण तो कायमच्या ताटातुटीचा प्रसंग होता.

शबरीही महर्षींपुढें डोळ्यांत आसवें आणून व हात जोडून ऊभी राहिली.

**महर्षींचा कृपाप्रसाद**

तिला पहातांच मातंग महर्षि म्हणाले, "बाळे ! ये, माझ्याजवळ बैस. दुःख मुळीच करूं नकोस. तुझ्या पदरी पुण्यसंचय झालेला आहे. मी सांगतों तें शांतपणें एकून घे. अयोध्येचा राजा दशरथ यांचा सुपुत्र श्रीरामचंद्र म्हणजे प्रत्येक्ष भगवान. या दंडकारण्यांत लौकरच त्याचें शुभागमन होणार आहे. बनवासांत फिरतां फिरतां एक दिवस तो या भागांतही येईल. तुझें आदरातिथ्य तो प्रेमानें स्वीकारील. त्याच्या दर्शनानें तुझ्या उद्धार होईल. तेथपर्यंत तूं भक्ति-भावानें रामनामाचा जप करीत रहा. एकनिष्टपणें तूं माझी सेवा केलीस तिचें बक्षीस तुला या रूपानें मिळेल. कसली चिंता करूं नकोस. तुझें कल्याण होईल."

आपल्या इतर शिष्यानाही मातंग ऋषींनीं निरोपादाखल जें कांहीं सांगायचें तें सांगितलें व त्यांनीं त्यांचा व जगाचा कायमाचा निरोप घेतला.

**रामनामाचा ध्यास**

महर्षींचे अखेरचे शब्द शबरीच्या अंतःकरणावर कायमचे कोरले गेले. तिनें रामनाचा सतत ध्यास घेतला. कोठेंही व कोणत्याही स्थितींत असली तरी तिला रामनामाचा विसर कधींही पडला नाहीं. आश्रमवासीयांची पूर्ववत् सेवा करावयाची व फळें, मुळें यावर गुजराण करावयाची. रामनामापुढें तिला दुसरें कांहीं सुचत नसे. तोच तिचा आनंद होता. श्रीरामाकडे तिचें मोठ्या उत्कंठेनें

लक्ष लागून राहिलें होतें. राम दंडकारण्यांत येणार आणि आदेशाप्रमाणें आपल्या भागांत येणार व त्यांचें आपणास दर्शन होणार हाच विचार तिच्या मनांत नेहमीं येत असे. किती उत्कंठेनें ती रामप्रभूची वाट पहात होती! दिवसेंदिवस तिची उत्कंठा वाढत चालली. आज तरी माझ्या रामाचें आगमन होऊन त्यांच्या दर्शनाचा आपणांस लाभ होईल कां? असें प्रत्येक दिवशीं तिला वाटावें. रामाच्या स्वागतासाठी सारा आश्रम तिनें झाडून व सडासंमार्जन करून स्वच्छ ठेवावा. फुलांच्या माळा गुंफून त्यांची तोरणें आश्रमभर लावावी. वनांत फिरून गोड गोड फळें जमा करावीं व तीं परड्यांत भरून ठेवावी. तीं फुलें, फळें सुकून गेलीं म्हणून दूर फेंकून देऊन पुन्हां ताजीं फुलें फळें जमा करून त्यांच्या माळा गुंफाव्या व फळांनीं पुन्हां परड्या भरून ठेवाव्या. माझा राम येईल, तो दमला भागलेला व भुकेला असेल नाहीं कां? किती काळजी वाटत होती तिला रामचंद्राबद्दल!

## रामनामाचा छंद

रात्र म्हणजे झोपण्याची वेळ. परंतु रामवेड्या शबरीला स्वस्थ झोप कुठें लागत होती! उद्यां पहांटे राम येईल असें रोज तिला वाटायचें! भल्या पहांटे उठून तिनें स्नान करावें व फळें फुलें जमा करायला लागावें! सदा सर्वकाळ ती त्याच आनंदांत व त्याच छंदांत वावरत होती. शबरी किती भाग्यवान होती! तिला अहोरात्र रामनामाचा छंद जडलेला होता. 'असा धरीं छंद। जेणें तुटेल हा भवबंध॥'

या काळांत कमलनमन रामाचा विसर तिला क्षणभरही पडला नाहीं. याला म्हणतात भक्ति.

आणि एके दिवशीं तिला कोणाकडून तरी समजलें कीं श्रीरामानें दंडकारण्यांत प्रवेश केला! तिचें ह्रदय आनंदातिशयानें भरून गेले ज्या घटिकेची ती वाट पहात होती, ज्याच्या शुभागमनाची तिला उत्कंठा लागून राहिली होती त्या आपल्या आराध्य दैवताचें दर्शन आतां आपणाला लौकरच होणार आहे! तिचें सर्वांग रोमांचित झालें. तिला दुसरें कांहीं सुचेना. ती इकडे तिकडे सैरावैरा नाचूं लागली. बागडू लागली. त्या दिवशी तिनें गोड व मधुर फळें मिळतील तेवढी जमा केली. किती गोड व पिकलेलीं बोरें तिनें जमा केली होतीं. रामाच्या तोंडांत गोड व सुमधुर फळें पडावी म्हणून तिनें आपल्या दातांनीं तीं चाखून पाहिलीं. किती भोळा भाव होता तिचा? 'देव भावाचा भुकेलेला नाहीं. कां?

## एक कोपायमान मुनी

रामाला प्यायला स्वच्छ व ताजें पाणी लागेल. म्हणून स्वच्छ भांडी घेऊन तीं जवळच्या नदीवर गेली व पाणी घेऊन जात होतीं. त्याचवेळी कोणी एक मुनी स्नान करून जात होते. शबरीनें त्याला पाहिलें व त्याला आपल्यामुळें

कोणत्याही प्रकारची बाधा होऊ नये म्हणून ती बाजूला सरकली. परंतु गडबडीनें जात असतां तिची सावली त्या मुनीवराच्या पायावर चुकून पडली. त्याच्या तें लक्षांत आलें. आपलें पावित्र्य बिघडलें असें वाटून तो रागानें तिला कांहीं तरी बडबडला ! क्रोधायमान झाला. स्नान करून आलेला मी पवित्र ब्राह्मण ! आणि मला अस्पृश्याच्या सावलीचा स्पर्श झाला असें वाटून त्याच्या अंगाचा भडका झाला !

एकदां स्नान केलें तें फुकट गेलें असें वाटून तो परत स्नान करण्यासाठीं नदीवर गेला. पाण्यांत उडी मारणार तोंच त्याला काय दिसलें ? सारें पाणी गढूळ झालेलें व पाण्यावर बारीक बारीक कीटक तरंगत असलेले ! त्याला आश्चर्याचा एकदम धक्का बसला ! स्फटीकासारखें स्वच्छ पाणी होतें, त्याचें रूपांतर क्षणांत असें कसे बरें झालें !

हातानें कीटकांस दूर करून त्या मुनीनें कसेंबसें आपलें स्नान आटोपलें व तो चरफडत मार्गस्थ झाला.

शबरी पाणी घेऊन आपल्या झोपडींत येऊन पोहोंचली तोंच तिला श्रीरामचंद्र अगदी नजिक आले असल्याची सुखद वार्ता समजली. ती आनंदानें बेहोष झाली. राम, लक्ष्मण व सीता यांच्यासाठीं तिनें दर्भासनें मांडलीं. फुलांच्या माळा तयार होत्याच. सारी झोपडी सुगंधी फुलानीं जणू काय नटून फुलून गेली होती. सारें वातावरण कसें अगदीं प्रसन्न होतें.

**शेवटीं श्रीराम आले !**

'माझी शबरी कुठें रहाते ?' असें विचारीत विचारीत राम तिच्या झोपडी-जवळ येऊन पोहोंचले !

ज्या आनंददायी क्षणाची शबरी रात्रंदिवस मोठ्या उत्कंठेनें मार्ग प्रतिक्षा करींत होती, तो क्षण शेवटीं आला ! त्यांना पहातांच शबरीनें त्यांच्यापुढें साष्टांग प्रणिपात घातला. तिला स्वतःची शुद्ध राहिली नव्हती. ती बेभान झाली होती.

कवीनें या प्रसंगांचा उल्लेख करून म्हटलें आहे—

दृष्ट्वा रामं घनश्यामं शबरी पुष्करेक्षणम् ! जटा मुकुट शोभाढ्यं धनुर्बाणधरं तु सा ॥

शबरीला रामदर्शनानें जणुं काय हर्षवायू झाला होता. ती रामासभोंवार गिरक्या मारून सैरावैरा नाचूं लागली. मुखानें रामनामाचा जप चालू होता. लक्ष्मणानें तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, "शबरी ! शबरी ! ! असं काय करतेस ? डोळे उघडून तर पहा ! तुझा राम तुझ्यासमोर उभा आहे. तो तुला भेटायला आला आहे !"

शबरी भानावर आली. रामांचें स्वागत योग्य प्रकारें करायचें आपण विसरूनच गेलें याचें तिला दुःख झालें.

## श्रीरामाचें स्वागत

तिनें पुन्हां रामाच्या पायांवर लोटांगण घातलें आणि क्षमेची याचना केली. रामानें तिला वर उचललें व देवानें आणि भक्तानें एकमेकांस डोळे भरून पाहून घेतलें.

नंतर शबरीनें त्या पाहुण्यांना आसनावर बसवून त्यांचें पाय धुतले व पुसले. त्यांच्या गळयांत सुगंधी फुलांच्या माळा घातल्या आणि फळांच्या राशी त्यांच्या पुढ्यांत आणून ठेविल्या. हात जोडून तीं फळें खाण्याची विनंती करतांना शबरी म्हणाली " हे श्रीराम ! किती दिवसांपासून तुझ्या आगमनाची मी वाट पहात आहे. माझ्या जिवाचा आराम आणि माझें सर्वस्व आज मला भेटलें. मी पावन झालें ! हीं फळें मी स्वःता तुझ्यासाठीं चाखून पाहिलीं आहेत. रोजच्या रोज मी तुझ्यासाठीं या रानावनांत फिरून फळें, फुलें जमा करायची ! सायंकाळ झाली म्हणजे माझी निराशा व्हायची ! भगवंता ! आज तूं आलास, मला भेटलास, माझ्या जन्माचें आज सार्थक झालें ! जे मला हवें हवेंसें वाटत होते तें मला मिळालें एकदांचें !"

शबरीनें भक्ति भावानें अर्पण केलेलीं तीं मधुर फळें रामानें अधाशीपणानें खाल्लीं ! त्याला तीं फारच गोड लागलीं. आणखी खावीं असें त्याला वाटूं लागले. त्या फळांत रामाला शबरीचें प्रेम, भाव, आदी ओतप्रोत भरलेली दिसली.

## सर्वांचें शंकानिरसन झालें.

इतक्यांत आसपासच्या आश्रमांत श्रीराम शबरीच्या झोपडींत आल्याची वार्ता सोसाट्याच्या वाऱ्यासारखी पसरली. त्याबरोबर सारे ऋषी, मुनी आपल्या शिष्यगणांसह रामदर्शनासाठीं शबरीच्या झोपडींत गोळा झालें. ज्या झोपडीला श्रीरामाचे पाय लागले त्या झोपडीचें महात्म्य काय सांगावें ? सर्वांचें आतां आपोआप शंकासमाधान झालें. खुलाशाची जरुरीच राहिली नव्हती.

त्या भागांत कांहीं लोक असे होतें कीं, ज्यानीं मातंगऋषीनें शबरीला जवळ केले म्हणून त्याच्यावर बहिष्कार टाकला होता. त्यांना आपली घोडचूक आतां समजून आली !

## आतां डोळे उघडले।

एक जण म्हणाला, "महाराज ! आम्ही तपस्वी असलों तरी अज्ञानांत वावरत होतो मातंग ऋषीवर आम्ही अज्ञानामुळे बहिष्कार घातला. आतां आमचे डोळे उघडले.

दुसरे एक मुनी म्हणाले, 'महाराज ! ज्या नदीवर आम्हीं स्नानासाठीं जातो. त्या नदीच्या पाण्यात एकाएकी कीटक कसे निर्माण झाले. असा प्रकार यापूर्वी कधीही

घडला नव्हता ! ते कीटक नाहीसे होऊन पाणी पूर्ववत् स्वच्छ कसं बरं होईल ?

ते प्रश्न ऐकून लक्ष्मण हंसला व म्हणाला "मुनीजी ! त्याचें उत्तर मी आपणास देतों. सर्वांचा त्याग करून व अरण्यवास पत्करून आपण साधना करीत अहांत. आपली साधना व आपले तप जगाच्या कल्याणासाठीं आहे. जगाची धारणा आपल्या तपामुळें चालली आहे. आपले जगावर मोठे उपकार आहेत. परंतु मातंग महर्षींची समदृष्टी व सद्विवेक अजून आपल्या ठायी आलेला नाहीं. ज्या निर्मळ दृष्टीनें मातंग ऋषी शबरीला पाहूं शकलें ती दृष्टी आपल्या ठायीं निर्माण झाली पाहिजे. सारी ईश्वराची लेकरें आहोंत त्यात स्पृश्य कोण आणि अस्पृश्य कोण ? तुमची क्षुद्र दृष्टी तुम्हाला नडली. त्यामुळेंच पवित्र जलांत वाणेरडे कीटक निर्माण झालें. त्यापासून तुम्हीं योग्य तो बोध घ्यावा. तिची सांवली तुमच्या पायावर पडली म्हणून तुम्हांला क्रोध आला व तुम्हीं तिची निर्भत्सना केली ! रामभक्ताचा तुमच्याकडून अपराध घडला. आतां तरी तुम्हीं शहाणे व्हावें. तिची क्षमा मागावी. तिचा पुनरपि पुण्यपावन हस्तस्पर्श त्या पाण्याला होईल तेव्हांच तें पूर्ववत् स्वच्छ व निर्मळ होईल."

## राम-शबरी संवाद

राम शबरीच्या भक्तिभावानें संपूर्णपणें भारले गेले होते. शबरीला जवळ घेऊन ते म्हणाले, "शबरी ! भक्तिबळानें तूं मला संपूर्णपणें जिंकलें आहेस. मी खुष झालों आहे. तुला काय हवें तें माग ! मनांत मुळींच शंका बाळगूं नकोस !"

शबरी हात जोडून म्हणाली, "देवाधिदेवा ! काय मागूं मी आपल्याकडे ? मला काय हवें ? तुमच्या भेटीसाठीं मी अहोरात्र घडपडत होतें. तहान भूक सारें विसरून गेलें होतें. जें हवें होतें तें मला मिळालें ! तुमचें दर्शन किती दुर्लभ ! तें मला घडलें ! तुमची मूर्ति मी डोळयांत सांठवून ठेविली आहे. तोच माझा आनंदाचा ठेवा ! ती ठेव सदैव माझ्याजवळ रहावी. 'हेचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ एवढेंच द्या मला."

श्रीराम प्रभू हंसले. "बस्स ! एवढेंच ! तें तूं कधींच मिळविलें आहेस. जा ! तुझ्या साऱ्या इच्छा परिपूर्ण होतील !"

शबरी रामस्वरूपीं रंगून गेली होती. त्याच अवस्थेंत राम राम ! म्हणत तिनें डोळे मिटले ते कायमचेच !

# भरतभेटीचा तो उदात्त प्रसंग

**अतुल पावित्र्य आणि उदात्त स्वार्थत्याग दर्शविणारें पात्र रंगविणारी रामायणांतील भरताची कथा ही केवळ उपकथेपेक्षां कांहीं विशेष सांगते आणि ज्याप्रमाणें गंगातीरावर देवळें उठून दिसतात, त्याप्रमाणें ह्या थोर महाकाव्यांत ही वेगळी उमटून पडते. माणसाचें मन जेव्हां प्रेमानें आणि भक्तीनें धुवून निघतें तेव्हां तें केवढ्या उत्तुंग पातळीवर जाऊन पोहोंचतें ह्याचें दर्शन ही कथा घडविते आणि आपलें हृदय उंचावलें जातें. राम आणि भरत हे ईश्वराचे अवतार असोत कीं ते ह्या देशाच्या कल्पनाशक्तीची केवळ सर्वोत्तम निर्मिति असोत, जगाच्या साहित्यांतील श्रेष्ठ कथांपैकीं ही एक आहे, हें लक्षांत घ्यावें.**

भरताच्या स्वभावाचें मनन केल्यास ज्ञान व भक्ति आपोआप वाथवितां येईल. एखाद्या दुस्याचा आणि आपल्या मनांतील माणसांचा पुनःप्रत्यय घ्यावयाचा असेल तर वाचकानें आपल्या मनांतील सात्त्विक कल्पनेच्या समोर तीं आणावीं, जन्मजात देणगी म्हणून आपल्याबरोबर ह्या जगांत आपण कांहीं शहाणपणा आणि पूज्यबुद्धि आणीत असतों. ही देणगी नेहमींच आमच्यांत असते आणि जरी कधीं कधीं ती पूर्वग्रह किंवा मोह यांनीं दूषित केली जाते, तरी तिच्यामुळें माणसांतील ईश्वरी अंश कायम राहतो. त्यामुळें ती त्याला परत पशुअवस्थेंत जाऊं देत नाहीं.

भरत आणि त्याचा लवाजमा भरद्वाजांच्या आश्रमाकडे येऊं लागला. जेव्हां ते प्रयागारण्यांत जाऊन पोहोंचले तेव्हां थोड्या अंतरावर मध्यभागीं झोपडी असलेली सुंदर वृक्षराई त्यांना दिसली. हाच भरद्वाजांचा आश्रम होय, हें समजून भरतानें आपला लवाजमा मागें ठेविला आणि फक्त वसिष्ठ आणि कांहीं थोड्या वरिष्ठांसह तो आश्रमाकडे योग्य त्या नम्र पद्धतीनें चालूं लागला. आपलीं रेशमी वस्त्राभरणें व शस्त्रें काढून टाकून आणि सोबतीस आपले मंत्रिगण घेऊन वसिष्ठांमागोमाग तो पायीं गेला. थोडें पुढें गेल्यावर मंत्रिगणांसही मागें ठेवून तो व वसिष्ठ पुढें गेले.

जेव्हां भरद्वाजांनीं वसिष्ठमुनींस पाहिलें तेव्हां आपल्या स्थानावरून उठून भरद्वाज त्या थोर अतिथींस भेटावयास पुढें आले आणि अतिथींची पाद्यपूजा करण्यासाठीं त्यांनीं आपल्या शिष्यांस धाडिलें.

भरतानें भरद्वाजांस विनम्रपणें प्रणाम केला. हा कोण आहे हें कळून आल्यावर त्या ऋषीनें राजास शोभेल अशा पद्धतीनें त्याच्याशीं वर्तन केलें आणि त्याचें क्षेम-

कुशल विचारलें. दशरथाच्या दुर्दैवाचा त्यांनीं हेतुपुरस्सर उल्लेख केला नाहीं.

रामायणाचा तामिळ कवि कंबण मात्र इथेंच नाहीं, तर तुळशीदास जेथें वेगळेंच निरूपण करतो अशा अनेक ठिकाणींहि मूळ वाल्मीकीला तंतोतंत अनुसरून लिहितो. जरी कंबण कवि वाल्मीकीला काळजीपूर्वक अनुसरतो, तरी स्वतःच्या कल्पनेनुसार तो अनेक सुंदर कडवीं स्वतःचीं वाढवून लिहितो. जागोजाग असा हात फिरवून कंबण आपल्या वैशिष्ठ्यानें अनेक विचित्र प्रसंग सोपे करून सांगतो. पण त्यानें केलेले बदल फारच थोडें आहेत, तर तुळसीदास मात्र कथेपासून मुक्तपणें दूर जातो. स्वतःचें अस्तित्व विसरून व शरण जाऊन ज्यानें ईश्वरास आपलेसें करून टाकलें आहे अशा थोर भक्ताप्रमाणें कथेमध्यें आपल्याला आवडेल तें स्वातंत्र्य तुळसीदासांनीं घेतलें आहे.

वाल्मीकीप्रमाणेंच कंबणही भरद्वाज आणि भरत यांच्यांतील संवाद लिहितो आणि भरताचा त्वेष मोठ्या रसाळपणें वर्णन करतो.

आज हें वाचतांना भरताबद्दल भरद्वाजांनीं व्यक्त केलेला संशय आपल्याला कदाचित् रुचणार नाहीं. असा संशय येणें गुहासारख्याला स्वाभाविकच होतें; परंतु ज्ञात्या ऋषीला मात्र नव्हे. ऋषीला स्वतःचें समर्थन करावयास लावतांना वाल्मीकीनें असें म्हटलें आहे, "राजपुत्रा, मी तुला जाणतों. तुझें निष्पाप मन अधिक स्पष्टपणें मला कळावें म्हणून मीं तुला असे प्रश्न विचारले."

वाल्मीकीनें चित्रिलेले संन्यासी सर्वज्ञ नाहींत. ते इतर माणसांप्रमाणेंच परंतु, सत्याचा शोध घेणारे आणि आपल्याप्रमाणेंच भीति आणि प्रेम ह्या भावना असलेले असे आहेत. वाल्मीकी रामालाहि देवावतारांपेक्षां वीरपुरुष म्हणून मानतो, त्याप्रमाणें भरद्वाजास रामावरील मायेमुळें भरताबद्दल संशय घेण्यास लावतो. रामावरील प्रेमामुळें तो भरताला लावून बोलतो आणि भरताची व्यथा पाहून व नंतर लगेच आपलें स्पष्टीकरण करून तो भरताचें सांत्वन करतो.

वाल्मीकीच्या सर्व व्यक्तिरेखा उच्चतर मानवी प्रवृत्तींचें दर्शन घडविणाऱ्या पात्रांच्या आहेत. मानवी स्वभावांतून अंधुकपणें दैवी शक्ति कार्य करतात असें महदापत्तींत अथवा अपवादात्मक ठिकाणीं मात्र पाहावयास मिळतें. तुळसीदासाच्या काळांत भक्तिमार्गाची वाढती कमान विविध छटांच्याद्वारें आपला तेजस्वी आविष्कार करीत होती. कंबणाच्या वर्णनांतही भक्तीचें सर्वोत्तम स्थान होतें. तरी वाल्मीकीच्या व्यतिरेषा माणसासारख्याच आहेत हें दाखविण्याची तो सर्व जबाबदारी घेतो आणि कांहीं ठिकाणीं तर मूळच्याहूनहि सरस व सुरस चित्रण करतो.

नेहमींप्रमाणें खाजगी विचारपूस झाल्यानंतर भरद्वाजांनीं भरतास विचारलें, "कारभार सोडून देऊन इकडे कां आलास? तूं अयोध्येसच राहावें हें ठीक नाहीं

काय? आपल्या धाकट्या पत्नीच्या सांगण्यावरून दशरथानें रामाला चौदा वर्षे रानात पाठविलं. त्याप्रमाणें राम, लक्ष्मण व सीता यांसह अयोध्या सोडून आला. अजूनही तुझ्या राजपदांत कांहीं व्यत्यय येईल असं तुला वाटतं काय? आणि दशरथानें जें केलं त्याची पुन्हां खात्री करून घेण्यासाठीं तूं आला आहेस कांय?

हा प्रश्न ऐकतांच भरत रडूं लागला. डोळ्यांत अश्रु दाटून आल्यानें त्याला बड बोलतां येईना. "अशा जीवनापेक्षां मला मृत्युच बरा वाटेल," असें तो म्हणाला.

**भरद्वाजांचा संशय**

त्यानें विचारलें, "महाराज, तुम्ही माझ्याबद्दलहि संशय धरतां काय? माझ्या माहितीशिवाय व माझ्या गैरहजेरींत कैकयीनें जें केलं त्याचा दोष मला लावूं नका. रामानें माझ्याबरोबर अयोध्येस परत चलावं व राजा व्हावं ह्यासाठीं सर्व कांहीं खटपट करण्यासाठीं मी आलों आहे. जन्मभर त्याचा नम्र सेवक म्हणून रहावं असं मला वाटतं. राम कुठें राहतो हें विचारण्यासाठीं मी इथें आलों आहे. घरीं परत चलण्यासाठीं मी त्याला सांगेन, असं असतां तुम्ही माझा संशय धरतां?"

भरद्वाज म्हणाले, "भरता, मला तुझा स्वभाव माहीत आहे. तूं रघुवंशांतील शिरोमणि आहेस. तुझ्या प्रेमाची व निष्ठेची खात्री पटावी आणि तुझी कीर्ति दिगंत व्हावी म्हणून मी तुला प्रश्न विचारले. वाईट वाटून घेऊं नकोस. चित्रकूटपर्वतावर राम वास्तव्य करीत आहे. आज इथें राहून उद्यां तूं व तुझे मंत्रिगण तेथें जा. ह्या आश्रमांत आजच्या दिवस आदरातिथ्य स्वीकारल्यानें मला आनंद होईल."

भरत म्हणाला, "महाराज, आपल्या शुभेच्छा आणि प्रेमळ वचनं हीच आमची मेजवानी. आणखी कशाचीहि आवश्यकता नाहीं"

भरद्वाजमुनींनीं स्मित केलें. कारण एवढ्या सेनेला जेवूं घालण्याचा बोजा ह्या गरीब ऋषींवर टाकण्यास भरत नाखूष होता. ते म्हणाले, "तुझ्या दर्जाला शोभेल अशा पद्धतीनें तुमचा सत्कार मी करीन. तुझी सेना व लवाजमा तूं मागें कां ठेवून आलास?"

भरतानें उत्तर दिलें, "ऋषींच्या आश्रमांत लवाजमा घेऊन येऊं नये. माझ्यामागें इतके लोक आहेत कीं ते इथें आल्यास मोठाच गोंधळ करतील."

ऋषी म्हणाले, "तसं कांहीं नाहीं. त्या सर्वांना इकडे आण."

म्हणून भरतानें तशी आज्ञा सेनेस दिली. मंत्र म्हणत भरद्वाज आपल्या यज्ञवेदीकडे गेले, आचमन करून त्यांनीं विश्वकर्मा, मय, यम, वरुण, कुबेर, अग्नि आणि इतर स्वर्गीय विभूतींना आवाहन केलें व भरतादिकांसाठीं मोठ्या मेजवानीची व्यवस्था व्हावी अशी आज्ञा त्यांना केली.

## आश्रमांत थाटाची मेजवानी

त्यानंतर मोठाच चमत्कार झाला. पूर्वीं वसिष्ठानें विश्वमित्रास दिली होती त्याच-प्रमाणें भरद्वाजाच्या आश्रमांत मेजवानी तयार झाली. फरक एवढाच कीं ह्या वेळीं कोणत्याहि प्रकारचें भांडण नव्हतें. प्रत्येकास हवें तें मिळालें. चंदनाची उटी, फुलें, खाद्यपेयें तसेंच स्वर्गीय कलाकारांचें नृत्य–गायन, वगैरे सर्व कांहीं पुरविण्यांत आलें. बलाढ्य सम्राटांनीं द्यावी त्याहूनही थाटाची मेजवानी झाली. प्रासाद, वाहनें, सेवक, इत्यादि तावडतोब अवतीर्ण झाले. भोजन करणारें स्वतःस विसरून गेले. ह्या आनंदांत भरताचे सैनिक एकमेकांस म्हणूं लागले, "आपण आतां दंडकारण्यांत जाऊंच नये हें उत्तम. आपण अयोध्येलाहि जाऊं नये. आपण इथेंच कायम राहावें."

परंतु, त्यांच्या उपभोग्य गोष्टी त्या दिवसापुरत्याच आहेत आणि खेड्यांतील नाटक संपल्यावर त्या ठिकाणीं ज्याप्रमाणें रंगमंच व श्रोतृवर्ग उरत नाहीं त्याप्रमाणें सकाळीं तें सर्व अदृश्य झालें.

सर्व मंडळी पुरेपूर जेवून लवकरच झोंपीं गेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं भरद्वाज भरतास म्हणाले, "इथून अडीच योजनें अंतरावरून मंदाकिनी वाहते. तिच्या तीरावर निर्मनुष्य अरण्य आहे, आणि दक्षिणेस चित्रकूट पर्वत आहे.

"पर्वताच्या उतारावरील एका पर्णकुटींत तुझे बंधु व सीता हीं राहतात." नंतर कोणत्या मार्गानें जावें ह्याचें स्पष्टीकरण त्यांनीं केलें.

भरद्वाजांचे आशीर्वाद घेण्यासाठीं दशरथाच्या तिन्ही राण्या त्यांच्याजवळ आल्या. भरत म्हणाला, "ही रामाची माता कौसल्याराणी आणि तो शत्रुघ्न. तो ग्रीष्मांतील वेलीप्रमाणें दुःखित होऊन कसातरी तग धरून उभा आहे. आणि ही माझी माता कैकयी, तीच सर्व दुःखाचं कारण आहे." असें म्हणून भरतानें इतर राण्यांबरोबर ऋषीपुढें उभ्या असलेल्या कैकयीकडे बोट दाखविलें.

दुःखानें चूर झालेल्या कैकयीकडे आपले डोळे हळूच रोखून भरद्वाज म्हणाले, "तुझ्या मातेला इतक्या कठोरपणें संबोधूं नकोस. जें झालं तें जगाच्या कल्याणाकरतांच झालं."

आपल्या मातांची ओळख करून देण्याचा हा प्रसंग कंबनानें (तामीळ रामायणाचे लेखक व कवि) गुहभेटीच्या आधीं घातला आहे.

तेथें गुह आदरानें राण्यांबद्दल विचारतो आणि भरत सर्व सांगतो. भरद्वाजांच्या आश्रमांत घडलेलें जें वाल्मीकीनें वर्णिलें त्याहून अधिक यथायोग्य फरक करून कंबनानें वर्णिलें आहे.

कंबणाच्या रामायणांत गुहाला कौसल्येची ओळख करून देतांना भरत म्हणतो, " ही रामाची आई. राम हेंच तिचं धन होतं आणि केवळ माझ्यामुळें ती त्यास वंचित झाली. " सुमित्रेबद्दल तो म्हणतो, " ही लक्ष्मणाची आई. लक्ष्मण रामाचा खरोखर भाऊ आहे. त्याला जें सुख मिळतं, तें मला बिचाऱ्याला कधींच मिळणार नाहीं. " वाल्मीकीप्रमाणेंच कंबणानेंही वनांतील कैकयीची ओळख भरताकरवीं कठोर शद्बांत करून दिली आहे.

भरतानें आपल्या परिवारासह भरद्वाजांनीं दाखविलेला अरण्याचा रस्ता धरला. दुरून त्यांनीं चित्रकूट पर्वत पाहिला. उत्साहानें तें पुढें जाऊं लागले. तेव्हां धुरावरून राम राहात होता ते ठिकाण त्यांना ओळखतां आलें. सर्व लोकांनीं आनंदानें आरोळ्या ठोकल्या. इतरांना मार्गी टाकून भरत पुढें गेला. त्याच्याबरोबर फक्त सुमंत आणि वसिष्ठ गेले.

सीता आणि लक्ष्मण ह्यांच्या संगतींत राम सुखानें कालक्रमणा करीत होता. एके दिवशीं नेहमीप्रमाणें डोंगराच्या उतरणीवर शांतपणें तीं बसलीं असतां अकस्मात् दूरवरून त्यांच्या दिशेनें येत असलेला धुळीचा ढग त्यांना दिसला आणि लगेच मोठ्या जमावानें केल्यासारखा गोंगाट त्यांना ऐकूं आला. वनांतील प्राणीही भयभीत होऊन सैरावैरा धांवत आहेत असें रामास दिसलें. वनांत एखाद्या सेनेनें प्रवेश केला असावा असें वाटलें.

राम लक्ष्मणास म्हणतो, " तुला गोंगाट ऐकूं येत आहे काय? हत्ती, गवे आणि हरिण इकडे तिकडे पळत आहेत. हें काय असावं? कोणी तरी राजा शिकारी-साठीं इथें आला असावा काय? कीं एखादा वाघ अथवा तसाच भयानक, हिंस्र प्राणी हाहाकार करीत येत आहे? पाहा बरं आणि मला सांग. "

### लक्ष्मणाचा संताप

लक्ष्मण एका उंच झाडावर चढला आणि चौफेर पाहूं लागला. उत्तरेकडून एक प्रचंड चतुरंग सेना येत आहे असें त्याला दिसलें. संकटाची सूचना म्हणून ओरडून तो रामास म्हणाला, " दादा, ध्वज फडकावीत एक बलाढ्य सेना शिस्तीनें पुढें येत आहे. आपण सज्ज राहावं. अग्नि विझव. सीतेला सुरक्षित गुहेंत घेऊन जा. आपलीं शस्त्रं घेऊन युद्धासाठीं सिद्ध राहूं या. "

राम म्हणाला, " इतकी घाई करूं नकोस. रथावरील ध्वज बघ आणि कोणता राजा सेनेसह इकडे येत आहे तें सांग. "

लक्ष्मणानें तिकडे पाहिलें आणि तो संतप्त झाला.

" हाय हाय! दादा, हा तर भरत. राज्य मिळूनही त्याचं समाधान झालेलं नसावं. म्हणून तो आपला पाठलाग करीत इथें आला असावा. आपला वृक्षांकित

ध्वज वाऱ्यानें फडफडत आहे. आपला वध करण्यासाठीं तो आला असावा, पण कैकयीच्या ह्या पुत्राचं मरण आज माझ्या हातून चुकत नाहीं अशा धर्मविध्वंसकास मारल्यानें कांहीं पाप घडेल कां ? फक्त आतां प्रश्न एवढाच आहे, कीं आपण त्यांची इथें वाट पहात बसावं, कीं टेकडीच्या माथ्यावर त्यांच्याशीं युद्ध करावं ? आपल्याला दिलेल्या साऱ्या उपद्रवाबद्दल त्याला आज प्रायश्चित्त घ्यावं लागेल. आपल्याला मारायला येणाऱ्याला मारल्यानें खरोखर पाप घडत नाहीं. त्याच्याबरोबर त्याच्या आईच्या लोभाचाही शेवट होईल. वनांतील रस्ते रक्तानें वाहूं लागतील. गजराजानें एखादं झाड उपटून फेंकून द्यावं, तद्वतच मी भरताला जमिनीवर पाडतों. आपण त्याच्या सैन्याचा फडशा पाडून वन्य पशूंना त्यावर पुष्ट करूं."

क्रोधानें भडकलेला लक्ष्मण असें बोलत राहिला.

## रामचा सदुपदेश

रामानें त्यास शांत करणें सुरूं केलें. "तुझ्या मनांत आलं तर सप्तलोकांचाही तूं नाश करूं शकशील हें मला माहीत आहे. ऐक, तूं भरताचा सैन्यासह नाश करशील; पण त्याआधीं तुला एका गोष्टीचा विचार करावा लागेल. आपल्या पित्याच्या आज्ञेचा भंग आणि यशाचा उच्छेद करून तसेंच आपला बंधु मारून आणि अपरंपार दुष्कीर्ति मिळवून, तसेंच राज्यासाठीं युद्ध करून तें प्राप्त झाल्यानेंही आपला असा काय लाभ होणार आहे ? आपल्या आप्तेष्टांना मारल्यावर जें पदरीं पडेल तें विषयुक्त अन्नासारखंच असेल. वैभव व राज्य आपण कोणासाठीं आणि कशासाठीं मिळवावं ? इतरांचा आनंद हाच जर आपला आनंद, तर हें सारं इतरांसाठींच ना ?

"अनिष्ट मार्गानें राज्य मिळाविणं कुणाला बरं वाटेल ! आणि ज्यांच्यावर तुझं प्रेम आहे त्यांच्यासह जर राज्याचा उपभोग घेतां येत नाहीं, तर त्यांत काय बरं आनंद आहे ! मी तुला खरोखर सांगतो कीं तूं, भरत आणि शत्रुघ्न माझ्याबरोबर जर सुख भोगावयास नसाल, तर मी संपत्ति आणि सत्ता ह्यांच्याकडे ढुंकूनही पाहणार नाहीं.

"आतां भरत इथें कां येत आहे, हें मला माहीत असल्यामुळें मी तुला सांगतों. तो धर्मनीती जाणतो. राज्य मला द्यावं म्हणून तो येत आहे. आपल्या दूरच्या आजोळी न राहतां जर तो अयोध्येंत असता तर त्यानें कैकयीस परावृत्त केलं असतं आणि दुःखातिशयानें घायाळ झालेल्या आपल्या पित्याला वाचवलं असतं. मला अयोध्येस परत न्यावं म्हणून तो येत आहे, हें नक्की. भरताबद्दल वाईट विचार करणं आणि तिरस्कारानें बोलणं चांगलं नाहीं. राज्याची अभिलाषा जर तुला इतका संशयी आणि क्रूर बनवीत असेल तर मला सांग मी भरतास तुला तें द्यावयास सांगतों. तो तें खुशीनें तुझ्या स्वाधीन करील ह्याबद्दल मला

तिळमात्र शंका नाहीं." राम असें हंसतमुखानें म्हणाला आणि लक्ष्मण लज्जेनें खजिल झाला.

लक्ष्मण म्हणाला, "कदाचित् आपला पिता दशरथ आपणांस पाहावयास येत असेल."

रामाचें भाषण ऐकून त्याची खात्री झाली कीं आपली भीति व्यर्थ होय. त्यास आश्चर्य वाटलें. कीं ही सेना कां म्हणून येत आहे ? त्यास वाटलें, कीं राजा दशरथ वनांत आपल्याला भेटावयास येत आहे आणि राजामागें मोठा लवाजमा आहे. भाष्यकारांनीं म्हटलें आहे, कीं भरताबद्दल वाईट बोलण्याची आपली चूक लक्ष्मणास कळून चुकली व आपली लज्जा झांकण्यासाठीं तो कांहीं स्पष्टीकरण करूं लागला.

रामानें लक्ष्मणास उत्साहित करण्यासाठीं म्हटलें, "तूं म्हणतोस तेंहि खरं असावं. वनवास कठीण असं वाटून राजा स्वतः आपणास व निदान सीतेस परत अयोध्येस न्यावयास आला असेल. परंतु असं असल्यास आपल्या पित्याचं शुभ्र छत्र तर दिसत नाहीं. पण कांहींहि असो, तूं शांत रहा.

लक्ष्मण हात जोडून लीनतेनें रामाजवळ उभा राहिला.

शत्रुघ्न, वसिष्ठ व सुमंत्र यांसह भरत पुढें निघाला. ते जसजसे पुढें गेले, तसतशा त्यांना आश्रमांत वस्ती असण्याच्या खुणा दिसूं लागल्या. नदीकडे जाणारी एक पाणंद होती आणि रात्रींही चालणें सोपें जावें म्हणून दुतर्फा झाडें होतीं. इतक्यांत ते एका पर्णकुटीपाशी आले. जवळ लांकडांच्या मोळ्या व वनचरांच्या शेणाच्या गोवऱ्या, इत्यादि हिंवाळ्यांतील उपयोगी वस्तु सांठविलेल्या होत्या. पर्णकुटींत भिंतीवर बलिष्ठ धनुष्यें आणि तीक्ष्ण बाणांचे भाते, वीरश्रीनें चमकणाऱ्या तलवारी आणि कितीएक उत्तमोत्तम आयुधें टांगलीं होतीं. झाडांच्या फांद्यांवर वल्कलें वाळत घातलेलींहि त्यांना दिसलीं. आश्रमांतील आपल्या बंधूंच्या वास्तव्याचीं हीं चिन्हें, भरतानें भरल्या अंतःकरणानें पाहिलीं. आंतून आन्हिक यज्ञाहुतींचा धूर येत होता आणि प्रवेश करतांच भरताला यज्ञकुंडांत भडकणाऱ्या ज्वाला व जवळच बसलेला राम दिसला. जटाजूट धारण केलेला आणि हरिणाजिनें व वल्कलें नेसलेला असला तरी तो विशालस्कंध व प्रतावान् भासत होता. असा सर्व जगाचा स्वामी पाहातांच त्याच्याबद्दल प्रेम व आदर वाटेल अशी त्याची मुद्रा होती आणि त्याच्या जवळच सीता आणि लक्ष्मण बसलीं होतीं.

## राम-भरत भेट

आपल्यावरील दुष्कीर्तीच्या अखंड विचारांत गुरफटलेल्या व रामाला भेटल्यावर काय बोलावें ह्याची चिंता करीत असलेल्या भरतानें जेव्हां प्रत्यक्षांत रामाला पाहिलें, तेव्हां हे सर्व विचार नाहींसे होऊन, रामावरील प्रेमोद्रेकानें तो बसला होता तेथें तो धांवतच गेला. "दादा" ह्यापलीकडे त्याच्या तोंडून शब्द निघेना. रामाच्या पायांवर

त्यानें लोळण घेतली आणि तो हुंदके देऊं लागला. तेवढ्यांत सुमंत्र आणि गुह तेथें आले.

रामानें समोर विनवणीसाठीं हात जोडून भूमीवर पडलेल्या जटा-वल्कलधारी भरताकडे पाहिलें. उपवास आणि शोक ह्यामुळें कृश झालेला भरत अतिश्रमानें व उन्हातान्हानें काळवंडला होता. रामानें त्याला उठविलें व आलिंगन दिलें. त्यानें त्याच्या मस्तकाचें चुंबन घेतलें आणि मग तो म्हणाला, "प्रिय भाई, आपल्या पित्याला सोडून वनांत असा कां आलास ? तूं इतका कृश कां झालास ?"

रामानें त्याला, कालांतरानें राजपुरुष एकमेकास भेटले तर जसे औपचारिक प्रश्न विचारतात तसे विचारले. भरत कांहीं बोलला नाहीं. थोड्या वेळानें तो सावरला व त्यानें उत्तर दिलें, "दादा ! मी जणूं राजाच आहे असं समजून तूं मला राज्याबद्दल प्रश्न कां बरं विचारावेस ? राज्याचा व माझा काय संबंध आहे ? तूंच खरा राजा असतांना मी स्वतःस राजा कसा म्हणवून घेऊं नि राज्यधुरा कशी वाहूं ? तुझी अल्पस्वल्प सेवा हाच माझा धर्म. पण ती माझ्या नशिबांत दिसत नाहीं. जेष्ठ पुत्रानें राज्याचा भार वाहावा अशी नीति व प्रथा आहे. माझ्याबरोबर अयोध्येस चल, राजमुकुट धारण कर व तुझ्या कृपाप्रसादाची राजवंशावर नि राज्यावर सर्वत्र वृष्टि कर. आपला वृद्ध पिता कार्यभाग उरकतांच स्वर्गवासी झाला आहे. तूं अयोध्या सोडून वनवासांत गेल्यावर व मी केकयाहून परत यावयाच्या आधींच तुझ्या वियोगानें राजानें प्राण सोडला. शोकाविव्हल होऊं नकोस. आपल्या पित्याला मंत्रांजलि दे. तुझ्याबद्दल विचार करीत असतांनाच ते मृत्यु पावले म्हणून तुझ्या मंत्रांजलीनें त्यांचा आत्मा शांत होईल." अशा रीतीनें भरतानें शांतपणें निवेदन केलें.

पितृनिधनाच्या वार्तेनें कुठाराघातानें पडणाऱ्या वृक्षाप्रमाणें राम खालीं कोसळला. कौसल्या, गुह व भरद्वाज ह्यांच्यासमोर करावे लागले तसे क्षमायाचनादि प्रकार रामासमोर भरताला करावे लागले नाहींत. रामानें आपली दृष्टी त्या शोक-ग्रस्त शरीराकडे व विकल मुखावर टाकल्यावर स्पष्टीकरणादि प्रकाराची जरूरीच कोठें होती ? रामास अयोध्येस परत घेऊन जावें एवढाच भरताचा हेतु होता. म्हणून तो तेवढेंच बोलला नि स्वतःबद्दल मुग्ध राहिला.

ते सर्व राजकुमार, सीता व सुमंत्रा यासह नदीतीरीं गेले आणि दिवंगत राजाच्या आत्मास मुक्ति मिळावी म्हणून त्यांनीं पिंडप्रदान केले. इतरहि संस्कारक्रिया करून ते पर्णकुटींत परत आले. परस्परांचा हात धरून त्यांनीं मोठ्यानें शोक करून दुःखभार हलका केला.

भरतभेटीच्या या कथेंत रामानें भरतास राजनीतीबद्दल दीर्घ उपदेश केल्याचें वाल्मीकि—रामायणांत आढळतें. अशा नीतिबोधावरील अथवा राजकारणावरील दीर्घ चर्चा आपल्या महाकाव्यांत वारंवार दिसून येतात. आधुनिक ललित

वाङ्मयांत कथनकौशल्य, नाट्य, विस्मय, इत्यादि गोष्टींना अधिक महत्व दिलें जातें पुरातन ग्रंथात अशा गुणसमुच्चयाबरोबर नीतिबोधामृतीह पाजले जातें. प्राचीन टीकाकांरानींहि वाल्मीकी —रामायणांतील अध्यायांची गल्लत वा अदलाबदल केलेली आहे, हें नमुद केलेलें आहे. कंबणानें मात्र हा योग्य फेरफार करून आधुनिकत्व आणलें. तुलसीरामायणांत राम–भरतभेट भक्तिमध्यें बुडून गेलेली आहे. व त्यामुळें त्यांत गोंधळ होण्यास जागा नाहीं.

## तें हृदय हेलावणारें दृश्य

जेव्हां सर्व माता-पुत्र पुन्हां एकत्र आलीं, तेव्हां सर्व सेना–परिवारांत एकच आनंदाची लाट उसळून गेली आणि तें सुखकर दृश्य पाहावयास सारे पुढें आलें. आतां राम निश्चित अयोध्येस परत येईल म्हणून ते एकमेकांस प्रेमानें मिठ्या मारूं लागले.

वसिष्ठमुनींनीं तिन्ही राण्यांना आश्रमाकडे नेलें. रस्त्यांत त्यांना मंदाकिनी नदी लागली. जेथून राम–लक्ष्मण रोज पाणी नेत असत, ती जागा जेव्हां त्यांनीं पाहिली तेव्हां कासल्या आणि सुमित्रा भावना अनावर होऊन, हुंदके देऊन रडूं लागल्या. कौसल्या म्हणाली, “सुमित्रे, ह्या डोहांतून तुझा मुलगा रोज पाणी भरतो. रामासाठीं कोणतंहि हलकं काम करण्याची लक्ष्मणाची तयारी आहे. आपल्या सुकुमार खांद्यांवर पाण्याचं वजन त्यास जाणवत नाहीं.”

दशरथाला ज्या ठिकाणीं पिंडप्रदान केलें तें ठिकाण त्यांनीं पाहिलें. पिंडापाशी दक्षिणाभिमुख पडलेलें दर्भ पाहून कौसल्या म्हणाली, “सुमित्रे, बलाढ्य राजानाहि मृत्युनंतर अशा अन्नावर जगावं लागतं.”

पर्णकुटींत पोंहोंचल्यावर त्यांनीं शाकारलेल्या छपराखालीं शोकाकुल होऊन बसलेले राजकुमार पाहिले. तें दृश्य असह्य होऊन राजमाता भूमीवर कोसळल्या.

जेव्हां रामानें कौसल्येस उचललें, तेव्हां आपल्या सुकुमार हातानें त्याला गोंजारतानां ती एकाच वेळी दुःखी आणि सुखी झाली. सीतेला आलिंगून ती म्हणालीं, “वत्से जानकी, तूं वनांतील या आश्रमांत रहातेस ! हे देवते, तुझ्याकडे पाहून माझ्या हृदयांत कालवाकालव होते ग !”

बृहस्पतीस वसिष्ठमुनींस आदरपूर्वक वंदन करून राम नंतर आपल्या मातेजवळ बसला. भरत रामाकडे तोंड करून दूर बसला. ज्येष्ठ मंडळीं त्यांच्या भोंवतीं बसली. भरत काय म्हणतो व राम त्यास काय उत्तर देतो ह्याची उत्कंठेनें ते सारें वाट पहात राहिले.

"भरता, तूं राज्यकारभार सोडून मृगाजिन व जटाजूट कां धारण केलींस? इथें कशासाठीं आलास?"

### भरताची विनवणी

भरतानें बोलावयाचा खूप प्रयत्न केला. पण "दादा" ह्या शब्दापलीकडे त्याला बोलतां येईना. दीर्घ प्रयासानें तो म्हणाला, "तुला वनांत धाडल्यावर त्याचंच दुःख सहन न होऊन आपले तीर्थरूप दिवंगत झाले. माझ्या आईच्या कुटील डावामुळें तिला फायदा एवढाच झाला. कीं ती पापी, विधवा आणि अतिशय दुःखी झाली! लोकनिंदेनें ती जणूं पृथ्वीवर नरकयातना भोगीत आहे. तूंच आतां आमचा रक्षण-कर्ता आहेस. सगळे अपराध पोटांत घालून राजा हो व आमचे दुःखाश्रु पुसून टाक. हो विनंती करण्यासाठींच आम्ही सगळें सेना-परिवारासह व राजवंशासह इथें आलों आहोंत. आमच्या विनंतिला मान दे. त्यामुळेंच आमचं समाधान होऊन आपला कुलधर्म परत प्रस्थापित होईल. योग्य राजाशिवाय राज्य अनाथ व निर्धन विधवेप्रमाणें होतं. तूं परत येच, आणि तें प्रसन्न व निष्कंटक कर. उगवत्या पूर्णचंद्राप्रमाणें आमचा अंधःकार नाहींसा कर. येथील मंत्री व मी तुझ्या पायापाशीं ही भीक मागत आहोंत. दादा, ती धिक्कारूं नकोस!" असें म्हणून डोळ्यांत अश्रु भरलेल्या थोर भरतानें श्रीरामचंद्राचे पाय धरले.

रामानें त्यास भूमीवरून उठवून आलिंगन देतांना म्हटलें, "वत्सा, आपण थोर कुळांत जन्मलों असून योग्य रीतीनें आपलं शिक्षण झालं आहे. आपणा दोघांपैकीं कोणीहि निंद्य कृत्य करूं शकणार नाहीं. हे निष्पापा, तुझ्यांत मला कांहींहि दोष दिसत नाहीं. तूं दुःखित होऊं नकोस व तुझ्या मातेबद्दल कठोर शब्द काढूं नकोस. तिला बोल लावणं योग्य नव्हे. आपणांस ज्याप्रमाणें राज्याभिषेकाची आज्ञा देण्याचा त्याचप्रमाणें वनवासास धाडण्याचाहि अधिकार आपल्या पित्यास निश्चितच होता. आपल्या मातापित्यांचं आज्ञापालन करणं हेंच आपलं कर्तव्य होय. त्यांच्या आज्ञेचा अवमान मी कसा करूं?

"त्यांनीं तुला राजपद दिलं व मला वनवास सांगितला. आपला जीवनक्रम आंखुन देण्याचा अधिकार त्यांस निश्चितच आहे. त्यांत बदल वा त्याचा अव्हेर करण्याचा आपणास काय अधिकार आहे? राज्यकारभार पाहणं हें तुझं कर्तव्य आहे, त्यांत कांहींहि वावग नाहीं आणि मीहि चौदा वर्षें दंडकारण्यांत राहून आपल्या पित्याची अंतिम आज्ञा पाळण्याचं माझं कर्तव्य पार पाडीन. पित्याची इच्छा अपुरी ठेवून मला सर्व जगाचा स्वामी होऊनसुद्धां समाधान लाभेल काय?"

भरत पुनःपुन्हा रामास विनवणी व आग्रह करूं लागला. रामास कळून आलें, कीं भरतास दुःख होत आहे तें आपल्यामुळेंच अन्याय झाला ह्या विचारानें होत आहे

व हा कलंक नाहींसा करण्यासाठीं त्याचा यत्न चालला आहे, राम म्हणाला, " तूं स्वतःस दोष देऊं नकोस. तुझ्यामुळें हें सर्व घडलं असं समजूं नकोस. ईश्वरेच्छा बलीयसी. शोक आंवर. अयोध्येस जा व राज्यशकट हांक. परमपूज्य पित्यानें नेमून दिलेल्या कर्तव्याचं पालन आपण करूं या. "

तेथें उपस्थित असलेल्या लोकांना रामाचा हा निश्चय पाहून एकाच वेळीं हर्ष आणि शोक झाला. भरताचें प्रेम पाहून त्यांना अभिमान व संतोष झाला.

## रामाचा वज्रनिर्धार

रामानें भरतास आपला वज्रनिर्धार सांगितला, " मी माझ्या पित्याचं वचन मोडणार नाहीं. माझी मनधरणी करण्याचं थांबवशील तर मला आनंद होईल. राज्य-कारभारांत शत्रुघ्न तुला साहाय्यक आहे. त्याचप्रमाणें लक्ष्मण इथें वनवासांत माझ्या सोबतीस आहेच. लक्ष्मणाच्या संगतींत मला कशाचीही उणीव भासत नाहीं. भाई, आपण चौघेहीजण आपल्या पित्याची इच्छा पार पाडूं.

एवढ्यांत जाबाली नामक जे विद्वान ब्राम्हण भरताबरोबर आले होते त्यांनीं रामाला व्यवहाररहस्यबोध केला, " तूं वारंवार पित्राज्ञेचा उल्लेख करीत आहेस. आतां दशरथाचें शरीर तर पंचमहाभूतांत विलीन होऊन गेलं आहे. आतां जो अस्तित्वांतच नाहीं अशा माणसांत व तुझ्यांत जणूं कांहीं एक अखंड नातं आहे असं मानून तूं बोलत आहेस ही निव्वळ माया आहे. ह्या मूढ धर्मचर्चेच्या आधारें तूं स्वतःकडे चालून आलेल्या वैभवाचा कां त्याग करूं इच्छितोस ? केस पिंजारलेल्या व मूक शोक करणाऱ्या स्त्रीप्रमाणें अयोध्यानगरी तुझ्या परतीची सोत्कंठ प्रतीक्षा करीत आहे. परत जा आणि राजा होऊन जीवनाचा उपभोग घे. भरताचं ऐक. तुझ्या कर्तव्य-पालनांत हयगय करूं नकोस. "

ह्या प्रवचनाचा रामास राग आला. तो तिखटपणें म्हणाला, " आपण सत्यास आणि नीतिमत्तेस फारसं महत्त्व देत नाहीं, असं दिसतं. आपलं व्यवहारिक बोलणं ऐकून मला वीट येतो. आपल्यासारखा नास्तिक राजसभेंत कसा सहन केला जातो ह्याचं मला नवल वाटतं. "

जाबालीनें लगेच स्पष्टीकरण केलें, कीं आपण धर्महीन नसून जन्मभर शास्त्र शिकवीत आलों आहोंत आणि रामास परत नेण्यासाठींच आपण असें बोललों. वसिष्ठ-सुद्धां मध्यें त्यांच्याच बाजूनें बोलले आणि तो विचित्र प्रसंग संपला.

" एकंदरींत माझं मत असं आहे, कीं तूं अयोध्येस परत जाऊन राजा व्हावं. अर्थात् तुझ्या पित्याच्या आज्ञेचाहि विचार केलाच पाहिजे. तूं पित्राज्ञेचं पालन लगेच बेशक केलंस. परंतु आतां वेगळाच प्रसंग उद्‌भवला आहे. अनाथ पापभीरु भरतानें

तुझ्या पायाचा आश्रय घेतला आहे. त्यास तूं कसा लाथाडूं शकतील ? आम्हांस माहीत आहे, कीं तूं जिवापलीकडे त्याजवर प्रेम करतोस. तुझ्याकडे आलेल्या याचकास तूं नकार देत नाहींस. तर मग आतां भरतास कसा परत करतोस ? शरणागतास अभय देणं हें तुझ ब्रीद नाहीं काय ? ”

**अखेरचा उपाय**

परंतु राम कांहीं ऐकण्याचें चिन्ह दिसेना. नंतर भरत सुमंत्राकडे वळून म्हणाला, “ माझ्या बंधूस माझी कींव म्हणून येत नाहीं. दर्भाचं आसन माझ्यासाठीं इथें सिद्ध करा. मी आमरण उपोषण करीन. ”

सुमंत्रानें क्षणभर रामाकडे पाहिलें. तेवढ्यांत भरतानें स्वतः दर्भ आणून पसरविले व तो त्यावर बसला.

राम निश्चयानें म्हणाला, “ वत्सा, हें ठीक नव्हे. ऊठ, अयोध्येस जा आणि तुझं कर्तव्य पार पाड. क्षात्रधर्माच्या विरुद्ध जाऊं नकोस. ”

भरत उठला आणि अखेरचा उपाय म्हणून बरोबर आलेल्या सैनिकांना व नागरिकांना उद्देशून विनविता झाला, “ हे अयोध्येच्या प्रजाजनांनो, तूम्ही मूकपणें पाहात काय बसलांत ? राम परत यावा असं तुम्हांला वाटत नाहीं काय ? मग तुम्ही गप्प कां बसलांत ? ”

लोक उत्तरले, “ राम सत्यापासून ढळणार नाहीं. आपल्या पित्याच्या वचनाबाबत तो अयोध्येस परतणार नाहीं. त्याला आग्रह करण्यांत काय अर्थ ? ”

राम म्हणाला, “ भाई, त्यांचं म्हणणं ऐक. ते आपल्या दोघांचंही कल्याण चिंतितात. त्यांच्या हृदयांत सद्‌गुणांचा वास आहे. ”

भरत म्हणाला, “मी रामाइतकाच निर्दोष आहे व रामाचाच दुसरा नमुना आहे. जर राजाच्या वचनाची पूर्ति करायची असेल तर रामाऐवजीं मला वनांत राहूं द्या. माझ्याऐवजीं त्यानें अयोध्येचं राज्य चालवावं. ”

राम हंसून म्हणाला, “अदलाबदलीचं हें धोरण इथें लागू पडणार नाहीं. हा कांहीं व्यापारधंदा नाहीं' कीं जेथें देवाणघेवाण चालते. एखादे वेळीं एकाचं कर्तव्य केलं तर चालतं, पण त्यांतील एक पक्ष दुबळा असला पाहिजे. तसं इथं नाहीं. वनवासासाठीं माझ्यांत भरताहून कमी ताकद आहे असं कोणास वाटतं काय ? ”

चतुर वसिष्ठांनीं, सत्वशीलतेंतहि वरचढ कोण अशा स्वरूपाच्या या वादावर, एक उपाय काढला, “ भरता, रामाच्या नांवानें त्याचा कारभारी म्हणून तूं राज्य कर. त्यामुळं तुला दूषण लागणार नाहीं. ”

## जणूं दोन तेजस्वी सूर्य

भरतास मांडीवर घेऊन राम म्हणाला, " भाई, राज्य ही माझी तुला भेट समजून राज्य कर. आपल्या इच्छेनुरूप त्याचा नीट प्रतिपाळ कर. "

त्याचक्षणीं राम व भरत विलक्षण तेजानें विलसूं लागले व दोन सूर्यांप्रमाणें ते भासले.

भरत म्हणला, " दादा, तूं मला पित्यासमान व देवासमान आहेस. तुझी किंचित् आज्ञा हा माझा धर्म. मला तुझ्या पादुका दे. तुझ्या पादुका तूं अयोध्येस परत येईपर्यंत राज्य करतील. चौदा वर्षेंपर्यंत मी अयोध्येबाहेर राहून तुझ्या पादुकांची पूजा करीन. तुझ्याऐवजी राजाचं कार्य पाहीन. त्यानंतर तूं परत यावं व तुझं राज्य सांभाळावं. "

" तथास्तु " म्हणून रामानें पादुकांना चरण–स्पर्श करून त्या भरताच्या हातीं दिल्या. भरतानें साष्टांग नमस्कार घालून त्यांचा स्वीकार केला व त्यांना मस्तकीं धारण केलें.

भरत आणि त्याचा लवाजमा अयोध्येस गेला. वाटेंत भेटलेल्या भरद्वाजांस त्यांनीं घडलेली सर्व हकीगत कथन केली. भरद्वाज त्यास आशीर्वाद देऊन म्हणाले, तुझे सद्गुण चिरंतन प्रशंसिले जातील. तूं सूर्यवंशाचाच राजा. उताराकडे वाहणाऱ्या पाण्याप्रमाणें तुझ्या वंशाचे सद्गुण अपरिहार्यपणें तुझ्यांत उतरले आहेत. तुझा पिता दशरथ आतां खरोखर संतुष्ट झाला. तो मृत नसून पुन्हां तुझ्या रूपानें चिरंजीव आहे. "

( श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनीं आपल्या समर्थ लेखणीच्या द्वारें रंगविलेल्या रामायण कथेंतील हा एक उद्बोधक व हृदयाचा ठाव घेणारा प्रसंग आहे. )

—मी कोण आहें ! परमेश्वर, हें सनातन सत्य आहें. त्याची पूर्णपणें जाणीव होणें म्हणजे अहंकापसून मुक्तता करुन घेणें.

—खरा शिष्य कोण ! दुःखापासून कायमची सुटका करुन घेण्याची ज्याला तळमळ लागून राहिली आहे व ज्याला ऐहिक सुखोपभोगांबद्दल आत्यंतिक तिटकारा वाटतो तो.

—रमण महर्षि

# रामायण ही एक प्रेमकथा

—चक्रवर्ती राजगोपालाचारी

**‘ओझें म्हणून कामाकडे पहाण्यांत अर्थ नाहीं. जीवनप्रवाह अनिरुद्धपणें वहात रहावा असें वाटत असेल तर हातीं घेतलेलें काम शक्य तेवढें चांगलें करतां येईल तेवढें करण्याचा प्रयत्न करावा. यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली हीच आहे. फळाची आशा न करतां माणसानें काम करीत असावें.’**

एकदां गांधीजी नि मी एका मुलीविषयीं बोलत होतो.

मी म्हणालों, “ हिनें तर अलीकडच्या प्रेमकथा वाचलेल्या दिसत नाहींत; असं असतांना या सर्व प्रेमविषयक कल्पना नि भाषा तिच्याजवळ कशा आल्या ?

गांधीजी उत्तरादाखल म्हणाले, “ पण तिनें रामायण वाचलं आहे ना ? रामायण ही प्रेमकथा नव्हे वाटतं ” ?

गांधीजींचा हा विचार मला महत्वाचा वाटला.

दशरथराजाच्या मागें जी संकटपरंपरा लागली ती या प्रेमामुळेंच. पुढें रामायणाची मध्यवर्ती कल्पना आधारली गेली ती राम-सीतेच्या प्रेमावरच. अयोध्याकांडांत या प्रेमाचें ललितसुंदर वर्णन आलें आहे.

जें प्रेम धर्माचरणाला सोडून नसतें त्या प्रेमांतून परमेश्वराचें प्रकटन होत असतें. आपल्या दैवी स्वरूपाचें वर्णन करतांना भगवानांनी अर्जुनाला हेंच सांगितलें आहे धर्माचरणाला अनुसरून नसलेल्या प्रेमाचीहि कथा रामायणांत विरोधाभास म्हणून घातली आहे. गांधीजी म्हणतात त्याप्रमाणें रामायण ही खरोखरच एक प्रेमकथा आहे.

रामायणाकडे रूपक म्हणून पाहणारे रामायणाचा वेगळाच अर्थ लावतात. त्यांच्या मतें सीता ही वैय्यक्तिक आत्म्याचें प्रतीक असून राम हें परमेश्वराचें प्रतीक आहे. परमेश्वर शेवटपर्यंत आत्म्याच्या शोधांत असतो, असा याचा अर्थ आहे. आपलें संरक्षण करण्यासाठीं तो डोळ्यांत तेल घालून असतो. या कामीं थोडा जरी विरोध झाला अगर आडकाठी आपण निर्माण केली तर सगळें मुसळ केरांत गेलें असेंच समजावें.

रामायणाचे आणखीहि अर्थ अनेक लावण्यांत आले आहेत. परमेश्वराचें स्त्री-अंग म्हणजे सीता. कारुण्याचें आणि क्षमाशीलतेचें प्रतीक म्हणजे सीता. करूणा ही विश्वाची माता आहे आणि म्हणूनच परमेश्वराच्या हृदयांत ती सिंहासनाधिष्ठित झालेली

आहे. ही विश्वमाता आपल्याकडे जेव्हां कृपाकटाक्ष टाकते तेव्हां भगवंताच्या चरणांना आपण स्पर्श करूं शकतो. पार्वती-परमेश्वर किंवा लक्ष्मी-नारायण हीं प्रतीकेंहि एकात्मकच आहेत. एकाच कल्पनेचे ते दोन अविष्कार आहेत एवढेंच. परमेश्वर हा विश्वाचा पिता आहे तसाच माताहि आहे. या दोघांत अंतर असें नाहींच. करुणा आणि परमेश्वर यांची फारकत झाली असती तर सीतेचें अपहरण केल्यावर रावणाची जी दुर्दशा झाली तशीच ती आपलीहि झाली असती.

खऱ्या व कळकळीच्या प्रेमामधूनच परमेश्वरी कार्याचा साक्षात्कार होत असतो.

जातिवंत हिऱ्यांतून जसे अनेकविध रंग आविष्कृत होतात तसेंच रामायणांतून अनेकविध अर्थ काढतां येतात. रामायणांतील काव्याचा रसास्वादहि अनेक प्रकारें घेता येतो. सतरा महिन्यापूर्वी मीं हें काम हातीं घेतलें तेव्हां माझ्याहि मनांत भीति होती. शारीरिक आरोग्य नि मानसिक शांति यामुळेंच हें हाती घेतलेलें काम पुरें करुं शकलों. पंडितांना माझ्या या लेखनांत अनेक दोष दिसतील. पण थोडेंफार सत्कार्य या लेखनानें केलें आहे, ही गोष्ट त्यांनीं ध्यानांत घेतली तर त्यांना आनंद झाल्यावाचून राहाणार नाहीं.

हा ग्रंथ वाचणाऱ्या मुलांना उद्देशून मला थोडें सांगावयाचं आहे. केवळ त्यांच्यासाठीच अयोध्येच्या राजाची ही कथा मी निवेदिली आहे. वडील मंडळींनीं वाल्मीकी किंवा कंबण यांचींच रामायणें वाचणें श्रेयस्कर. ज्यांना गायनकला साध्य झाली असेल त्यांनी त्यागराजचीं गाणीं गाइलीं तर रामायणाची गोडी अधिक वाढेल. पण माझें हें रामायण मात्र मुलांनीं बेशक वाचावें. हें समजून घेण्यासाठीं त्यांना कोणाच्याही मदतीची आवश्यकता भासणार नाहीं.

मुलांनों, तुम्हाला साहाय्य करण्यासाठीं अहोरात्र तत्पर असलेल्या तुमच्या वडीलांकडे आणि भावंडांकडे तुम्ही ज्या दृष्टीनें पाहातां त्याच दृष्टीनें राम–लक्ष्मण आणि हनुमान यांच्याकडे पाहा. भरत, लक्ष्मण, हनुमान यांच्या जीवनाचा कित्ता गिरवून त्यांच्यासारखेच तुम्हीहि शूर सत्पुरूष व्हा. प्रेम आणि सामर्थ्य तुमच्यांत पुरेपूर बनलेलें असो.

मला माहीत आहे कीं, अनेक माता रामकथेचें मोठ्या आवडीनें वाचन करीत असतात. ही कथा मीं मुलांसाठीं एवढ्या सोप्या शब्दांत नि छोट्या वाक्यात कां लिहिली असेन, हें त्यांच्या सहज लक्षांत येईल. सर्व गोष्टी आपण शेवटीं मुलांसाठीं असतों ना ? सीतेच्या जीवनाची खरी कल्पना स्त्रियांनाच येऊं शकेल. वाल्मीकी व कंबण यांनी निवेदिलेली सीतेची कथा केवळ स्त्रियाच समजूं शकतील. जटायूचा पराक्रम महान् म्हणजे केवढा महान होता. आणि हनुमानाचें सामर्थ्य अलौकिक म्हणजे केवढें अलौकिक होतें. याचें खरें आकलन स्त्रियांनाच होऊं शकेल.

रामायणाबरोबर सीतेची दुःखें संतुष्टांत आली असें नव्हे. त्यांचा प्रवाह आपल्या स्त्रियांच्या जीवनांतून अद्यापी अव्याहतपणे वाहातोच आहे.

आपण प्रत्यक्ष परमेश्वरच आहोंत हें रामावतारामध्यें रामाला माहीत नव्हतें. कृष्णाला मात्र याची चांगलीच जाणीव होती व ही गोष्ट लक्षांत ठेवून तो या जगांत वावरत होता. हा फरक जाणून घेऊन दोन्ही कथा वाचल्या पाहिजेत. माणूस म्हणून रामानें जें दुःख भोगलें तें कृष्णाच्या वांट्यास कधींहि आलें नाहीं.

पूतना मावशीनें त्याला स्तनपानाला घेतलें आणि यशोदेनें त्याला उखळीला बांधून ठेवलें तेव्हां तो दुःख करीत बसला नव्हता. हातांतील शस्त्रें खाली ठेवून तो रणभूमीवर उभा राहिला नि दुर्जनांच्या विनाशासाठीं त्यानें अर्जुनाचें सारथ्य केलें. कृष्णकथेंतील प्रसंगाप्रसंगांतून या दोन देवावतारांतलि फरक आपणास जाणवत असतो.

वाल्मीकीना 'वाट पुशितु' मीं ही कथा लिहिली आहे. वाल्मीकीच्या पूर्वींपासून अशी एक वदंता होती, कीं रावणाच्या बंदिवासांतून सीतेची मुक्तता केल्यानंतर रामानें तिला अरण्यांत हाकलून दिली होती.

आपल्या दुःखमग्न स्त्रियांच्या कल्पनेतूनच या वदंतेचा जन्म झाला असावा. रामायणांतील उत्तरकांडांत हा हृदयद्रावक प्रसंग वाल्मीकींनीं वर्णिला आहे. हें वर्णन लालितरम्य असलें तरी माझें हृदय त्याविरुद्ध बंड करून उठतें. युद्धभूमीवरच सीतेला अग्निप्रवेश करावयास लावून वाल्मीकींनीं ही घटना कशीबशी वर्णिली आहे. रामासारखा माणूस सीतेला अग्निपरीक्षा द्यायला लावील हें संभवत नाहीं. या प्रसंगाचें वर्णन वाचतांना हृदयाला वेदना झाल्याशिवाय रहात नाहींत.

मिथिलेहून परत आल्यावर रामाची आणि परशुरामाची भेट झाली. या भेटीबरोबरच परशुरामाच्या अवताराची समाप्ति झाली, अशी एक समजूत आहे. याच चालीवर रावण-वधाबरोबरच रामावताराचीहि इतिश्री झाली, असें म्हणणें अतिशयोक्ती होणार नाहीं. लंकेंतील युद्धानंतर राम केवळ इक्ष्वाकुवंशांतील एक राजा या नात्यानेंच वावरत होता.

हा सिद्धांत एकदा मान्य केला, कीं रामानें युद्धोत्तर सीतेला जी वागणूक दिली तिचा उलगडा सहजासहजीं होतो. राम हा आतां एक सामान्य माणूस होता आणि तत्कालीन रीतिरिवाजाना अनुसरूनच त्यानें सीतेला अग्निदिव्य करावयास लावलें, असें म्हणतां येईल.

पण याचबरोबर हीहि गोष्ट आपण लक्षांत ठेवायला हवी, कीं रामायणाची रचना हजारों वर्षांपूर्वींची आहे. तेव्हांपासून परंपरेनेंच हें महाकाव्य आपल्यापर्यंत येऊन पोंचलें असल्यामुळें त्यांत बाहेरून अघळपघळ भर पडली असण्याची शक्यता

फार आहे. युद्धकांडांत वर्णिलेल्या अग्निदिव्यानंतर उत्तरकांडांत सांगितल्याप्रमाणें खरोखरच सीतेची अरण्यांत पाठवणी करण्यांत आली असेल, तर भारतीय स्त्रियांच्या असहाय अवस्थेचें प्रतिबिंब दाखविण्यापुरतीच ही घटना उपयोगी पडते. दुःख काय किंवा आनंद काय दोन्हीहि परमेश्वराच्या लीला आहेत. आपलें करुणामय स्त्री–अंग घेऊन परमेश्वर भूतलावर अवतीर्ण झाला आणि दुःखानंदाचें एक महान् नाटक त्यानें रामायणाच्या द्वारें करून दाखविलें असेंच म्हटलें पाहिजे.

आभाळांतून पडणारा पाऊस नद्यांना जाऊन मिळतो आणि त्या नद्या शेवटीं समुद्राशीं एकरूप होतात. सूर्याच्या उष्णतेनें समुद्राच्या पाण्याची वाफ होते आणि तिचें ढगांत रूपान्तर होतें. पुन्हा ती पाऊस होऊन पृथ्वीतलावर येते. नंतर ती नद्यांना जाऊन मिळते आणि शेवटीं समुद्रांत विलीन होते. ऋतुचक्र हें असें अखंडपणें चालू असतें. याचप्रमाणें जनमानसांत उद्भवणाऱ्या भावना व मूल्यें कविहृदयाला जाऊन मिळतात आणि त्याचें काव्यांत रूपान्तर होऊन पुन्हा ज्ञानाच्या अगर स्फूर्तीच्या स्वरूपांत व लोकांच्या मनांशीं एकरूपत्व पावतात. प्रत्येक राष्ट्रांतील लोकमानस आणि कलावंत यांचें नातें अशा प्रकारें परस्परपूरक असतें. स्त्रीमनाचा नाजूकपणा, विशुद्धता आणि अगम्य व्यथा साकार झाल्या आहेत त्या उत्तर रामायणांत. या रामायणानें स्त्री–हृदयावर स्थिर असा प्रकाश टाकला आहे. एखाद्या राष्ट्राचीं महाकाव्यें आणि लोकगीतें यांचा प्रभाव सामान्य जनतेच्या श्रद्धा–कल्पनांवर पडतो, कीं जनमानस हें त्या त्या राष्ट्राचें साहित्य घडवीत असतें, या प्रश्नाचें उत्तर ज्यानें त्यानें आपापल्या मनोधारणेप्रमाणें द्यावें. बीजापासून रोप होतें का रोपापासून बीज ? अंड्यांतून पांखरूं निघतें कीं पांखरामुळें अंडें निर्माण होतें ? समुद्राच्या पाण्यापासून ढग निर्माण होतात कीं ढगांमधून होणाऱ्या वृष्टीमुळें समुद्रांत पाणी येतें ? या प्रश्नांचीं उत्तरें शब्द आणि विचार यांच्या पलीकडलीं आहेत. तीं आपणांस परमेश्वराच्या चरणापाशीं नेणारीं अशींच आहेत.

आणखी एक गोष्ट. सीतेच्या अपहरणाचें कंबणानें केलेलें वर्णन वाल्मीकींच्या वर्णनापेक्षां वेगळें आहे. वाल्मीकी–रामायणांत रावण सीतेला बळजबरीनें उचलून नेतो, असें वर्णन आहे, तर कंबणाच्या रामायणांतील रावण सीतेच्या पायाखालची जमीनच तिच्यासह उचलून नेतो.

एखादा खलपुरुष पशुवत् वर्तन करूं लागला तर त्यामुळें एखाद्या निर्व्याज मनाच्या स्त्रीवर पापकर्माचा कलंक लावण्याचें काय कारण ? पण या देशांत एखाद्या नीच पुरुषाच्या वर्तनामुळें आपण निष्पाप स्त्रियांना कलंकित समजत असतों. हें ध्यानांत धरूनच कंबणानें आपल्या रामायणांत उपर्युक्त बदल केला असावा, असें दिसतें.

याच कारणासाठीं तुलसीदासांनींहि आपल्या रामायणांत बदल केला आहे. तुलसीरामायणांत रावण ज्या सीतेचें अपहरण करतो ती खरी सीता नसून सीतेनें आश्रमांत ठेवलेली तिची स्वतःचीच प्रतिमा असते. उत्तर भारतांत सीतापहरणाची कथा अशीच सांगितली जाते. अग्निदिव्याच्या प्रसंगींसुद्धां कुंडांत खरी सीता प्रथम अग्निप्रवेश करीत नाहीं. अग्नींत शिरते ती हीच माया-सीता. खरी सीता नंतर प्रवेश करते व आपलें शील सिद्ध करून कुंडांतून बाहेर येते.

हें काम मी हातीं घेणें म्हणजे एका परीनें लहान तोंडीं मोठा घांस घेण्यासारखेंच होतें. पण रामायणाची कथा सांगणें यांतला आनंदहि कांहीं वेगळाच आहे. या क्षणीं एखाद्या आनंदस्वप्नांतून जागृति यावी असें मला वाटत आहे. रामानें अयोध्येचा निक्षेप घेतला तेव्हां दुःखाचा यत्किंचितहि स्पर्श त्याच्या हृदयाला झाला नव्हता, पण सीतेचा वियोग होतांक्षणींच तो दुःखसागरांत बुडून गेला. माझेहि कांहींसें असेंच झालें. उच्चपदावरून निवृत्त होतांना मला फारसें कांहीं वाटलें नव्हतें; पण रामकथेची ही सांगता होतांना मात्र कांहींतरी चुकल्या चुकल्यासारखें वाटूं लागलें आहे. मूर्तीविना देऊळ रितें वाटावें तसें ! ओझें म्हणून कामाकडे पाहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जीवनप्रवाह अनिरुद्धपणें राहावा असें वाटत असेल, तर हातीं घेतलेले जेवढें चांगलें करतां येईल तेवढें करण्याचा प्रयत्न करावा. यशस्वी जीवनाची खरी गुरुकिल्ली हीच आहे. फळाची आशा न धरतां माणसानें कर्म करीत असावें. अकर्मक जीवन मानवाला भगदीं असह्य होऊन गेल्याशिवाय राहाणार नाहीं.

---


**लहान मुलांच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.**




## बाबावर श्रद्धा जडली

श्री. दलपतराम मगनलाल पुरोहित, अर्बुदा सोसायटी बंगला नं. १० मणीनगर, अहमदाबाद हे लिहितात कीं,

मी आणि प. पू. श्री. स्वामी साई शरणानंदजी व श्रीमती गौरीबेन श्री. बद्री-केदारच्या यात्रेस निघालो त्यावेळीं एक मार्मिक चमत्कारीक घटना झाली ती खरोखर श्रद्धा व भक्ति वाढविणारी होय. ती खालीलप्रमाणें :—

मथुराहून हरद्वारला जाण्याकरीतां बस व ट्रेनची सोय असते. ट्रेनमध्यें उन्हाळ्यांत गर्दी फार असतें त्यामुळें प. पू. स्वामीजींच्या इच्छेनुसार आम्हीं बसनें जाण्याचें नक्की केलें. परंतु बसमधून जाण्याकरितां ३–४ दिवस अगोदर रिझर्वेशन करावें लागत होतें. पण असे आम्हांस करणें अशक्य होतें. आम्हांस ता. १५।५।६२ ला हरद्वारला जाण्याकरितां निघालेंच पाहिजे होतें, कारण असें न झाल्यास आमचा सर्व कार्यक्रम आम्हांला रद्द करावा लागला असता.

मी संध्याकाळीं बस स्टँडवर रिझर्वेशनकरितां गेलों. रिझर्वेशनची शक्यता नव्हती. तरीपण प्रयत्न करावा म्हणून शेवटची ८ वाजतां (रात्रीं) बस हरद्वारहून मथुरेस आली त्यावेळेस मी कंडक्टरची भेट घेतली व विचारलें, "आम्हांस उद्यां सकाळच्या बसनें हरद्वारला जावयाचें आहे, तेव्हां आमची जाण्याची व्यवस्था होईल कां ?"

कंडक्टर जणूं कांहीं माझ्या परीचित व्यक्तिप्रमाणें माझ्याशीं गोष्टी करूं लागला. त्यानें माझ्या कल्पनेच्या बाहेर असे प्रश्न विचारले कीं, मला वाटलें कीं, हा कोणी त्रिकाळ ज्ञानी तर नसेल ! त्यानें मला प्रश्न केला कीं, "तुम्ही हरद्वारला जाणार आहांत कां ?"

मी उत्तरलों, "होय."

त्यानीं पुन्हां प्रश्न केला कीं, "तुमच्याबरोबर स्वामीजी व कोणी वृद्ध माता पण आहे कां !" मी तर आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे पाहतच राहिलों. व

माझ्या मेंदूंत एकप्रकारची गडबड उडाली. हा असा प्रश्न कां व कशाकरितां विचारतो हेंच समजेना.

मी उत्तरलों, “होय!”

त्यानें आपल्या खिशांतून २ रिझर्वेशनच्या तिकिटी काढून माझ्या हातांत दिल्या आणि म्हणाला, “तुमचें रिझर्वेशन अलीगडला एका फकीरासारखी व्यक्ति करून गेली. आणि असें पण सांगितलें कीं, “तुम्हीं तिकिटाकरितां मला ८ वाजतां बस स्टँडवर भेटणार आहांत. तेव्हां तुम्हीं त्यावेळेस स्टँडवर बिनचूक रहावें.”

मी थोडा नास्तिक आहे; पण ह्या चमत्कारानें माझ्या आस्तिक भावाचा अविर्भाव झाला. खरोखर भगवंत भक्ताचा पाठीराखा असतो. ह्याची मला खात्री झाली. त्यामुळें श्री साईबाबांवर माझी अपूर्व श्रद्धा जडली. कारण अलीगडच्या फकीराच्या वेषांत श्री साईबाबा प्रत्यक्ष प्रकट झाले. अव्यक्तांतून व्यक्त स्वरूप घेऊन आले असें मला बरोबर पटलें.

मनुष्याचें कल्याण ईश्वरावर अढळ निष्ठा व ज्वलंत प्रेम ठेवण्यांत आहे. हा धडा मी ह्यावरून घेतला.

× × × × ×

## डाकोरच्या यात्रेंतील अनुभव

श्री. रतीलाल चिमणलाल शहा, तारकर भुवन, रिलीफ रोड, गुंदी पोळ काळूपुर अहमदाबाद हे लिहितात कीं,

भक्तांची सात्विक इच्छा श्री साईनाथ महाराज सगुणरूप धारण करून पूर्ण करतात त्याचा मला प्रत्यक्ष अनुभव रझाकारांच्या दंग्याच्यावेळीं झाला होता, तसाच आतां माघ वद्य ६ सोमवारी दुपारीं २ च्या सुमाराला श्री. रणछोडजींच्या परमधाम डाकोर (गुजरातमध्यें गोमती नदीच्या तटावर) मध्यें आला तो खालीलप्रमाणें :—

अहमदाबादचे श्री. नटवरलाल ह्यांचा मुलगा लालबावा व मुलगी ह्यांच्या चौलकर्माचा प्रसंग होता. (केस प्रथम कापण्याचा समारंभ) त्याकरितां नटवरलाल त्यांच्या सहाशें भक्तजनांच्याबरोबर माघ शु. १ च्या दिवशीं अहमदाबादेहून पदयात्रा सुरू करून माघ व. १ च्या दिवशीं आम्हीं डाकोरला पोहोचलों. डाकोर मंदिरामध्यें वर्षांत होणारे सर्व उत्सव माघ ६ पर्यंत पाहून घेण्याचें त्यानीं ठरविलें होतें.

ह्या प्रसंगाची बातमी वर्तमानपत्रांत जाहीर झाल्यामुळें उत्सव पाहण्याकरितां भक्तांचा तांडा तेथें जमूं लागला. शेवटच्या दिवशीं म्हणजे माघ व. ६ च्या दिवशीं ५६ तऱ्हेचें अन्नाचे प्रकार करून नैवेद्य दाखविला जातो, भगवंताचें दर्शन घेण्यास व अन्नकोट पाहण्याकरितां डाकोर येथील मंदिराच्या महाद्वारापुढें दर्शनाच्या आतुरतेमुळें आपण दर्शन घेऊन मोकळें व्हावें असें प्रत्येकास वाटत होतें आणि जो तो धक्के बुक्के

देऊन गर्दीत घुसत होता. त्यामुळें गर्दी वाढली. ह्या गर्दीत चार-सहा वृद्ध व कांहीं अशक्त माणसें पडून गतप्राण झालीं. त्यांचा विचार न करतां त्यांच्या अंगावरून जाऊन दर्शन घेण्यास लोक जात होते. जवळ जवळ १०० ते १५० जखमी लोकांस दवाखान्यांत नेण्यांत आलें.

अशा अफाट गर्दीत घुसून मी पुढें जाण्यास निघालों. सुरुवातीस मला दोन तरुणांनीं साथ देऊन गर्दीत घुसविलें, मध्यावर इतकी अफाट गर्दी होती कीं, आमची मध्येंच फाटाफूट झाली. मला तर पुढें मागें कुठेंही जाणें अशक्य झालें होतें. त्यामुळें भयभीत होऊन भगवंताची करुणा भाकूं लागलों. अशा बिकट वेळीं एक वयोवृद्ध गृहस्थ माझ्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. तो वृद्ध मी तुम्हांला दर्शन करवितों असें मला सांगूं लागला. मी त्याला सांगितलें कीं, "तूं मला काय दर्शन करविणार!" तूं एक तर वृद्ध आणि ही अशी तुफान गर्दी! माझ्याजवळ असणाऱ्या पोलिसांनीं व इतरांनीं त्या वृद्धास पुष्कळ समजाविलें. पण त्यांनीं कोणाचेंही न ऐकतां मला सांगितलें कीं, तूं पाठीमागून माझ्या खांद्यावर हात ठेव. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मी दोन्ही हात त्यांच्या खांद्यावर ठेवले. तेवढ्यांत त्यांनीं मला ओढून एकदम चार पायऱ्या ओलांडून माझा महाद्वारांमध्यें प्रवेश करविला. लिफ्टमध्यें बसल्याप्रमाणें मी पायऱ्या ओलांडल्याचें मला आश्चर्य वाटलें. नंतर मला मंदिरांत नेऊन त्यांनीं भगवंताच्या पुढें उभे केलें व सांगितलें कीं, "बरोबर दर्शन कर."

थोड्या वेळानें म्हणाले कीं, "दर्शन झाले कां?"

मी म्हणालों, "होय"

पुन्हां दुसऱ्या मार्गानें नेऊन पुन्हां त्याच ठिकाणीं भगवंतापुढें आणून सांगितलें कीं, "दर्शन बरोबर कर."

मी पुन्हां दर्शन घेतलें.

मी नंतर निघण्याकरितां मागें वळून त्यांना (वृद्धांना) पाहतों तर काय? ते अदृश्य झालेले! मी कृतज्ञतेनें भारावून जाऊन त्या वृद्धाचा तपास केला, पण पुन्हां ते दिसले नाहींत. मी डाकोरला एक दिवस राहिलों. पण बारकाईनें शोधूनही त्या वृद्धाचा तपास लागला नाहीं.

माझ्या मनांत असें विचार येऊं लागले कीं, एवढ्या तुफान गर्दीत दर्शन घडविणारा हा कोण बरें वृद्ध असावा?

त्याच रात्रीं श्री साईबाबा स्वप्नांत येऊन बोलूं लागले कीं, दर्शन बरोबर झालें कीं नाहीं!

मला पटलें कीं, मला दर्शन घेण्यांत आलेले संकट पाहून श्री साईबाबांनीं वृद्धाच्या रूपानें येऊन मला दर्शन घडविलें व मला संकटांतून वाचविलें.

**"भक्तनके काज प्रभू सगुण धारी"**

× × × × ×

## नाहीसें झालेले पैसे मिळाले

मी भगवंत रामचंद्र देशमुख असिस्टंट-डेप्युटी एज्युकेशन सिन्नर तारीख ५।३।१९६४ रोजीं गुरुवारी "श्रीसाईनाथ महाराज शिरडी" येथें नेहमींप्रमाणें दर्शनाचा लाभ घेण्यासाठीं आलों. येथें आल्यानतंर माझे स्नेही श्री रोहम गुरुजी यांना प्रथम भेटलों आणि नतंर मला पुढील दृष्टांत अनुभवास आला.

शिरडी येथें मी स्नान केलें, जेवण घेतलें नतंर बाबांचा श्रीसाईलीलामृत हा ग्रंथ घेण्यासाठीं, बाबांचे वाचनालयांत गेलों तेथील श्री. बागवे व्यवस्थापक यानीं दोन पुस्तकें मला विकत दिलीं. पैसें देण्यासाठीं पाकिट काढलें. पैसे शोधूं लागलों. त्या पाकिटामध्यें असलेलें पैसे त्या क्षणीं मुळींच आढळून आले नाहींत. तेथील श्री. बापूराव जाधव यानीं स्वतः पाकिट तपासलें त्यांत कांहीं नाणें, नोटा मुळींच आढळल्या नाहींत. श्री. बापूराव यांनी प्रयत्न केला. मी निराश झालों. बरोबर बारा वाजले. आरतीची वेळ झाली. नतंर महाआरतीसाठीं मी समाधिमंदीरांत गेलों. अर्धा तास मनोभावानें प्रेरित बाबांचे दर्शन घेऊन, देवळाचे बाहेर आलों. माझे मित्र श्री. रोहम यांना प्रकार निवेदन केला. त्यांनी सांगितलें साहेब जरा शांतपणानें आपले पाकिट पुन्हां बघा पाहूं बाबांची कृपा असेल तर सत्य दृष्टोसपत्तीस येईल. नंतर मीं पाकिट खिशांतून काढून त्यांचे समक्ष पाहूं लागलों आश्चर्य म्हणजे माझें नाहीसे झालेलें १० रुपये जसेंच्या तसेंच पाकिटांत सुखरूप आढळलें. मी आनंदलों. आणि मला शिरडी येथें जागृत समाधीतील अनुभव प्रत्यक्ष आला.

———

MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक: एस्. व्ही. प्रधान

# रामानें रामराज्याचा पाया कसा घातला ?

********* **************************.****************

**निरनिराळ्या प्रांतिक भाषेंत अर्थात् मराठी, हिंदी, गुजराथी, बंगाली, तामळि वगैरे भाषांत महाकवी निर्माण होऊन त्यांनीं आप-आपल्या काव्य प्रतिभेनुसार रामकथेचें सुंदर निरूपण केलें आहे. परंतु त्या सर्वांत तुळशीदास लिखित 'रामचरित मानस' या रामकाव्याचें जें महत्त्व आहे तें अजोड आहे.**

कविश्रेष्ठ तुळशीदासांचा काळ म्हणजे सुमारें पांचशें वर्षांपूर्वीचा काळ. त्या काळांत हिंदु साम्राज्यें नष्ट होऊन मुसलमानांची सल्तनत सुरू होती. लोक निराश हवालदिल झालेलें होते. त्याच काळांत जनतेला दिलासा देऊन त्यांच्यांत नव-चैतन्य उत्पन्न करण्यासाठीं व भक्तिमार्गावर जनतेची श्रद्धा दृढ करण्यासाठीं रामानंद, वल्लभाचार्य, कबीर, सूरदास यांच्यासारखे संत कवि निर्माण झाले. तुळसीदास हेही त्याच काळाचे अग्रदूत.

तुळसीदासजींनीं श्रीरामचंद्राचा आदर्श सर्वांपुढें ठेऊन राजा कसा असावा व रामराज्य कसें असतें याचें उच्चांत उच्च स्वरूप जगापुढें ठेविलें आहे.

मनुष्य किती सद्‌गुणी प्रेमळ, सत्यनिष्ठ, त्यागी असूं शकतो याचें सुंदर चित्र तुळसीदासांनीं राम चरित्र मानसांत रेखाटलें आहे. आज्ञाधारक पुत्र प्रेमळ बंधु, प्रेमळ पति, व कर्तव्यनिष्ठ पुरुष कसा असावा याचा उच्च आदर्श म्हणजे श्री रामचंद्र.

अशा या रामकथेनें सर्वांना खरोखर दिलासा दिला. त्यांना उच्च आशा आकांक्षांच्या आकाशांत मुक्तपणें विहार करावयाला लाविलें. नवआशेनें सर्व जनता भारली गेली.

आणि पांचशे वर्षांनंतर आज ? आजही लक्षावधी लोकांच्या अंतकरणांत 'रामचरित्र मानस' हा ग्रंथ नव आशा नव प्रेरणा निर्माण करीत आहे. ते थेट हृदयाला भेदणारें व हृदय हालविणारें त्या ग्रंथाचे व त्या सुंदर निरूपणाचें सामर्थ्य आजही तितकेंच कायम आहे.

## जनतेच्या हालअपेष्टा

जनता पिळली जात होती. सर्व बाजूंनीं तिची पिळणूक होत होती. अशा स्थितींत तिला निराशेनें पछाडलें असल्यास नवल कसलें ?

**सतीना संतांना जरिकधिं जगीं दुष्ट छळिती ।**
**तयांना रक्षाया अवनिवरि यें मी रघुपती ॥**

असेंच जणूं आव्हानपूर्वक गर्जत तुळसीदासजींचा श्रीराम मानवरूपानें पृथ्वीवर अवतार घेता झाला।

समाजाची विस्कळीत झालेली घडी नीट बसवायची, डळमळीतपणा नाहींसा करावयाचा, सर्वत्र आशांकुर फुलवायचे, कर्तव्य पालन हाच धर्म मानावयाचा व सदाचाराला रोजच्या वागण्यांत संपूर्ण महत्व द्यावयाचें हा होता रामावतराचा मुख्य उद्देश.

मनुष्य किती पराक्रमी, त्यागी, कतर्व्य कठोर व परदुःख निवारण्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करण्यास कसा तयार होतो याचें सुंदर दिग्दर्शन तुळसीदासानीं आपल्या रामचरित्रांत उद्बोधक रीतीनें केलें आहे.

## रामाचा जीवनारंभ

हेंच पहा ना. राम–लक्ष्मणांनीं नुकताच कुठें तारुण्यांत प्रवेश केला होता. धनुर्विद्येचें शिक्षण त्यानीं नुकतेंच कुठें संपविलें होतें. इतक्यांत विश्वामित्र महर्षि अरण्यांत राक्षसगणांकडून यज्ञकार्यांत होणाऱ्या अडथळ्यांची तक्रार घेऊन राजा दशरथाकडे आले. खरें पहातां त्याच्या निवारणार्थ कांहीं सैन्य पाठविलें असतें म्हणजे झालें असतें. परंतु तसें नाहीं.सज्जनांचा दुष्ट राक्षसांकडून छळ होतो आहे ना ? मग आपणच जातीनें जाऊन सज्जनांची सेवा केली पाहिजे. त्यांच्यावर ओढवणारीं संकटें दूर केलीं पाहिजेत या कर्तव्यबुद्धीनें राम–लक्ष्मण अरण्यांत जाण्यास तात्काळ तयार झाले.

जनतेची लोकप्रियता संपादन केली पाहिजे. जनतेच्या मनावर आपण पगडा बसविला पाहिजे याची जाणीव श्रीरामचंद्राला पूर्णपणें होती. कोणत्याही बाबतींत माघार घेणें त्याला माहीत नव्हतें. त्याचा आत्मविश्वास दांडगा होता. जनक राजानें सीतेचें स्वयंवर आरंभिलें. राम त्या स्वयंवरांत भाग घेण्यासाठीं हजर राहिले व कोणालाही उचलतां न येणारें धनुष्य सहज लीलेनें वर उचलून त्यांनीं त्याचे दोन तुकडे केले व आपलें सामर्थ्य सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें.

## प्रभावी शारीरिक व नैतिक बळ

रामाचें शारीरिक सामर्थ्य अनन्यसाधारण होतें त्याचप्रमाणें नैतिक बळांतही त्यानें साऱ्या जगापुढें उच्चांत उच्च आदर्श ठेविला आहे.

अयोध्येच्या राजसिंहासनावर रामाचा हक्क होता. असें असतांही आपसांतील द्वेष व तंटे टाळण्यासाठीं त्याचप्रमाणें कर्तव्यपालनासाठीं सिंहासनाचा त्याग करून त्यांनीं वनवास पत्करला. आपल्या वडिलांचें वचन पाळणें हें त्यांना आपलें पहिलें कर्तव्य वाटलें. त्यासाठीं कितीही त्रास व दुःखें सहन करावीं लागेनात का, त्याची तमा त्यांनीं यत्किंचीतहि बाळगली नाहीं.

## रामाची कर्तव्य कठोरता

रामाच्या मातापित्यांना त्या घटनेमुळें किती दुःख झालें आहे! दुःख होईना का. कर्तव्य त्याहीपेक्षां कठोर असतें. त्यासाठीं मनाचा घडा करावा लागतो. वेळप्रसंगीं कठोर कसें व्हावें, प्रियतम माणसाचाही त्याग करणें वाट्याला आलें म्हणून काय झालें? वचनपूर्तीसाठीं स्वतःच्या वाट्यास हालअपेष्टांचें जीवन आलें म्हणून काय बिघडलें?

रामानें सहजरीतीनें व कोणत्याही प्रकारें खंत न बाळगतां चुटकीसरशीं सिंहासन त्याग केला. ही साधी कां घटना होती? भरताच्या मनावर त्या घटनेचा केवढा परिणाम झाला! आयतें चालून आलेलें तें सिंहासन त्याला नकोसें झालें! त्यानेंही चुटकीसरशीं त्या सिंहासनावरील लोभ सोडला. मातेच्या कारवायांस तो जरासुद्धां बळी पडला नाहीं. बंधुप्रेमाचा, भक्तिभावाचा किती उच्च आदर्श त्यानें सर्वांपुढें ठेविला आहे!

## अरण्यवास कशासाठीं?

रामानें अरण्यवास पत्करला तो कशासाठीं? त्याकाळीं मोठमोठे राजेरजवाडे अरण्यांत मोठा लवाजमा घेऊन जात असत. कशासाठीं? शिकारीसाठीं; चैनीसाठीं; उधळपट्टीसाठीं व जनावरांसह माणसांचीही शिकार करण्यासाठीं; त्यांना दुःखताप देण्यासाठीं! रामाचा अरण्यवास हा कोणालाहीं उपद्रव देण्यासाठीं नव्हता. कोणाच्याही सुखाआड येण्यासाठीं नव्हता; तर स्वतः दुःखताप भोगून अरण्यवासी जनांचीं दुःखें व त्यांच्यावर येणारी संकटें दूर करण्यासाठीं होता. त्याकाळीं तपश्चरण, यज्ञयाग करणाऱ्या ऋषीमुनींना दुष्ट राक्षसांकडून पदोपदीं अतोनात दुःखें भोगावी लागत असत. रामानें दुष्टांना शासन करून सज्जनांचा मार्ग निष्कंटक व निर्वेद केला. रामानें अरण्यवासांत सर्वांचा स्नेह संपादन केला. ज्यांना सहकार्याची जरूरी होती, त्यांना सहकार्य दिलें. अनेकांचा उद्धार केला. रावणासारख्या जनतेला पिडणाऱ्या लंकेच्या सम्राटाला योग्य तें शासन करून प्रजासुखी केली. सज्जनांस सहाय्य व दुष्टांचें निर्दाळण हा होता रामाचा मनसुबा. चौदा वर्षे अरण्यवासांत घालवून त्यानें जी भव्य कामगिरी पार पाडली तिला तोड सांपडणें कठीण आहे.

## रामानें काय साधलें?

रामानें अरण्यवास —चौदा वर्षें अरण्यवास पत्करून.काय साधलें? किती तरी गोष्टी साधल्या. साऱ्या जगापुढें कर्तव्यपालनाचा एक अनन्यसाधारण आदर्श ठेविला. जनतेच्या अंतःकरणांत विश्वास उत्पन्न करून तिच्या हृदयसिंहासनावर बहुमानाचें स्थान संपादन केलें. दुष्ट, मत्सरी, व्यसनी, उपद्रवी म्हणून ज्या ज्या प्रवृत्ति बोकाळल्या होत्या, त्यांचा नायनाट करून टाकिला. राम खरोखर अंतःकरणाला आराम देणारा, दिलासा देणारा आहे अशा प्रकारचा विश्वास सर्वत्र निर्माण केला.

आणि रावणासारख्या दुष्ट व उपद्रवी राजाचा संहार करून व चौदा वर्षांचें वनवासी आणि कर्तृत्वसंपन्न जीवन संपवून रामप्रभु जेव्हां अयोध्येंत आले त्यावेळीं साऱ्या प्रजेनें त्यांचा अभूतपूर्व सत्कार केला असल्यास त्यांत नवल कसलें.

**खंबीर पाया रचला**

जणुं काय आपल्या भावी काळांतील रामराज्याचा रामचंद्रानीं प्रथम पायाच घातला आणि नंतर त्यावर सुंदर इमारत रचिली.


रामाचें राज्य म्हणजे धर्माचें राज्य, रामाचें राज्य म्हणजे सदाचाराचें, कर्तव्य पालनाचें, निर्वैराचें, बंधुभावाचें राज्य. रामराज्यांत लहान थोर, उच्च नीच हा भेदभाव नव्हता. जमीन भरपूर पीक देत असें. फलपुष्पांनी व धनधान्यांनीं प्रत्येकाचें घर भरलेलें होते. कोण कोणाचा हेवा करणार आणि कशासाठीं म्हणून ? माणसेंच काय परंतु पशु पक्षीही एकमेकांशीं गुण्यागोविंदानें व प्रेमानें वागत असत. कारण ? यथा राजा– तथा प्रजा !

---


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**–यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# रामनामाची किमया

—एक पौराणिक कथा

**रामनाम सर्व दुःख परिहारक व सर्व संकटांतून मुक्त करणारें आहे. बिभीषणाची रामनामावर अपरंपार श्रद्धा होती. त्या श्रद्धेच्या बळावर तो सर्व संकटांतून निभावला व इतरांनाही संकटमुक्त करण्यास तो कारण झाला.**

कोणी एक व्यापारी आपली संपत्ति व मालमसाला एका जहाजावर चढवून व्यापार करण्यासाठीं परदेशीं सफर करण्याच्या हेतूनें बाहेर पडला. जहाजाचा प्रवास सुरळीतपणें सुरू झाला. मजल दरमजल करीत जहाज वाऱ्याच्या वेगानें जात होतें. प्रवास अर्धामुर्धा झाला असेल तोंच जहाज जागच्याजागीं थबकलें. तें कांहीं केल्या हालेना. आतां काय करायचें, जहाजांत संपदा, माल-मसाला होता, त्याचप्रमाणें अनेक प्रवसीही होते. सारे चिंतातूर झाले. काय करावें सुचेना. प्राणावर बेतले होते.

**बलिदान कोणी करावें ?**

कोणी म्हणाले, समुद्राला माणसाचा बळी हवा आहे. तो रुष्ट झाला आहे.

आतां माणसाचा बळी कसा देणार ! कोणाला आपला जीव नकोसा झाला आहे ! कोणाला आणि कसें सुचवायचें तूं मरायला तयार हो म्हणून ! मोठा पेंचप्रसंग निर्माण झाला.

तो निर्माण झाला तसाच तो सुटण्याच्या मार्गासही लागला. ज्या व्यापाऱ्याची संपत्ति त्या जहाजांत होती. त्याला उपरति झाली. तो विचार करूं लागला. मीच माझे प्राण समुद्राला अर्पण केलें तर इतर लोकांचें प्राण तरी बचावतील ! संपत्तीचें काय ! मुलगा पाहील तिची व्यवस्था !

व्यापाऱ्यानें निर्धार केला व तो सर्वांना जाहीरही केला. कौतुक केलें सर्वांनीं त्याचें ! वा रे वा ! धन्य आहे तुझी ! आमच्यासाठीं स्वतःचे प्राण अर्पण करण्यासाठीं तूं पुढें आलास ?

**एका रोगी वृद्धाचा त्याग**

इतक्यांत डेकच्या एका कोपऱ्यांत रक्तपितीनें त्रासलेला एक म्हातारा बसलेला होता. त्यानें तीं गडबड ऐकिली आणि त्याच्या अंगांत शौर्याचा संचार झाला ! तो

ताडकन् उभा राहिला आणि म्हणाला ‘ अरे ! धनिक गृहस्था ! तूं कां म्हणून स्वतःचा बळी देण्यास पुढें यावें ? तो हक्क माझा आहे. मी रोगानें पिडलेला व वय झालेला एक दुःखी माणूस आहे. हें जिणें जगून तरी काय करायचें आहे ? माझ्यामागें माझ्यासाठीं रडणारा तरी कोण आहे. एकटा जीव आणि सदाशिव बस्स ! तुम्हीं कोणीही चिंता करण्याचें कारण नाहीं. मला प्रेमानें निरोप द्या. ”

आणि कोणत्याही बोलण्याची वाट न पहातां तो आकाशाकडे पहात देवाची प्रार्थना करूं लागला. देवा ! मला घे आतां पोटांत आणि हें जहाज एकदाचें पुढें जाऊं दे व सर्वांच्या प्राणांचें रक्षण होऊं दे ! शेवटीं राम ! राम ! म्हणत त्यानें समुद्रात उडी मारली.

त्याचबरोबर जहाज पूर्व वेगानें चालू झालें. लोक आनंदीत झालें. सर्वांच्या आनंदासाठीं एका माणसानें स्वतःचा बळी राजी खुषीनें दिलेला होता.

### लंकानगरींत प्रवेश

पाण्यांत बेधडकपणें उडी मारणारा तो दुर्दैवी ( दुर्दैवी कसला ? ) प्राणी लाटाबरोबर वहात वहात पुढें पुढें चालला होता. एके दिवशीं तो लंकानगरीच्या किनाऱ्याला जाऊन लागला. काय त्याचे नशीब !

किनाऱ्यावर कांहीं राक्षस नाचत बागडत होते. त्यांनीं लाटांबरोबर खालीं वर होणाऱ्या त्या माणसास पाहिलें. माणूस म्हणजे राक्षसांचें भक्ष्य ! आयताच एक माणूस सांपडला ! किती त्या राक्षसांना आनंद झाला. त्या माणसाला अलगद वर उचलून आनंदानें आरोळ्या मारीत ते त्याला घेऊन लंकेचा राजा बिभिषण याजपाशीं गेलें.

बिभिषणानें त्या कामगिरबिद्दल त्यांना योग्य तें बक्षीस देऊन त्यांची पाठवणी केली. नंतर पाण्यांतून बाहेर काढलेल्या त्या माणसाला पुसून सवरून त्याला बोलका केला. फार थकला भागलेला व भुकेलेला प्राणी होता तो ! त्याला प्रथम खायला प्यायला देण्यांत आले. त्याशिवाय तो काय बोलणार !

### रामभक्ताचा आनंद

बिभीषणाला देव भेटल्यासारखा आनंद झाला होता. त्याला चांगलीं वस्त्रें परिधान करायला देऊन बिभीषणानें मोठ्या भक्तिभावानें त्याला आपल्या सिंहासनावर आग्रहपूर्वक बसविलें.

बिभीषण म्हणाला, “ आज या माणसाच्या रूपानें प्रत्यक्ष रामचंद्रच मला भेटला ! मी किती भाग्यवान् !

तो बिचारा म्हातारा या सर्व प्रकारानें गोंधळून गेला; म्हणाला, “ मला राजसिंहासनाची किंवा कशाचीही इच्छा नाहीं. मला रामनामाशिवाय दुसरें आवडतें

या जगांत कांहीं नाहीं. तुझें सिंहासन तुला लखलाभ होवो! माझ्यासाठीं शक्य तर एक गोष्ट तूं कर. ज्या जहजांतून मी उडी मारली त्या जाहाजावर पुन्हां जाण्याची माझी इच्छा आहे. तेवढी पूर्ण कर म्हणजे झालें!"

बिभीषणानें त्याची ती इच्छा पूर्ण केली. त्यानें त्या वृद्धास बहुमोल रत्नें अर्पण केली. त्याला पितांबर नेसविलें. त्याच्या सर्वांगावर 'राम' 'राम' हीं अक्षरें गंधाक्षतांनी लिहिलीं. त्याला सागरतीरावर नेऊन बिभीषणानें सागराची अनन्यभावें प्रार्थना केली कीं, या महाभागावर मी रामनामाचे ठसे उमटविले आहेत. रामनामाची महती फार मोठीं आहे. कृपा कर आणि याला जेथें जायचें असेल तेथें पोहोंचता कर. या सागरांतून रामनामाच्या बलाबर त्याला त्याच्या इच्छेप्रमाणें जाऊं दे."

असें विनवून बिभीषणानें त्या वृद्धास समुद्राच्या स्वाधीन केलें व त्याला अखेरचें वंदन करून तो मागें फिरला.

**रामनामानें क्रांति घडवून आणिली**

बिभीषणाच्या व रामभक्तिच्या बलानें त्या वृद्धाची रक्तपिती साफ नाहींशी होऊन तो उत्साहानें व आनंदानें प्रफुल्लीत झालेला होता.

भगवंताची इच्छा! समुद्राच्या लाटांनीं त्याला ढकलीत ढकलीत ज्या भागांतून तें जहाज प्रवास करीत होतें, त्या भागांत अगदीं जहाजाच्या कांठावर त्याला नेऊन सोडलें.

जहाजावरील लोकांनीं त्या तेजःपुंज पुरुषाला पाहून आश्चर्य प्रगट केलें. त्याच्याबद्दल सर्वांना कुतुहल वाटत होतें.

त्यानें आपली सारी हकिगत जहाजावरील लोकांना सांगितली. रामनामाच्या प्रभावानें मला बिभिषणाची भेट झाली. आणि त्याच नावाच्या जादूमुळें मला पहातांच तो भारला गेला. रामनामावर त्याची आत्यंतिक श्रद्धा. माझ्या सर्वांगावर रामनामाचे ठसे उमटून त्यानें माझ्यांत क्रांति घडवून आणिली त्या आणि कृपाप्रसादानें मला परत तुमच्यांत येणें शक्य झालें

धन्यो बिभीषणो भक्तो धन्यं रामेति नाम तत्।
यत्प्रसादात् महा पापादहमेंव विमोचितः

भक्त बिभीषण धन्य होय. रामनामाची महति कोणत्या शब्दांनीं वर्णावी? त्याच्याच कृपेमुळें माझीं सर्व दुःखें नाहींशी झालीं. धन्य तें रामनाम!

—पु. बा. कुलकर्णी

———

# रामराज्य भ्रम कीं सत्य?

( लेखक :—द. शं. टिपणीस )

**रामराज्य! किती मधुर व गोड वाटते कल्पना. रामराज्य आलं तर साखरेहून गोड होईल असं वाटतं. नाहीं? रामराज्य नको कोणाला? सर्वांना हवें, अगदीं हवी हवेंशी वाटणारी गोष्ट. स्वातंत्र्यानंतर रामराज्य येणार अशी आशा बाळगून होतों आपण. आतां ती मावळत चालली हें निराळें. असें असलें तरी अधून मधून आशा डोकावतेच.**

कांहीं गोष्टी अशा असतात कीं, त्यांची माणसाना सारखी आशा वाटत राहते. आशा वाटत राहणें हीच पूर्ती. मर्त्य असूनही ज्याला त्याला अमरत्वाचा भास होतो. व तसें समजून त्या जोरावर मानव आपलें व्यवहार करीत राहतो. पण तें कधीं कोणाच्या हातीं लागलंय कां? पण आहे व कधीं काळीं मिळेल ही आशा बलवत्तर. कोल्ह्यांत वाढलेल्या सिंहाच्या बच्याला आपणही कोल्हा आहों याची खात्री असली व कोल्ह्याप्रमाणें त्यानें व्यवहार केलें म्हणून काय झाले? अधून मधून आपण सिंह असल्याचा भास त्याला होणारच व दुसरा एकदा सिंह भेटल्यावर खरें काय तें उघडकीस येणारच. मुळचं पाणी कां लपतं? असेंच रामराज्याचें तर नाहींना? रामराज्य पाहिलें तर कोणीच नाहीं. आमची आपली कल्पना कीं असं कांहीं तरी होतं व पुन्हां केव्हांतरी येईल ही आशा. राजशाही, हुकूमशाही, लोकशाही आपण अनुभवानें जाणतो व त्यांत सरस निरस ठरवूं शकतो. पण रामराज्य! हजारों वर्षांपूर्वीची पारीस्थिति आजच्या मानवानें कल्पनेनें आकलन करावयाची. ती सुद्धा रामायणाच्या आधारें. रामायणाला आम्ही काय समजतो देव जाणें. रामायण पवित्र तर खरेंच. पण ते तरी तसें कुठें आपण पूर्णपणें मानतों. कुणी कांहीं भाकडकथा कल्पना सांगू लागला कीं, आपण म्हणतो काय रामायण लावलेस. रामायण रचतोय झालं एक मन पवित्र मानते तर दुसरें मन भाकड कथा समजतें. अशा मनानें केलेल्या कल्पना मानावयाच्या व तसं व्हावं अशी आशा करावयाची, त्यांत पुन्हां रामराज्य षष्ठीतत्पुरुष. लोकशाहीचा भोक्ता असलेल्या आजच्या मानवानें राजशाहीची आशा धरणें म्हणजे अचंबाच म्हणावयचा. चमत्कारीकच वाटतात हे सर्व विचार, नाहीं? कशाचा कांहीं मेळ बसत नाहीं. लोकशाहीचे गोडवे गाता गाता कोणाला तरी प्रभू मानून त्याच्या आश्रयाखालीं आनंदानें जीवन कंठावें अशी मनाच्या कुठल्या नाहीं कुठल्या तरी कोपऱ्यांत मानव आशा बाळगून आहेच. समाजवाद, सर्वांची मालकी असें

म्हणतां म्हणतां आपला कोणी तरी मालक आहे ही आशा आमच्यात वास करून आहेच. प्रभू रामचंद्राचा तर हा प्रभाव नसेल ना ! जें नाहीं असं वाटतं त्याकडेच आपल्या आशा धांवत सुटतात. चमत्कारच म्हणायचा. पाहिलें नाहीं कीं ऐकलें नाहीं असं रामराज्य. तें आज नाहीं याची खात्री, पण ते पाहिजे व मिळेल ही आशा. मुळांत रामच म्हटला तर आहे म्हटला तर नाहीं असा आहे. आहेही व नाहींही अशातला भाग आहे वाटतं नाहीही वाटतं. असं हें आमच्या आनंदाचें व सुखाचे मुळ व त्यामुळचा विस्तर जें रामराज्य त्याचा विचार प्रभुरामचंद्राच्या या मंगल मासांत करणें म्हणजे प्रभुरायाचें पुण्यस्मरण करणें नव्हे तर काय ?

रामराज्याची आमची कल्पना रामायणावरून बहुतांशीं झालेली आहे. रामराज्य म्हणजें ऐहिक सुख. ज्या राज्यांत ऐहिक सुख भरपूर व सर्वांना उपलब्ध व दुःखाचा लवलेशहि नाहीं असें राज्य आले कीं आम्हीं म्हणूं रामराज्य आलें. ही कल्पना रम्य वाटली तरी सत्य स्वरूप धारण करणारी आहे काय ? रामराज्यांत सर्व सुखी होते असें आपण मानतो. खरं असलं तरी त्या कालीं जी सामाजिक व राष्ट्रीय परिस्थिति आजच्या काळांत पुन्हां आपण निर्माण करूं शकूं कीं काय याचा आपण विचार केला पाहिजे. मानवाच्या सुखनिर्मीतीसाठीं रामायण काळीं जें आदर्श ठेवलें गेलें व ज्यांचा उल्लेख रामायणांत येतो ते आदर्श आजची व्यक्ति वा समाज पुढें ठेवून चालूं शकेल काय ? यावेळेचें आदर्श आजच्या बुद्धिनिष्ठ जीवनांत आदर्श म्हणून खरोखरच स्वीकारले जातील कीं काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आजच्या औद्योगिक व ॲटॉमिक युगांत पूर्वकालाप्रमाणें माणसामाणसांचे व्यवहार होणें अशक्य आहे. औद्योगिकरण म्हटलें कीं व्यापार आलाच. व्यापार म्हटला कीं उलाढाली आल्याच. थापा व बनवाबनवी-शिवाय उलाढाली होणें शक्य नाहीं म्हणजे खोट्याला अग्रस्थान आलें. अशा स्थितींत त्या सत्ययुगांतील सत्याला काय मुल्य येणार ? निष्पाप व सरळ मनाचें रामाचें राज-कारण आजच्या गुंतागुंतीच्या राजकारणांत टिकाव धरील काय ? रामाचा एकवचनी-पणा आजच्या राजकारणांत पाळला तर खुर्ची लौकरच रिकामी करण्याची पाळी येईल. त्या काळीं धर्म व माणुसकीवर व्यववहार आधारलेले होते. कर्तव्याला मोल होतें. आज सर्व कांहीं पैशावर येऊन बसले आहे. सीतेचा आदर्श काय आजच्या स्त्रिया पाळूं शकतील ? त्याकाळीं प्रेमापेक्षां पराक्रमाला अधिक मोल होते. पराक्रमाकडे पाहून स्त्री पुरुषाला वरीत असें हें स्वयंवरावरून दिसून येतें. त्या कालीं आजच्यासारखा प्रेमाचा संसार नव्हता कीं संसाराचें प्रेम नव्हतें. प्रेमळ संसार असत व संसारांत प्रेमळ असत ते. आज पराक्रमा-पेक्षां प्रेम व प्रेमापेक्षां पैसा आम्हांस अधिक प्रिय झाला आहे. कारण तसं तें असल्याखेरीज जगणें आज मुष्किल झालें आहे. तत्त्वासाठीं नव्हे तर पैशासाठीं माणसं मरताहेत. त्याकाळीं देवाचा पैसा होता तर आज पैशाचा देव झाला आहे. ज्यांत पैसा नाहीं त्यांत आम्हांला राम दिसत नाहीं. जसा देव तसा भाव. रामाच्या भक्तीनें

मानवाठायीं निर्माण होणाऱ्या भावना व पैशाच्या भक्तीनें निर्माण होणाऱ्या भावना यांत महदंतर आहे. पैशाभोंवती खोट्याचा खंदक असल्यामुळें त्यांत डुबळ्याखेरीज पैसा हातीं लागत नाहीं. राम आनंदाच्या पवित्र गंगेत असल्यामुळें या गंगेत बुडी मारल्याखेरीज तो हातीं येणार नाहीं. दोन्हीं भक्तीपासून निर्माण होणाऱ्या मानसिक ठेवी मधील अंतर ध्यानांत घेतल्यास पूर्वीच्या कालचे बंधुप्रेम पितृप्रेम राजकारण वगैरेचे आदर्श आजच्या मनाला पटणें शक्य नाहीं हें स्पष्ट दिसते. रामराज्यांतले सुख मिळेल ही आशा फोल ठरते. पूर्वीपेक्षां आज ऐहिक सुखें अधिक उपलब्ध झाली असली तरी सुखाच्या पाठीस चिकटलेली दुःखेंहि वाढलेली आहेत. सर्व सुखी झालें कीं रामराज्य आले ही कल्पना फोल आहे. तो भ्रम आहे. कारण एकाचें सुख तें दुसऱ्याचें दुःख असणारच. अशा प्रकारें अधिक खोलवार विचार केल्यास हें सहज ध्यानीं येईल कीं रामराज्याची कल्पना हल्लीच्या काळीं सशाच्या शिंगाप्रमाणें आहे. ऐहिक सुखें आम्हांस पाहिजेत पण ती नितांत असणें शक्य नाहीं. सुखासाठीं दुःख भोगलेच पाहिजे. जगीं सर्व सुखी असा कोण आहे असा श्रीरामदास स्वामीचा प्रश्न आहेच. नितांत सुख फक्त रामराज्यांतच मिळेल. पण हें रामराज्य तुमच्या आमच्या अवतीं भवतीं सापडणार नाहीं. त्याचा शोध निराळ्याच जगांत घेतला पाहिजे.

बाह्य जगांत रामराज्याचा शोध घेणें निरर्थक ठरेल. लंकेंत कां कोठें रामराज्य सापडणार? व त्याचं अधिराज्य असणार? लंकेंत सोन्याच्या विटा होत्या म्हणतात. असतील वा नसतील. पण या ऐहिक जगांत विटाच काय पण सर्व व्यवहार सोन्याचे आहेत. ज्याच्या हातीं सोनें त्याचें सर्व कांहीं. त्याचें व्यवहार जगाला मान्य. सोन्याखेरीज यश नाहीं कीं मोठेपण नाहीं. या सोन्याच्या लंकेंत अहंरावणाचें राज्य आहे. रावणाला दहा तोंडे आहेत. दहा तोंडांनीं कितीही खाल्ले तरी अपुरे पडते त्याला. आपल्या दहा तोंडांनीं दहाही दिशांनीं तो आज जगाला खात आहे. विष्णूची अर्धांगीलक्ष्मी म्हणजेच रामाची सीता रावणानें पळवून आणली असून तो तिच्या मोहात गुंतला आहे. यथा राजा तथा प्रजा या न्यायानें जग ही लक्ष्मीच्या मोहांत गुरफटून तिच्या मागे लागले आहे. पण सीता कां कुठें लंकेंत राहणारा' ती काय रावणाच्या हाती लागणार? पावित्र्याची मूर्ति आनंदाचा निर्झर. प्रेमाचें अमृत अशी सीता काय अहंच्या नादी लागणार? चिखलांतून कां शुद्ध व थंडगार निर्झर वाहू शकेल? शेवटीं ती रावणाच्या हातून निसटलीच व आपल्या रामाला आपल्या रुपाला जाऊन मिळाली. यामुळें लक्ष्मीच्या मागें धांवता धांवता व नाना खटपटी लटपटी करतां करतां शेवटीं सर्व जण रिक्त. हस्तानें जात आहेत. अशा या वासनामय लंकेंत कां राम येणार व राज्य करणार ? त्यानें तर लंकेचें दान कधींच करून टाकलें आहे. आपण उगाच आशेनं डोळे लावून बसलों आहोंत झालं. नजर फिरविली तर दिसेल कीं **दशमुखरावणापेक्षां दशरथ रामच** खरें सुख देऊं शकेल. कांहींही झालं तरी मुखाना खायला हें लागणारच पण रथ लोककल्याणार्थ झिजत असतात. वास्तव

सुखाचा शोध लंकेंत न घेतां; कधीं काळीं या लंकेंत रामराज्य येईल या भ्रमांत न राहतां ज्या ठिकाणीं राम आहे तेथें सुखाचा शोध घेणें व वनवासांतून राम परत आल्यावर रामराज्य होईल व आपणांस सुख मिळेल अशी आशा करणें अधिक डोळसपणाचें होईल.

वास्तव लंकेचा त्याग करून अंतर्जगांत शिरल्याखेरीज रामाचा व सुखाचा शोध लागणार नाहीं. हा एकला मार्ग आहे, वासनांचा त्याग करून अंतरंगाचा ठाव घेतला तर रामाचा शोध लागेल व रामराज्यांतील सुख मिळेल. राम चिरंजीव आहे. व तो अयोध्येंत अंतरंगांत आहे. पण रावणाच्या संगतीमुळें आम्हीं त्याला मुकलों असून आज आमच्यांत राम राहिला नाहीं. आपलें हृदयसिंहासन रिकामें आहे. रामाबरोबर सीता शुद्ध प्रेमही वनवासी झालें आहे व छायेप्रमाणें रामाबरोबर सदैव असणारा पराक्रम लक्ष्मणही वनवासी झाला आहे. रामाची एकनिष्ट भक्ति आजोळी गेली ही संधि साधून अयोध्येंत अभक्तिनें थैमान घातलें व परिणामी रामाला वनवासांत जावें लागलें. हृदय सिंहासन रिते राहिले. भरताची निष्ठावंत भक्तीही त्याला परतवूं शकली नाहीं. भरताच्या आग्रहास्तव आपल्या पादुका **रामनाम** लोक-कल्याणार्थ रामानें दिल्या. संसार सागर तरुन जाण्यास भोपळ्याप्रमाणें त्याचा आजही उपयोग होत आहे. राम वनांत गेला. मागें राहिल्या त्याच्या पादुका—राम-नाम. त्यांची सिंहासनावर स्थापना करून रामनामानें भरतानें राज्य चालविलें. आजही आपण तसें करूं शकतो. भरताप्रमाणें इच्छा असेल तर आपणही मानूं शकतो. कीं हें राज्य–कुटुंब. वैभव वगैरे माझें नसून त्या वनवासी प्रभूरायाचें आहे व रामनामाच्या पादुका हृदयसिंहासनावर स्थापून रामस्मरणानें आपले व्यवहार करूं शकतो. असें केलें तर बारा वर्षांच्या तपश्चर्येनंतर रावण व त्याचें सहकारी राक्षसवासना यांचा नाश होऊन राम परत येईल व रामराज्य सुरूं होऊन अक्षय सुखाचा लाभ होईल. ज्या रामनवमीच्या दिवशीं रामाचा जन्म लौकिक दृष्टया देवळांदेवळांतून न होता अंतः-करणांतून होईल ती आपली खरी रामनवमी होय. जोंपर्यंत आधुनिक वैभवानें नटलेल्या या लंकेत पृथ्वीवर सीतेच्या लक्ष्मीच्या मागें लागलेला रावण व त्याचें साथदार वासना राक्षस थैमान घालीत आहेत. तोंपर्यंत अयोध्येंत अंतर्यामीं राम प्रगट होणें शक्य नाहीं. जेव्हां रामनामाच्या बाणांनीं रावणासह राक्षसांचा नाश होईल तेव्हांच राम अयोध्येंत प्रगट होईल, त्याचें दर्शन घडेल व रामराज्य येईल. रामनामाचें सुदर्शन जसं जसं घरोघरीं फिरेल तसं तसं रामराज्य जवळ जवळ येत राहील. हा सुदर्शन चरखा घरोघरीं चालविण्याच्या व राम-नामाची टकळी फिरविण्याच्या कार्यास आपण या रामनवमीच्या शुभदिनीं प्रारंभ करूं या.

# प्रसन्न मनिं वाटे—

विलोकितां तवरूपा, देवा
प्रसन्न मनिं वाटे
आज हा हर्ष हृदयिं दाटे — विलोकितां...

आजवरीच्या आतुरतेला
बंदिवास जो बराच घडला
विमोचनाचा दिवस उगवला
म्हणुनि नयनीं प्रेमाश्रूंचा अवखळ पूर लोटे
प्रसन्न मनिं वाटे। आज हा हर्ष हृदयिं दाटे.

अंध तिमिराचा नाश होवुनी
पुण्याईची प्रभा फांकुनी
भाग्य रवी जणूं आयुवितानीं
गमे उगवला साईनाथा वदतों नच खोटें
प्रसन्न मनिं वाटे। आज हा हर्ष हृदयिं दाटे.

बहु दिवसांच्या अवधी नंतर
दृग्गोचर तव मूर्ति सुंदर

वसो हृदयीं तीं अतां निरंतर
आनंदाची महती गाया पडती शद्ब थिटे
प्रसन्न मनिं वाटे। आज हा हर्ष हृदयिं दाटे.

तुझ्या दर्शनाची जी तळमळ
शमली सारी, नुरे न खळबळ
उपासनेचें व्रत तव आवचळ
जीवनांग तें सदा बनूं दे, हो नच उफराटें
प्रसन्न मनिं वाटे। आज हा हर्ष हृदयिं दाटे.

विलोकितां तव रूपा देवा । प्रसन्न मनिं वाटे
आज हा हर्ष हृदयिं दाटे.

—वि. तु. खुबाळकर, एम्. ए. बी. टी., रामटेक.

# मला भेटलेले सत्पुरुष

************************

( ले.— के. के. प्रधान. )

**श्री. नूरीबाबा**

सत्पुरुषांचा सहवास हा नेहमीं बहुमोलाचा असतो. त्यांच्या अगदीं जवळ बसून व त्यांची कृपा संपादन करून त्यांच्या अंतरगांत शिरण्याच्या प्रयत्न करण्याच्या सध्या माझ्या महत्भाग्यानें मला वारंवार प्राप्त झालेल्या आहेत. इ. १९२१ सालीं मी ठाणे येथें इंग्रजी ६ वे इयत्तेंतून पास होऊन ७ वीत म्हणजे मॅट्रिकचे वर्गांत गेलो होतों. माझ्या परमपूज्य वडिलांच्या निधनामुळें घरची आर्थिक परिस्थिती बरीच बिकट झालेली होती. गांधींजींची स्वराज्याची चळवळ त्यावेळीं फारच ज़ोरांत असल्यामुळें बहुतेक विद्यार्थ्यांचें शिक्षणावरचें लक्ष उडालेलें होते व मलासुद्धां मी मॅट्रिक परिक्षेतून कसा पास होतो याची विवंचनाच पडली होती. अशा परिस्थितींत माझा एक मित्र घरीं आला व मला म्हणाला कीं,येथें मखमाळी तळ्यावर नूरीबाबा या नावांचे एक सत्पुरुष राहतात व त्यांच्या कृपा प्रसादानें विद्यार्थ्यांना परिक्षेंत यश मिळते.तेव्हां त्यांना भेटण्यास माझेबरोबर येतोस कां ? मी तें ताबडतोब कबूल केलें. व आम्ही दोघें नूरीबाबांचे दर्शनास गेलों. नूरीबाबा हे जातीनें मुसलमान असून त्यास आजूबाजूचे लोक श्री दत्तात्रयाचा अवतार समजत असत. उंच सडपातळ मनोहर बांधा, अंगांत कफनी व डोक्यावर काळी मखमलीची टोपी असें त्या सत्पुरुषाचें वर्णन केलें तर ते सार्थ होईल. मख-माळी तळ्याजवळील एका बैठ्या घरांत ते रहात. घरासमोरील अंगणांत एक चौखोपी मंडप घालून मुसलमानी थाटाची लोड तक्याची बैठक घालून तेथें ते भेटीस येणाऱ्या माणसांचें हंसत मुखानें आदरातिथ्य करीत. एका कोपऱ्यांत सुरई सारखा पाणी पिण्याचा खुजा व दुसऱ्या कोपऱ्यांत सतत ऊदधूप जाळण्याचे पात्र ठेवलेलें असे. त्याच्याजवळ एक लांबलचक काळा शिकारी कुत्रा व एक मोर होता. आम्ही जातांच अतिशय अगत्यानें त्यांनी आम्हांला लोडाजवळ त्यांचेच बाजूस बसण्यास सांगितले. नंतर मजकडे पाहून मी कोण कुठला याची चौकशी न करता ते म्हणाले, " बाळ तुझी जॉमेट्री कच्ची आहे. तूं मॅट्रिक कसा होणार ? " मी म्हणालो, " होय कच्ची आहे खरी. " तेव्हां ते म्हणाले, " तूं आतां असें कर कीं रोज पहाटेस ५ वाजतां उठत जा व जॉमेट्रीचे थियरम वाचून नंतर ते पाटीवर लिहून काढीत जा म्हणजे तूं पास होशील " नंतर त्यांनीं आम्हांला कॉफी दिली व निरोप देतानां म्हणाले, " तुझी आई बहुतेक वेळ तुझ्या न जवळ राहील. तिच्याकडे नीट लक्ष दे." मला कांहीं एक न विचारतां वरील चार शद्बांत माझ्या परिस्थितिचा आढावा घेणारा सत्पुरुष अजूनही मला आठवतो. त्याच्याच कृपेनें मी त्यावर्षी पासही झालों. व माझी आई तिच्या हयातीतील बराच काळ मजजवळच राहिली.

## :उपासनी महाराज

इ. स. १९२७ साली मी बी. एच्या परिक्षेला बसलों.व परीक्षेचा निकाल लागण्या-च्या पूर्वीच्या सुट्टींत मनमाड येथें माझे वडील बंधु एक्साईज इन्स्पेक्टर होते त्यांचेकडे रहावयास गेलों. मनमाडपासून कांहीं मैलावर येवले येथें आमचे एक नातेवाईक रहात असत. त्यांचेकडे सहज भेटीनिमित्त गलो असतां तेथें 'उपासनी' या आडनावांचे एक गृहस्थ भेटले ते उपासनी नावांचे गृहस्थ साकोरीच्या उपासनी बाबांचे महान् भक्त होते. व त्यांनीं मला त्यांचेबरोबर साकोरीस जाण्याचा आग्रह केला. वाचकांस आठवत असेलच कीं, याच सुमारास मुंबई येथील श्री.तटणीस यांचे 'विविधवृत्त' साप्ताहिकांत साकोरीच्या उपासनी बाबाबद्दल सतत खोडसाळ निंदाप्रचुर लेख येत असत व ते लेख मीहि वाचले होते व त्यामुळें माझे मन त्यांचेबद्दल फारच कलुषित झाले होते. तरी देखील त्या गृहस्थाचे आग्रहास बळी पडून म्हणा किंवा प्रत्येक्ष परि-स्थिति काय आहे हें डोळ्यांनी पहावे या इच्छेनें म्हणा, मी त्या इसमाबरोबर साकोरीस जाण्यास तयार झालों. साकोरीस जातांच त्या इसमाच्या ओळखीच्या एका कर्मठ वृद्ध गृहस्थाचे घरीं आम्ही उतरलो. तेथें मनासारखे आमचे स्वागत न झाल्यामुळें आम्ही थोड्याच वेळानें उपासनी बाबांच्या आश्रमाचा रस्ता धरला आश्रमात मध्यभागी एका कमटीच्या पिंजऱ्यांत उपासनी बाबा गुडग्यांत मान घालून स्वस्थ बसले होते. आम्हीं पिंजऱ्याजवळ जातांच, " मला कशाला उगीच त्रास देतां. चालते व्हा येथून " वगैरे शब्दांत बाबांनीं आमची संभावना केली. ते शब्द ऐकून माझे मन बरेंच नाराज झालें. परंतु माझ्याबरोबर असलेल्या इसमाला माझ्यापेक्षांहि वाईट वाटलें असावें. कारण कीं त्यानें मला धीरें देऊन उपासनीबाबा खरखुरे सत्पुरुष आहेत. हें पटविण्याचा प्रयत्न सुरुं केला. सत्पुरुषाच्या दारीं आंब्यांचा वृक्ष असेल यांत कांहींच नवल नाही. पण आमच्या उपासनी बाबांच्या बागेंत मांडवांवर आंब्यांची वेल चढविलेली आहे व तिला फारच सुंदर हापूसचें आंबे येतात अशी त्यांनीं मला माहिती दिली. व त्या आंब्याला ' गंधर्व ' आंबा असें म्हणतात असे पण सांगितलें. ' गंधर्व ' आंबा म्हणण्याचें कारण कीं तो आंबा वरुन कानाला लावला कीं त्यांतून स्वर्गीय संगीत ऐकूं येते. ही सर्व माहिती ऐकतांच त्या आंब्यांचा वेल पहाण्याची माझी उत्सुकता अतिशयच वाढली व मी त्या इसमाबरोबर ती वेल पहाण्याकरीतां उपासनी बाबांच्या अंगणांतील बागेंत गेलों. तेथें खरोखरच आंब्यांची वेल मांडवावर चढविलेली होती व तिला सुंदर आंम्रफळें आलेली होती. त्यांतील एक फळ हातांत धरून स्वर्गीय संगीत ऐकण्याच्या इच्छेनें कानाला लावलें मात्र तोंच उपासनी बाबांच्या आश्रमामधील दहा बारा लहान मुलें मुली माझ्याकडे धांवत आली व त्यांनीं मला माझें भोंवताली हातांनीं कडे करून उपासनी बाबांचें हुकूमावरून गिरफदार केलें आहे असें सांगितलें व खेंचतच बाबांचेसमोर नेऊन उभे केलें.

त्यावेळेस बाबा पिंजऱ्यांत उभे राहिले होते. उंच सहा फूट देह यष्टी, अंगावर जर्द पिवळा घमक रंग व खदिरांगारासारखे डोळे हा बाबांचा सर्व अविर्भाव पाहून मी भीतिनें कापूं लागलों. "माझ्या बागेंत शिरून माझ्या आंब्याला हात लावतोस ? तुझा माझा गेल्या जन्माचा काय संबंध आहे ? इथून ताबडतोब चालता होतोस कीं नाहीं ?" अशा व इतर कडक शद्बांत बाबांनी माझी संभावना करतांच मी तेथूनच आश्रमाच्या बाहेर धूम ठोकली व थेट रस्त्यावर येऊन उभा राहिलों. या गडबडींत माझ्या बरोबर आलेल्या इसमाचें काय झाले कोणास ठाऊक. इतक्यांत साकोरीसारख्या त्या खेड्यांत मी रस्त्यावर उभा होतों त्या नेमक्या ठिकाणीं त्या दिवसांत न दिसणारी अशी एक कोरी करकरींत सुंदर नवी मोटार येऊन उभी राहिली व त्यामधील शुभ्र पांढऱ्या कपड्याचा शोफर खाली उतरला व त्यानें लवून सलाम केला व तो मला म्हणाला "साहेब, आपल्याला मनमाडला जायचे आहे नां ? गाँडी तिकडेच चालली आहे. आपण आंत बसा." मी घाबरतच त्या वृद्ध कर्मठ गृहस्थाच्याकडे जाऊन माझे सामान घेऊन गाडींत बसलो. गाडी विद्युत्वेगानें मनमाडचे रस्त्याकडे जाऊं लागली व तो शोफर उपासनी बाबांची महती मला मनोरंजक तऱ्हेनें सांगू लागला. वेळ कसा गेला समजलें नाहीं व ही गाडी कोणाची व ती मला मनमाडला कां घेऊन जाते आहे वगैरे प्रश्न त्या शोफरला विचारण्याचें मला भानच राहिलें नाहीं. मनमाडला थेट माझें वडील बंधूंचे बंगल्यांत मला सोडून व माझें सामान खाली उतरून व पुन्हां एकदां मला सलाम करून तो शोफर झटकन् गाडी घेऊन निघून गेला व नंतर मी शुद्धीवर आलों. उपासनीबाबांनीं मजवर केलेल्या या उपकारांची जाणीव व आठवण मला वारंवार होते. मग लोक त्यांना कांहींहि म्हणोत.

### श्रीगजानन महाराज गुप्ते

इ. स. १९३६ सालीं मी नाशिक येथें नोकरीनिमित्त होतों. एका रविवारच्या दुपारीं घराशेजारी कलेक्टर कचेरींतील एक गृहस्थ माझे घरीं मला भेटावयास आले व बोलतां बोलतां त्यांनीं मला नाशिक येथें वास्तव्य करीत असलेल्या एका सत्पुरुषाची माहिती सांगितली.त्यांचे नांव श्रीगजानन मुरलीधर गुप्ते उर्फ 'गजानन महाराज' हे प्रसिद्ध 'Bee' कवींचे धाकटे बंधु. नाशकांतील बायांच्या रामाच्या मंदिराच्या मागें तिंवढ्यामध्यें ते रहात असत त्या गृहस्थानीं त्यांचेविषयीं मला बरेच कांहीं सांगितल्यामुळें मी त्याच वेळेला त्या गृहस्थांचेबरोबर त्यांचेकडे गेलों. काठीला कपडे घालावे इतकी कृश मूर्ति वयाच्या आठव्या वर्षीच देवीच्या आजारामुळें दोन्ही पायानें पंगु. अशातऱ्हेचा हा महापुरुष अतिशय प्रसिद्धिविन्मुख स्थितींत नाशकाच्या एका कोपऱ्यांत पडलेला जेव्हां मी पाहिला तेव्हां मला खरोखरीच वाईट वाटलें. व दिवसेंदिवस त्यांचा व माझा सहवास वाढला. नंतर तर एकादें रत्न किंमत न कळतां

माणसानें उकिरड्यावर फेकून देण्याचा मूर्खपणा कां करावा हेंच मला कळेनासे झालें. नवनाथांतील चौरंगी नाथांची ती यांची योग्यता. "आपणासारखे करिती तात्काळ नाहीं काळ वेळ तया लागी" या उक्तीने निदर्शीत केलेली ती पुण्यपूर्ती इतक्या निष्काळजीपणानें लोकांनीं दूर कां लोटून दिलेली आहे याचा मला कांहींच बोध होईना. मी ज्या वेळेला गजानन महाराजास भेटावयास गेलो त्यावेळीं ते एका चटइवर बसलेले होते. मोठ्या मजेंत एक सिगारेट ओढीत होते. त्यांचे जवळ जाऊन बसल्यानंतर थोड्या वेळांत त्या सिगारेट मधून हजारों स्वर्गीय फुलांचा वास एकदम यावा तसा सुवास येऊं लागला व ती खोली त्या सुवासानें अगदीं भरून गेली-दरवळून गेली. या चमत्कारानें मी कावरा बावरा झालेला पाहातांच महाराजांनी सिगारेट खाली ठेवली व जवळ बसलेल्या एका इसमाजवळून विडी घेऊन व ती शिलगावून ती ओढूं लागले. तो काय चमत्कार कीं, पूर्वीच्या वासापेक्षांही दुप्पट वास आसमंतात दरवळला. मग सिगारेटही नको व विडीहि नको हा माझा प्रसाद तुला असा घे. असे म्हणून त्यांनीं तोंडातून एक जोराचा भपकारा मजकडे सोडला. तो सुवास माझ्या कोट विजारीवर इतका जोरानें चाल करून आला कीं, त्यानंतर कित्येक दिवस ते कपडे घातल्याबरोबर तो वास मला येत असे. श्रीगजानन महाराज हे आपल्या भाचेजावयांकडे रहात असत. त्यांच्या भाचीचें नांव कमळाबाई असे होते. कोणीहि इसम महाराजांस भेटण्यास आला कीं, त्यांचे आदरातिथ्य करून थोड्या वेळानीं ते स्वयंपाकघराकडे तोंड करून 'कमळे' चहा आण असें ओरडत असत व तो चहा येण्यापूर्वीच तो इसम समाधीस्थितींत गेलेला असावयाचा. व चहा पिण्यासाठीं मोठ्या कष्टानें पुन्हां पृथ्वीतलावर आणावा लागावयाचा. अर्थात हें सर्व महाराजच करीत. अशी शेकडों उदाहरणें मी प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिली आहेत. घटकेंत १०७ डिग्री ताप तर घटकेंत थंडगार शरीर. अशी महाराजांची स्थिती पाहून कित्येक नामांकित डॉक्टरानी आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. डॉक्टरांची परीक्षा घ्यावयाची असल्यास महाराज त्यास डाव्या बाजूस एक हृदय व उजव्या बाजूस दुसरें हृदय दाखवून वैद्यकीय ज्ञानाची टर उडवीत. या अप्रसिद्ध सत्पुरुषास हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून रोज शकडों पत्रे येत असत. व तुमची मूर्ती व तुमचा पत्ता आम्हांला स्वप्नांत दिसला असा त्या पत्रांत उल्लेख असे. त्यांच्या निव्वळ दर्शनानें माणसाच्या सुप्त कुंडलिनी शक्ती ताबडतोब जागृत होत असत. योगांतील अती उच्च अशी उन्मनी अवस्था दुसऱ्याला प्राप्त करून देणें हा तर महाराजांचे हातचा मळ होता. या थोर पुरुषापासून मी पुष्कळच शिकलों.

माझे भवसागरांत धडपडणारे जीवनतारू योग्यपथावर लावणाऱ्या या श्रेष्ठ पुरुषास मी सदैव माझ्या गुरुस्थानीं समजतों.

## गोपाळराव कसबेकर

सन १९४३ साली माझी बदली पुण्याहून मुंबईस झाली. ही बदली होण्यापूर्वी एक महिना मला आध्यात्म मार्गांत नाशिक येथील सद्गुरु गजानन महाराजांसारखा कुणी वाटाड्या मिळावा अशी तीव्र इच्छा झाली. आणि योगायोग असा कीं, त्या इच्छेची पूर्तीही अशीच अचानक घडून आली. तो शनिवारचा दिवस होता. व आमचे ऑफीस सकाळीं होते. सकाळचे साधारण ८ वाजण्याचे सुमारास माझ्या टेबलावर एकामागून एक असे वरिष्ठांकडून कामाचे कागद येऊं लागले व तें काम भराभर संपवण्याचे मी मार्गे लागलों. इतक्यांत माझ्या एका सहकाऱ्यानें आणखी एक फाईल मजकडे आणून दिली व मला कृपा करून जलदी हातावेगळें करण्यास सांगितलें, ज्या इसमासंबंधीं ती फाइल होती तो इसम ८० वर्षांचा म्हातारा असून त्याला ऑफिसांत जास्त वेळ तिष्टत ठेवणें योग्य नव्हतें. तरी देखील कामाच्या बोजामुळें मी शिपायास त्या इसमास आणून शेजारच्या वेटींग रूममध्यें बसविण्यास सांगितलें व मी माझें इतर काम करूं लागलो. मध्यंतरी ते वृद्ध गृहस्थ मात्र मी काम करीत असता माझें खोलींत डोकावून वरचेवर पाहूं लागले त्यामुळें माझें कामांत व्यत्यय येऊं लागला. तेव्हां रागाऊन मी 'आंत डोकावून पाहूं नका. नाहींतर तुमचे काम होणार नाहीं, असा निरोप त्याना शिपायाकरवी सांगितला तेव्हां तो गृहस्थ हाताची घडी करून देवासारखा स्वस्थ बसला नतंर कांहीं वेळानें मी त्यास बोलावून त्यांचें काम संपविलें व त्यास घरीं जाण्यास सांगितलें.

परंतु माझें न ऐकतां त्याच कंपौडांतील एका शेजारचे ऑफिसांत ते जाऊन बसले व तेथील गृहस्थास म्हणाले कीं, "ते प्रधान; त्यांनीं माझें काम आतां केले. ते मला लवकरच परत बोलावतील म्हणून मी इकडे येऊन बसलों आहे." इकडे मला माझा सहकारी येऊन विचारूं लागला कीं, "अरे, आतां तूं ज्यांचे काम केलेस ते गृहस्थ तुला माहित आहेत कां कोण आहेत ते ? ते पुण्यांतील एक नामांकित योगी पुरुष आहेत !" माझ्या सहकाऱ्याचे हे शब्द ऐकतांच मला जरा धक्काच बसला. कारण मी नुकताच त्या गृहस्थांचा अपमान केला होता. निदान त्या अपराधाची क्षमा तरी मागावी या हेतूनें मी माझ्या शिपायाला ते जवळच कोठें असल्यास बोलावून आणण्यास सांगितलें. व तो शिपाई त्यांस घेऊनच माझेकडे आला. आतां बाजू मजवर उलटली होती. मी विचारलें, "महाराज आपण योगी आहांत काय !" माझेकडे एक तीव्र कटाक्ष फेंकून व पांढऱ्या केंसाच्या भृकुट्या वर चढवून त्यांनीं मला उलट प्रश्न केला "कां, शंका येतें कां ?" मग पुढें तेच म्हणाले, "नाहीं नाहीं शंका येतें तुम्हांला" पण तेथेंच डोक्यावरील टोपी काढून त्यांनीं मला, आज्ञाचक्र, ब्रम्हरंध्र वगैरे ठिकाणीं हात लावण्यास सांगितलें. योग्यांची ही दोन्हीं ठिकाणें कुंडलिनीच्या उत्थानामुळें मोकळी झालेली असतात व तींतील रक्तस्राव इतर मान्य लोकांपेक्षां जास्त

जोरानें चालत असतो. किंबहुना तो त्या ठिकाणीं एकसारखा धडके मारत असतो हें मला ठाऊक होतें हें त्यानीं त्यांच्या दिव्य शक्तीनें ओळखले असावें. माझी शंका दूर करून नंतर त्यांनीं मला त्यांचे घरी येण्याचें आमंत्रण दिलें. या प्रथम भेटीनंतर माझा त्यांचा अतिशय दृढ परिचय झाला. ते मजवर अतोनात प्रेम करीत असत. व माझी मुंबईस बदली झाल्यानंतर मला वारंवार मुंबईस येऊन भेटत. असेच एकदां ते मुंबईस आले असतांना त्यांची परत पुण्यास जाण्याची वेळ झाली. त्यावेळीं ते थोडे दम्यानें आजारी होते. मी त्यांस निरोप देण्यास गेलो असतांना त्यांनीं मला एकाएकीं मिठी मारली व साश्रुपूर्ण नयनानें ते म्हणाले, "ही आपली शेवटची भेट. मी पुन्हां आपणांस भेटणार नाहीं." पुण्यास गेल्यावर अवघ्या ४।५ दिवसात त्यांनीं समाधी घेतली. असे सांगतात कीं, आपल्या सर्व भक्तानां मी गुरुवारी ५ वाजून ४५ मिनिटांनी जाणार अशी पत्रें त्यानीं सर्वांस लिहिलीं होतीं व शेवटचा श्वास सोडतांना ते बिछान्यावर उठून बसले व सर्वादेखत त्यानीं बसल्या बसल्या समाधि घेतली. या पुण्य पुरुषाचे नांव गोपाळराव कसबेकर संन्यासाश्रम पत्करण्यापूर्वी ते डेप्युटी अकौटंट जनरलचे हुद्यावर होते व त्यास रु. २७०० द.म. पगार मिळत असे. त्यांची पुणें येथील स्वतःच्या मालकीचीं दोन्ही घरे त्यांनीं आपल्या नातेवाइकांस बक्षीस दिली.

**शिरडीचे साईबाबा**

माझा शेवटचा व अतिशय महत्त्वाचा असा सत्पुरुषाचा सहवास हा प्रत्यक्ष भेटीचा नसून थोडासा साक्षातकारी स्वरुपाचा आहे. आणि तो म्हणजे शिर्डीचे श्रीसाईबाबा यांचा होय. ३० मे १९५२ रोजीं मी माझे सर्व मंडळीसह पुण्याहून साताऱ्यास माझे स्वतःचे मोटारींतून जात होतो. मोटार शिरवळहून कांहीं मैलावर पुढें गेली होती. सुमारें ७।-७॥ चा वेळ होता व सूर्य अस्तास जाण्याचे बेतांत होता. अशा वेळीं रस्त्यांत टोल नाक्यासमोर बैलगाडीनें मार्ग आडविल्यामुळें आमची मोटार थांबली व मी एकटाच मोटारी खालीं उतरून वेळ होता म्हणून बाजूंचे शेतांत फिरूं लागलो. माझे लक्ष सहजच वर आकाशाकडे गेलें. इतर संध्यांस्तापेक्षां यावेळीं आकाश जास्त पिवळे धमक झालेले मला दिसलें व त्यांतून बकुळीच्या फुलांची माळ गुफांवी त्याप्रमाणें चमचम करीत पिवळे किरण थेट माझ्या पायाजवळील जमिनींत शिरत आहेत असें मला वाटलें. थोड्या वेळांत ते किरण जेथें शिरत होते तेथील जमीन एकाएकीं दुभंगली व त्यांतून चटकन् एक दिव्य पिवळा जर्द, डोक्याला फडकें बांधलेला पुरुष माझेसमोर येऊन उभा राहिला व आपले कमलनयन मजवर रोखून मला 'भिवूं नको' 'भिवू नको' असा इशारा देऊं लागला. त्या दिव्य पुरुषास पाहून मला भीति वाटण्याऐवजीं एक दिव्य आनंद झाला व आनंद सागरांत मी पोहूं लागलो. तरी देखील 'घाबरू नकोस' मी तुझ्या पाठाशी

उभा आहे' असें शब्द उच्चारून अगदी थोड्यावेळांत पुन्हां पृथ्वीत गडप होऊन तो पुरुष मला दिसेनासा झाला. व झालें तें सत्य होते कीं भास होता या संभ्रमांत मी परत मोटारकडे आलो व रस्ताही मोकळा झाल्यामुळें मोटार पुढें चालू झाली. पुण्यापासून ६० वे मैलावर आम्ही आलो होतों. मोटारीचा वेगही भरमसाठ वाढला होता इतक्यांत एका एकी कोणीतरी धक्का मारल्या सारखी मोटार रस्त्यावरल्या बाजूच्या दगडावर जोरानें जाऊन आदळली व नेमका मोटारीच्या बाहेर तिचा दरवाजा उघडल्यामुळें बाहेर फेकला गेलों. क्षणार्धांत तो दिव्य पुरुष माझे समोर येऊन उभा राहिला व ' 'Hold up your breath ' असा इंग्रजीत मला हूकुम करून मला अलगत वरचेवर झेलून जमिनीवर ठेवून नाहींसा झाला. मी जमिनीवर सुखरूप उभा राहाताच अत्यंत कृतज्ञतेने माझे डोळे भरून आले व झालें तें खरे कीं खोटें सत्य की स्वप्न या दिव्य संभ्रमांत पार बुडून गेलो. अजूनही त्याप्रसंगाची आठवण होतांच अंग थरारून येते. वृत्ती बहरतात. कृतज्ञतच्या आसवानी डोळे डबडबून येतात व त्या महान् श्रेष्ठ योगिराजाच्या चरणावर मस्तक नत होते व तोंडातून सहजच उद्गार बाहेर पडतात "हे सांई तूं माझ्या पाठीशी उभा असल्यावर माझ्याकडे वक्र दृष्टीने पाहाण्याचा प्रत्यक्ष यमराजाची सुद्धा छाती नाहीं." मोटारीतील माणसानाही विशेष लागलें नाहीं.

---

# श्री साई वंदना

साई करितें तुज वंदना । साई करितें तुज वंदना ॥ धृ ॥

शब्द न सुचती स्तवन कराया ।
हे जय मंगल योगी राया ।
परोपकारार्थ तूं धरिलीस काया ।
उद्धाराया भक्त जनां ॥ १ ॥

धांव पाव गा साईनाथा ।
अनन्य भावें चरणीं माथा ।
रक्षीं मज हे साई समर्था ।
साई दयाधना ॥ २ ॥

करूणेची मम हांक ऐकितां ।
लेंकुरांवरी मातेची ममता ।
त्वांचि दिली मज ही निर्भयता ।
घ्यावें शतशः वंदना ॥ ३ ॥

—सौ. शांता अं. सरोदे

---

# श्री साईनाथ हॉस्पिटल

*** *** *** *** *** *** *** ***


गेल्या सुमारें दोन वर्षांपासून शिरडी येथें बाबांच्या कृपेनें व ठिकठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या बाबांच्या अनेक भक्तांच्या व शिरडी संस्थानच्या सहकार्यानें श्रीसाईनाथ हॉस्पिटलची उभारणी केली जात होती. शिरडीचे वैभव वाढविणारी व जनतेच्या कल्याणांत अपूर्व भर घालणारी अशी ही घटना आहे. आज लिहिण्यास आनंद वाटतो की, श्रीसाईनाथांच्या नांवें बांधण्यांत येणाऱ्या हॉस्पिटलचें कामकाज पूर्ण होत आलें असून रामनवमी महोत्सवानंतरच्या आठवड्यांत या हॉस्पिटलचा उद्‌घाटन समारंभ भव्य प्रमाणांत होणार आहे. सध्या त्याची तयारी उत्साहपूर्वक चालू आहे. या हॉस्पिटलांत एकंदर चौवीस खाटांची सोय करण्यांत आली आहे. तसेंच हॉस्पिटल सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयींनी व यंत्र सामुग्रीनें सुसज्ज करण्यांत येत आहे. अनेक सेवाभावी डॉक्टर आपल्या डॉक्टरी सल्ल्याचा फायदा या हॉस्पिटलला देण्यासाठीं स्वयंप्रेरणेनें पुढें येत आहेत. येथें शस्त्रक्रियेचीही उत्तम प्रकारची सोय करण्यांत येणार असून एका नामांकित व तज्ञ डॉक्टरांनीं ती जबाबदारी स्वीकारण्याचें मान्य केलें आहे. एकंदरींत बाबांच्या कृपेनें शिरडी हें एक रोगनिवारणाचें व दुःखी पीडित जनतेला दिलासा व आरोग्याचा लाभ करून देणारें त्या भागांतील एक नामवंत केंद्र बनणार आहे.

बाबांच्या कृपेनें शिरडी येथें भक्तांसाठीं व यात्रेकरूंसाठीं नाना प्रकारच्या सुखसोयी करण्यांत येत आहेत. त्यांत श्रीसाईनाथ हास्पिटलमुळें अत्यंत महत्त्वाची भर पडणार आहे.

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

# श्री साईनाथ हॉस्पिटल

## देणग्यांची साभार पोंच

शिरडी येथील श्रीसाईनाथ हॉस्पिटल फंडासाठीं ता. ८-२-६४ ते ता. १६-३-६४ पर्यंत रोखीनें देणग्या देणाऱ्यांची साभार पोंच पुढीलप्रमाणें :—

| अ. नं. | | नांव | पत्ता | रक्कम रु. | न.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. | B. S. Dingra | मुंबई | १० | ०० |
| २ | ,, | के. एस. पुरोहित | ,, | ११ | ०० |
| ३ | ,, | कांतीलाल वल्लभदास | ,, | ५१ | ०० |
| ४ | ,, | Adi Dinshaw | ,, | १०१ | ०० |
| ५ | ,, | पी. जे. नरवाणिया | ,, | ३० | ०७ |
| ६ | ,, | के. वसंतराव | नि. बाद | २५० | ०० |
| ७ | ,, | माधुरी तिवारी | शाहगड | २०० | ०० |
| ८ | ,, | शंकरराव आबाजी पाटील | कोल्हापूर | ३१ | ०० |
| ९ | ,, | ए. जी. आगसकर | अंबरनाथ | २० | ०० |
| १० | ,, | व्ही. डी. आबरे | मुंबई | ५१ | ०० |
| ११ | ,, | R. S. Betrabet | ,, | ११२ | २५ |
| १२ | ,, | आर. पी. करंदीकर | पुणें | ११ | ०० |
| १३ | ,, | चन्द्रभान जी. मायाल | मुंबई | ५१ | ०० |
| १४ | ,, | आर. सी. प्रसाद | पाटणा | ५० | ०० |
| १५ | ,, | E. I. Dabhoiwala | मुंबई | ५१ | ०० |
| १६ | ,, | सूर्यकांत रामराव भिवंडीकर | ,, | १५१ | ०० |
| १७ | ,, | के. आर. देसाई | ,, | १०१ | ०० |
| १८ | ,, | शेटना Shetna-P. | ,, | २१ | ०० |
| १९ | ,, | सांबशिव हनमंतू महीवार | अहेरी | ५१ | ०० |
| २० | ,, | Dr. K. G. Gaglani | मुंबई | ३५ | ०० |
| २१ | ,, | एम्. जी. रावल | नागपूर | ५०१ | ०० |
| २२ | ,, | एक साई भक्त | | १ | ०० |
| २३ | ,, | K. S. Buhia | अलाहाबाद | १००० | ०० |
| २४ | ,, | द्वारका प्रसाद टावरी | मुंबई | ५१ | ०० |
| २५ | ,, | विरवतीबेन घनसुखलाल जरीवाला | सुरत ३ | १०१ | ०० |
| २६ | ,, | नवीनचन्द्र जोशी | मुंबई | ६ | २५ |
| २७ | ,, | श्रीनिवास बळवन्त वेळवी | ,, | ११ | ०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | ,, | सुरेंद्र कृष्णराव शिरसाठ | ,, | ५१ | ०० |
| २९ | ,, | एन्. डी. व्यास | ,, | ४५ | ०० |
| ३० | ,, | दयाशंकर के. पंड्या | जूनागड | २५ | २५ |
| ३१ | ,, | रजनीकांत माणिकलाल | ,, | ११ | २५ |
| ३२ | ,, | जितेंद्र पी. मोता | ,, | ५ | २५ |
| ३३ | सौ. | सिताबाई दत्ताराम कारेकर | म्हापसा-गोवा | ५१ | ०० |
| ३४ | ,, | कांचनबेन भिमजी त्रिवेदी | जुनागड | ५ | २५ |
| ३५ | श्री. | शंभू दत्ताराम कारेकर | म्हापसा-गोवा | ५१ | ०० |
| ३६ | ,, | देवबा दत्ताराम कारेकर | ,, | ५१ | ०० |
| ३७ | ,, | Mrs. Khambata | मुंबई | ५ | ०० |
| ३८ | सौ. | I. I. Khambata | ,, | १५ | ०० |
| ३९ | श्री. | I. I. Khambata | ,, | ११ | ०० |
| ४० | ,, | देवेन्द्र पुंजालाल डॉक्टर | ,, | ५१ | ०० |
| ४१ | ,, | दिनूभाई गांधी | ,, | ११ | ०० |
| ४२ | ,, | एक भक्त | ,, | १०१ | ०० |
| ४३ | ,, | महमंद घोष | ,, ७० | ७५ | ०० |
| ४४ | ,, | टी. डी. चुंगप्पा | ,, | ५ | ०० |
| ४५ | ,, | दत्तात्रेय के. दांडेकर | ,, | २५ | ०० |
| ४६ | ,, | अनील मेहता | ,, | ४१ | ०० |
| ४७ | ,, | M. S. G. & Co. G. S. Karnde | नागपूर | १०१ | ०० |
| ४८ | ,, | वेद प्रकाश शर्मा | नैरोबी | १५१ | ०० |
| ४९ | ,, | श्रीमती विद्या विनायक वैद्य | है. बाद | ५ | ०० |
| ५० | | वसंतलाल व्ही. जोशी | मुंबई | ११ | ०० |
| ५१ | | व्ही. एच. मराठे | परळी-वैजानथ | १ | २५ |
| ५१ | | बाळकृष्ण वामनराव विजयकर | मुंबई ५२ | १६ | ०० |
| | | | एकूण... | ३९८१ | ८२ |

तारीख ८–२–६४ ते १६–३–६४ पर्यंत मनीऑर्डरनें हॉस्पिटल फंडास देणग्या देणाऱ्यांची यादी

| अ. नं. | नांव | पत्ता | रक्कम रु. | न.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पी. आर. कुमार | कलकत्ता २१ | २५ | ०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ,, | के. आनंदराव | धारवाड | ३ | ०० |
| ३ | ,, | के. एम्. ठाकर | मुंबई | ५ | ०० |
| ४ | ,, | सदाशिव प्रल्हाद | वानाजी | १ | ०० |
| ५ | ,, | जी. नरसिंह रेड्डी | ताडपत्री | १०० | ०० |
| ६ | ,, | Jaya I. Bordekar | मुंबई | ५ | ०० |
| ७ | ,, | Miss N. P. Joshi | कलकत्ता | २५ | ०० |
| ८ | ,, | H. M. शेंदूरडाडकर | पुणें | ५ | ०० |
| ९ | ,, | पंजाबराव गणपतराव धुगरे | यवती | ११ | ०० |
| | | | एकूण ... | १८० | ०० |

## मुंबई ऑफिसकडील हॉस्पिटल फंड जमा

( दि. १-१-६४ ते २०-३-६४ )

| अ.नं. | | नांव | पत्ता | रक्कम रु. | न.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. | अदि. सी. पी. वाडिया ट्रस्ट | मुंबई | १०,००० | ०० |
| २ | ,, | डॉ. होमी ए. बाटलीवाला | ,, | २,५०० | ०० |
| ३ | ,, | एच. श्रीनिवासराव | बंगलोर | १,०१० | ०० |
| ४ | ,, | जे. पी. मेहता | मुंबई | ३३० | ०० |
| ५ | श्रीमती | कमलाबाई व्ही. पटेल | ,, | २०१ | ०० |
| ६ | ,, | सी. डी. आमीन | तारापूर (कैराडी) | २०० | ०० |
| ७ | ,, | के. पी. पटेल | यु. के. | १९८ | ७५ |
| ८ | ,, | जस्टीस मुधोळकर | दिल्ली | १५१ | ०० |
| ९ | श्री. | एम्. डी. नाडकर्णी | मुंबई | १५१ | ०० |
| १० | ,, | आर. आर. पांगम | गोवा | १११ | ०० |
| ११ | ,, | बी. बी. दवे | मुंबई | १०१ | ०० |
| १२ | ,, | डी. आय गर्डा | ,, | १०१ | ०० |
| १३ | ,, | एन्. टी. खाडेवाला | ,, | १०१ | ०० |
| १४ | ,, | बी. एम्. त्रिवेदी | नैरोबी | १०० | ०० |
| १५ | ,, | रसिक शहा | मुंबई | १०० | ०० |
| १६ | ,, | के. एल. कार्ले | उरण | ७८ | ०० |
| १७ | | एक साई भक्त | मुंबई | ६९ | ५६ |
| १८ | ,, | एन्. व्ही. पटेल | बर्मींगहॅम | ६९ | ५६ |
| १९ | | श्रीसाई सेवक | मुंबई | ६५ | ०० |
| २० | ,, | फोन्सेका इलेक्ट्रीशिअन | ,, | ५१ | ०० |
| २१ | ,, | एम्. रत्नाकरराव | ,, | ५१ | ०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | श्रीमती तारामती जे. शहा | ,, | ५० | ०० |
| २३ | ,, गंगाबेन बी. भगत | ,, | ३९ | ७२ |
| २४ | श्री. के. एस. मिस्त्री | कसांडा | ३६ | ४३ |
| २५ | ,, के. के. पटेल | मुंधोळ | ३३ | ८८ |
| २६ | श्रीमती रामिक बी. देसाई | कपाला | ३३ | १३ |
| २७ | ,, मेहरू पी. सिधवा | मुंबई | ३० | ०० |
| २८ | ,, बी. के. पाटील | डिब्रस | २५ | ०० |
| २९ | ,, जे. बी. परेख | कसांडा | २९ | ८२ |
| ३० | ,, के. सी. पटेल | करमसाड | २५ | ०० |
| ३१ | ,, डी. जे. गोडीवाला | मुंबई | २१ | ०० |
| ३२ | ,, यु. सी. चिराडीयन | मंगलोर | २० | ०० |
| ३३ | ,, जे. पी. बलसार | सुराफिजी | १६ | ५६ |
| ३४ | अल्लमालिक | मुंबई | २५ | ०० |
| ३५ | ,, आर. डी. पटेल | बरमींगहॅम | १६ | ५६ |
| ३६ | ,, एम्. डब्ल्यू कोठारे | मुंबई | १५ | ०० |
| ३७ | ,, जी. के. रजपूत | ,, | १५ | ०० |
| ३८ | श्रीमती पेरीन पी. सिधवा | ,, | १५ | ०० |
| ३९ | श्री. आय. बी. देसाई | ल्युसाका | १३ | २५ |
| ४० | ,, चन्द्रवदन | सुराफिजी | १३ | २५ |
| ४१ | ,, पी. जी. बलसारा | ,, | १३ | २५ |
| ४२ | ,, आर. एम्. शहा | बडोदा | ११ | ०० |
| ४३ | श्री. व श्रीमती आर. एम्. टिपणीस | हावरा | ११ | ०० |
| ४४ | ,, जी. के. जावडेकर | मुंबई | ११ | ०० |
| ४५ | ,, एस. ए. भाईंदरकर | ,, | ११ | ०० |
| ४६ | ,, बी. पी. मिस्त्री | एडन | १० | ०० |
| ४७ | ,, एच. एस. सीरोडकर | मुंबई | १० | ०० |
| ४८ | ,, डी. जी. कर्णीक | चिंचणी | १० | ०० |
| ४९ | ,, एन्. एच. भ्रंगाधारिया | भोपाळ | ११ | ०० |
| ५० | श्रीमती सुशीलाबाई | बरंगळ | १० | ०० |
| ५१ | श्री. आर. के. टिपणीस | हावरा | ११ | ०० |
| ५२ | ,, जी. आर. भट | मुंबई | १० | ०० |
| ५३ | ,, डी. डी. लिंबे | सीएरालेवु | १३ | ६९ |
| ५४ | डॉ. मिस चंपा आफळे | दिल्ली | १० | ०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५५ | श्रीमती जेलाबेन पटेल | बल्लून U.R. | १३ | २४ |
| ५६ | श्री. व्ही. आर. सीरव्हान्ते | मुंबई | १० | ०० |
| ५७ | श्रीसाई सेवक | ,, | ७ | २५ |
| ५८ | ,, डी. व्ही. दाजी | ,, | ६ | ०० |
| ५९ | ,, एम्. हबीबभाई | कम्पाला | ५ | २७ |
| ६० | ,, एम. एस. मयेकर | मुंबई | ५ | २५ |
| ६१ | ,, सी. व्ही. नागरानम | मद्रास | ५ | ०० |
| ६२ | ,, व्ही. एच. डोळे | मुंबई | ५ | ०० |
| ६३ | ,, जी. एस. जोशी | ,, | ५ | २५ |
| ६४ | ,, पी. बी. गडशी | धुवारन | ५ | ०० |
| ६५ | मॅनेजर राजेश्वरी राईस मिल | तेफेरेड्डी | ५ | ०० |
| ६६ | श्री. यु. के. कत्रे | मुंबई | ४ | ०० |

---

" अज्ञान आणि दारिद्यांत दिवस कंठीत असलेल्या आपल्या बांधवाची चिंता वाहणारे भारतांत कितीसे लोक आहेत ! घरोघर जावून त्यांस ज्ञान—दान व सहाय्य करणारा हरीचा लाल कोणी आहे काय ! ज्यांची सर्वांकडूनच उपेक्षा झाली त्यांना तूं आपले म्हण व त्यांच्या बऱ्यासाठीं प्रार्थना कर आणि सुचेल तें काम त्यांच्यासाठीं करीत जा म्हणजे परमेश्वरच तुझा वाटाड्या होईल."

जोपर्यन्त आपल्या देशांतील शेतकरी व कामगार समाज अज्ञानांत व दारीद्र्यांत पीचत आहे तोपर्यंत वरच्या लोकांतील प्रत्येकाला मी देशद्रोहीच समजेन. कारण लोकानां जी सुखसाधनें प्राप्त होतात ती कामगारांनीं आपलें शरीर झिजवून उत्पन्न केली आहेत.

—स्वामी विवेकानंद

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**




## फेब्रुवारी १९६४

या महिन्यांत बाहेर गांवचे भक्त कांहीं कमी प्रमाणांत व कांहीं दिवस जास्त प्रमाणांत असें शिर्डीस येऊन दर्शन घेऊन गेलें. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें.

**किर्तन**

श्री. ह. भ. प. पोपट बुवा लोहणेकर मु. लोहणेर ता. सटाणा. जि. नासिक. श्री. ह. भ. प. बालकृष्णबुवा विजरदुर्गकर मुंबई, संस्थानगवई विठ्ठलराव मराठे यांची (श्रीरामदासनवमी) निमित्त महाशिवरात्र निमित्त. माघवा ११ निमित्त फाल्गुन शु. ११ निमित्त. श्री. तुकारामाबिज निमित्त अशी या महिन्यात पांच कीर्तनें श्रीमदिरांत झाली.

**गायन**

श्री बाबाजी सदाशिव कामटेकर मु. दहिसर मुंबई नं ६८, श्री. शांता गणपत वाहव जेजुरी. जि पुर्णे. श्री. सदानंद बाबुराव नार्वेकर गिरगाव मुंबई.

**नृत्य व तबलावादन**

श्री. बाबुराव जिवनराव देसाई हुबळी. जि धारवाड म्हैसूरप्रांत

**महाशिवरात्रोत्सव**

(कहाशिवरात्र) निमित्त श्रीचे समाधीस मंगलस्नान रुद्राभिषेक (गुरुपादुकास) रात्रौ कीर्तन व गांवांतून श्रींचे पालखीची मिरवणूक असे कार्यक्रम झाले.

शिर्डी येथील हवापाणी ठीक आहे. थंडी संपून उन्हाळ्याची छटा उपन्न होऊ लागली आहे.

---

## पोंच आणि अभिप्राय

**रामायण**—मूळ इंग्रजी लेखक, श्री. सी. राजगोपालाचारी, मराठी भाषांतरकार–श्री. सदानंद रेगे, प्रकाशक–कृ. रा. सामंत, भारतीय ग्रंथभवन, नायगांव क्रॉस रोड, मुंबई १४. मूल्य सहा रुपये, एकंदर पृष्ठें ४००.

रामायणासारखें अमर, अमृततुल्य, रसाळ व प्रत्येकास संजीवनी देणारें महाकाव्य आणि त्या मूळ संस्कृत काव्याचा सखोल अभ्यास केलेले चक्रवर्ती राजगोपाला-

चारी यांच्यासारखे विद्वान भाष्यकार असा हा दुग्धशर्करा सुयोग जुळून आलेला आहे. राजगोपालाचारी यांनीं मूळ वाल्मीकी रामायणाचा जसा बारकाईनें व कसून अभ्यास केला त्याचप्रमाणें त्या रामायणाचे हिंदी भाष्यकार तुळसीदास व तामीळ भाष्यकार कंबण या दोघांनींहि रामायण निरुपणाचा विचारपूर्वक अभ्यास केला. तुळसीदास व कंबण हे दोघेहि श्रेष्ठ कोटींतील कवी व रामभक्त होऊन गेले. अशा रीतीनें रामकथा सर्व थरांतील भारतीय जनतेच्या रक्तामासांत भिनून गेलेली आहे. तिचें जीवनपोषण व संवर्धन आजवर त्या चिरस्मरणीय कथेवर होत आलें आहे व पुढेंही तें होत राहील.

अशा या अमर काव्याला राजगोपालाचारी यांच्यासारख्या प्रतिभावंताचा हात लागल्यामुळें त्याला आगळीच माधुरी प्राप्त झाली आहे. रामायणांतील विविध प्रसंग व विविध पात्रें यांचें चित्रण त्यांनी आधुनिक दृष्टी कोनांतून विलक्षण हळुवार-पणें केलें आहे. तें वाचीत असतां आपणास कांहीं ना कांहीं नव्या विचारसंपदेचा लाभ झाला असें वाटल्याशिवाय रहात नाहीं.

या भारतीय विद्या भवनातर्फे प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी रामायणाचें मराठी रूपांतर सिद्धहस्त लेखक श्री सदानंद रेगे यानीं सुरस व अत्यंत सुलभ मराठींत केलें आहे. आपल्या कुटुंबांतील लहान मोठ्यांनी स्वतःचें जीवन समृद्ध व सुखी बनवावें यासाठीं या ग्रंथाचा प्रवेश प्रत्येक घरांतून होणें जरूर आहे.

महाकवी वाल्मीकी यांच्या मागून तुळसीदास ( हिंदी )व कंबण ( तामीळ ) या श्रेष्ठ भक्त कवींनीं आपआपल्या प्रतिभाबळानें ज्याप्रमाणें रामायणाच्या विचारसंपदेत मौल्यवान भर घातली त्याचप्रमाणें राजगोपालाचारी यानींही आपल्या प्रतिभा बळानें रामायणाचा बगीचा अधिक सौंदर्य संपन्न व सुगंधित करण्यांत महत्वाचा भाग घेतला आहे एवढें येथें नमूद करणें जरूर वाटतें.

———

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स

Statement about ownership and other particulars about Newspaper ( SAI LEELA ) to be published in the First issue every year after last day of February.

## FORM IV ( See Rule 8 )

| | | |
|---|---|---|
| 1 ) Place of Publication | ... | 804-B, Sai Niketan, Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay-14 |
| 2 ) Periodicity of its Publication | | Monthly |
| 3 ) Printer's Name | ... | Sharad Krishnaji Sapale |
| Nationality | ... | Indian |
| Address | ... | Ramkrishna Printing Press, Rukmini Niwas, Morbag Road, Dadar, Bombay 14. |
| 4 ) Publisher's Name | ... | Shripad Balkrishna Darp |
| Nationality | ... | Indian |
| Address | ... | Sai Niketan, Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay-14 |
| 5 ) Editor's Name | ... | Shripad Balkrishna Darp |
| Nationality | ... | Indian |
| Address | ... | Same as at 4 above |
| 6 ) Names and Addresses of individuals who own the Newspaper and Partners or Shareholders holding more than one per cent of the total capital. | | Shri Sai Baba Sansthan Shirdi, P. O. Shirdi, District Ahmednagar. |

I, S. Balkrishna Darp, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 8th January 1964

S. Balkrishna Darp
Signature of Publisher.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**- | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां

प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आ णि म्ह णू न च
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३५, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रकः शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशकः श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.